९५६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११८४



REFBK-0010895

डॉ. ब. चव्हाण...

# मनाचा पारवा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः निबंध
क्रमांक ........ नोंः दिः



शं. ब. चव्हाण लिखित

# मनाचा पारवा

प्रस्तावना : प्रा. चिं. वि. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा स्थळ प्रत

REFBK-0010895

...ठ्ये प्रकाशन मंदिर

मूल्य अडीच रुपये

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन
* * * * * * * * * * * * * * * * *
प्रकाशक : चंद्रकांत शेट्ये
चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर, कोल्हापूर क्र. ३
* * * * * * * * * * * * * * * * *
मुद्रक : वि. तु. साळोखे
मनोहर मुद्रणालय, सोमवार, कोल्हापूर क्र. १
* * * * * * * * * * * * * * * * *
मुखपृष्ठ : श्रीकांत उगार मुद्रा : उपासनी प्रोसेस

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *
प्रथमावृत्ति गणेशचतुर्थी सहा सप्टेंबर एकोणीसशें एकोणसाठ
* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

प्रगाढ विद्वत्ता

आणि

अपार सौहार्द

या गुणांनीं थोर पदाला चढलेले

माझे गुरुतुल्य स्नेही

**डॉ. ए. जी. पवार**

एम्. ए., एल्एल्. बी. ( बॉम्बे ),

पीएच्. डी. ( लंडन ),

बार–ॲट–लॉ.

यांना–

# ११...

आशा आशा बहु आशा । काये आशा कळेचिना ।
गुप्त तें गुप्त जाणावें । आनंदवनभुवनीं ॥

—श्रीसमर्थ

माझ्या पहिल्या प्रकाशनाचें मुद्रण, आणि तेंहि आचार्य अत्रे यांच्या पुस्तकाचें, श्रीज्ञानेश्वर प्रेसचे धनी, माननीय मा. कृ. तथा भाऊसाहेब सहस्रबुद्धे यांचे शुभ हस्तें होऊन तें श्रीगणेश-चतुर्थीला बाहेर पडलें, आणि माझ्या प्रस्तुत व्यवसायाचा 'श्रीगणेशा' यथार्थ रीतीनें मंगल असाच झाला ! त्याचेंच स्मरण म्हणून माझें हें अकरावें प्रकाशन पुनश्च श्रीगणेशचतुर्थीला माझ्या वाचकांच्या हातीं देतांना मला एकप्रकारचा उत्साह वाटत आहे.

प्रस्तुत वाङ्मयसेवेंत मला ज्या सुहृदांचें नित्य सहकार्य कळकळीचें प्रोत्साहन वेळोंवेळीं मिळत आहे आणि जे माझ्या कार्याचा कोणत्या ना कोणत्या कारणाने महत्त्वाचा भाग होऊन राहिले आहेत अशांपैकीं सर्वश्री. देवधरशास्त्री, दत्तात्रयरावजी नरके, दादासाहेब कुलकर्णी, विलासराव साळोखे, पुंगावकर पाटील बंधू, अ. कृ. ओगले, बाळासाहेब बोरगांवकर, मेघश्याम लाटकर, स. सी. जाधव प्रभृतींचा कृतज्ञतापूर्वक नामनिर्देश करून हें माझें अकरावें प्रकाशन वर उल्लेखिलेल्या श्रीसमर्थांच्या 'आनंद-वन भुवनांतील' प्रसादसूचक पद्यपंक्तींसह जनतात्मा श्रीजनार्दनाच्या सेवेस सादर करीत आहें.

—चंद्रकांत शेट्ये

# प्रस्तावना......

' मनाचा पारवा ' हातांत धरून आकाशांत सोडण्याचें काम मजवर सोपविल्या-बद्दल पारव्याचे मालक रावसाहेब शंकर बळवंत चव्हाण यांचा मी आभारी आहें. श्री. चव्हाण हे कलाकारांचें आणि शिकाऱ्यांचें निवासस्थान कोल्हापूर येथील नैवासिक आहेत. त्यांनीं मामलेदारीचें काम केलें असून आतां ते सेवानिवृत्त झाले आहेत. ' भाड्याचें घर, ' ' तेजस्वी तारा, ' ' इष्काची नशा,' ' मंगल दिव्य ' इत्यादि नाटकें त्यांनीं लिहिलीं आहेत. ' मधुमालती ' हा त्यांचा काव्य संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. त्यांच्या कांहीं कविता व लेख क्रमिक पुस्तकांतहि समाविष्ट झाले आहेत.

' मनाचा पारवा ' ह्या अन्तर्गत निबंधाच्या नांवावरून सबंध पुस्तकास ' मनाचा पारवा ' हेंच नांव लेखकानें दिलें आहे. पूर्ववयांत बाळगलेल्या पण पुढें फोल ठरलेल्या आकांक्षांच्या अवशेषांच्या खिंडारांत बसून विचार करणाऱ्या मनाला त्यांनीं एखाद्या ओसाड पडलेल्या प्रासादाच्या खबदाडांत बसून साद घालणाऱ्या पारव्याची उपमा दिली आहे. " मनाशीं योजलेल्या ध्येयांचा भव्य प्रासाद अर्ध्यावरूनच कोसळला आहे... तो साद ऐकून कुणाला वाटेल कीं माझ्या मनाचा पारवा आपल्या ध्येयाच्या विफलतेचाच आर्त साद घालून त्या पडक्या प्रासादाच्या उदास दृश्याला... विषण्णतेची अवकळा आणीत आहे. " असें सांगून लेखक स्वतःच या संभाव्य तर्काचें खंडन करीत म्हणतात, " नाहीं मुळींच नाहीं . मीं विषण्ण कां व्हावें ? तो साद अपयशाच्या विषण्णतेचा नाहीं, तर केलेल्या कष्टाच्या समाधानाचा आहे बरं ! "

लेखकाच्या मनानें उच्च ध्येयाकडे उडण्याचे यत्न केला होता पण त्या मनाचे पंख पारव्याचे होते, घारीससाण्याचे नव्हते, म्हणून त्याला ध्येय साधलें नाहीं. ' अपयश हा गुन्हा नाहीं, पण खुजं ध्येय बाळगणं गुन्हा होय ' असं म्हटलं जातं ( ' लो एम्. नॉट फेल्युअर, इज् क्राइम् ' हें भूतपूर्व महाराष्ट्र नाटक मंडळीचें ब्रीदवाक्य होतें ). हे निबंध स्वानुभूतिपर असल्यास लेखकांच्याबद्दल सहा-नुभूति बाळगणें अवश्य आहे. त्यांच्या आकांक्षांची उंची किती होती हें त्यांनीं

वाचकांना सांगितलें नाहीं; परंतु त्यांच्या सोज्ज्वल सात्त्विक विचारसरणीकडे लक्ष देतां ऐहिक ध्येय जरी त्यांस गांठतां आलें नसलें तरी वैचारिक ध्येय गांठण्यास त्यांना दोनचार बोटांचेंच अंतर बाकी आहे असें दिसतें. कारण हल्लींच्या ललित निबंधांचा रोख गैरशिस्तपणा, भोगप्रवणता यमनियम पाळण्यांत शैथिल्य आणि उच्छृंखलता यांचा उदोउदो करण्याकडे असतो व वाचकच नव्हेत पण चिकित्सक टीकाकारहि असल्या प्रकारच्या लिखाणाचाच लघुनिबंध म्हणून उल्लेख करितात. ज्यांत नीतितत्त्व गुंफिलें आहे, ज्यांत वैषयिकता दिसत नाहीं, शिथिलतेस पाठिंबा दिला जात नाहीं अशा वाङ्मयाला आधुनिक टीकाशास्त्रांत जागाच नाहीं.

प्रस्तुत संग्रहांतले लघुनिबंध समाजाच्या चालू विस्कळित परिस्थितींत वाचकांना जीवनाचा योग्य मार्ग दर्शविणारे आहेत. यांत थोड्याश्या लघुकथा पण आहेत. निव्वळ लघुकथांची संख्या फार कमी आहे. ' मीं मिशी उतरली ' ह्या पहिल्याच प्रकरणांत कथानायकानें मिशांत पांढरे केस दिसल्यामुळें मिशी उतरून टाकली असें वर्णन केलें आहे. मिशीचें महत्त्व विनोदी पद्धतीनें सांगितलें आहे, तें हास्य-कारक आहे. मखादेव जातक ह्या बौद्धप्रिय कथेंतील मखादेव राजानें ८४ सहस्र वर्षें राज्य केल्यावर त्याला स्वतःच्या मिशींत एक पांढरा केस उगवलेला आरश्यांत दिसला. लगेच त्याला वैराग्य प्राप्त होऊन त्यानें राज्यत्याग केला.

" येशू खिरस्ताला त्याच्या पिकलेल्या दाढी-मिशांनीं मारलेल्या अहंकारा-मुळेंच..." ( पान १४ ) असें विधान इतिहासाला धरून नाहीं. येशू वयाच्या बत्तिसाव्या वर्षी मरण पावला. त्याच्या दाढी-मिशा इतक्यांत पिकणें अशक्य होतें.

' अपराधाचें शासन – क्षमा ' ही एक उद्बोधक कथा बिरबलाच्या नांवावर मोडली आहे. अपराधाच्या क्षमारूपी शासनाचा उपयोग मर्यादित क्षेत्रांतच होतो. असंस्कृत लोकांवर क्षमेचा उपयोग तर होत नाहींच; पण ते अधिकाधिक बेडर होत जातात, हें न उमजल्यामुळें भारताचें अपरिमित नुकसान झालें आहे व होत आहे. नागोबाला दूध ' ह्या प्रकरणांतील कथेचें तात्पर्य बरोबर उलट आहे.

' कोपिष्ट माणूस ' ह्या कथेंत कोपिष्ट आणि अविचारी मनुष्यास होणाऱ्या पश्चात्तापाचें चित्र भडक रंगांत काढिलें आहे. भावनेची उत्कटता हींत जरुरीपेक्षां अधिक प्रबळ दाखविली आहे. परंतु भाषेच्या ओजस्वीपणाचें हें चांगलें उदाहरण आहे.

'म्हाताऱ्याचे डोहाळे' ह्या लघुकथेंत एकाकी म्हाताऱ्याचें आत्मनिवेदन आहे. आपल्याकडे कोणी लक्ष देत नाहीं, आपल्याला कोणी विचारीत नाहीं, सगळे-जण आपल्याला अडगळ समजतात अशा दुःखानें भारावलेला म्हातारा अडख-ळून पडणार, इतक्यांत एका मुलीनें त्याला टेकू दिला आणि म्हटले, "आजोबा, पडत होतां ना खालीं;" ह्यांतील 'आजोबा' ह्या संबोधनानें म्हाताऱ्याच्या उरल्या-सुरल्या काळिजाच्या चिंध्या कशा उडाल्या तें लेखकानें मार्मिकपणें सांगितलें आहे. सर्वथैव गांजल्या जाणाऱ्या माणसांतहि अल्पसा तरी अहंकार असतो आणि तो दुखावला गेल्यास त्याच्या दुःखाला पारावार रहात नाहीं असें सूचित केलें आहे. म्हाताऱ्या माणसांच्या दुःखांत इतरांना आपल्या म्हातारपणाची जाणीव झाली आहे ह्या ज्ञानाची गणना महत्त्वाची असते.

शेवटचें प्रकरण 'एक कुलुप—दोन किल्ल्या' ही कथाच आहे संसाराच्या कुलुपाला दोन किल्ल्या असतात. त्यांपैकीं एक पुरुषाच्या हातीं आणि दुसरी बायकोच्या हातीं असते. पुरुषाच्या हातची किल्ली सोन्याची असते. कारण तो संसारास अवश्य असें द्रव्यार्जन करितो. आणि दुसरी किल्ली म्हणजे स्त्रीहृदयांतील पतिनिष्ठा. पहिली किल्ली भौतिक आणि दुसरी मनोमय आहे. रूपक छान आहे; पण हें कुलूप कोणत्या पेटीला लाविलें आहे तें लेखकानें उलगडून सांगितलें नाहीं.

लघुनिबंध बहुधा गंभीर स्वरूपाचे, खोल तात्पर्याचे आणि भावनांनीं ओथंबलेले साधले आहेत. त्यांतील कित्येक अवतरणें भारंभार सोन्याच्या मोलाचीं आहेत. वानगीदाखल कांहीं येथें देत आहें:

—भीति ही धृतराष्ट्रासारखी आंधळी आणि संकटांच्या शंभर काल्पनिक पुत्रांना जन्म देणारी असते असं म्हटलं तर तें फारसं वावगं होणार नाहीं.

(संकटांचं मोल)

—केवळ सहानुभूतीच्या शब्दांसाठीं आसुसल्यामुळं कितीतरी अतृप्त जीवज्योति निष्प्रभ झालेल्या आहेत, निकामी झाल्या आहेत. पण त्याहि सहानुभूतीच्याच शोधक नजरेनं पाहिल्या शिवाय कुणाला कशा दिसाव्यात? (निंदकाचं घर)

—वास्तविक मुलांना योग्य रीतीनं वाढविण्याचं ज्ञान असल्याशिवाय मुलांना जन्म देण्याचा कुणाला अधिकारच असतां कामा नये. तसा कायदाच व्हायला हवा. पण नको असलेलें भाराभर कायदे पास करण्याचा हव्यास जडलेलें आमचे

सरकार हा अत्यावश्यक कायदा पास करण्याचं मात्र कधीं मनांत सुद्धां आणणार नाहीं. ( आपलीं मुलें )

—एखादा माणूस प्रकाशित ज्योतीच्या जितका जवळ येईल तितकी मागं पडणारी त्याची छाया मोठी असते, त्याप्रमाणं एखाद्याचा उज्ज्वल गुणांशीं जितका अधिक संबंध तितकं त्याच्या पाठीशीं उभं असलेलं त्याचं दैव अधिक खडतर असावं ना ? ( दंभ )

' स्त्री जन्मा, ही तुझी कहाणी ! ' या निबंधांत लेखकाची स्त्रीजातीविषयीं कळकळ दिसून येते. सीतात्यागाबद्दल लेखकानें रामाला दोष दिला आहे. शंबूकवध व सीतात्याग हे रामचरित्रावर दोन कलंक आहेत. हे दोन्ही उत्तर-कांडांत वर्णिलेले प्रसङ्ग आहेत व उत्तरकांड मुळच्या रामायणाचा भाग नसून प्रक्षिप्त आहे, असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे.

कित्येक लघुनिबंधांत लेखकानें प्रचलित समजुतींच्या उलट विचारसरणी मांडली आहे. दंभ हा दुर्गुण नसून एक तऱ्हेचा चांगला शिष्टसंमत गुण आहे हें त्यांचें प्रतिपादन वाचण्याजोगें आहे. ' कर्तव्यदक्षता ' या निबंधांत शिवाजी महा-राजांवर दडपण आणून त्यांना कोंडाण्यावर हल्ला करावयास लावणाऱ्या जिजाबाई आणि तें दडपण मान्य करणाऱ्या शिवाजीलाहि लेखकांनीं दोष दिला आहे. त्यांचें म्हणणें ' आयुष्यांतील महान् कार्यें केवळ कर्तव्यबुद्धीनें करून भागत नाहींत, ' असें आहे. कार्याचा महान्पणा अगोदर ठरत नसतो. दुसरे लोक तो ठरवितात. असे मतभेदाचे प्रश्न पुस्तकाची उपयुक्तता वाढवितात. बहुतेक सर्व लघुनिबंध जिव्हाळ्याच्या भाषेनें, विचारांच्या तळमळीनें आणि अंतःस्फूर्तीनें लिहिले आहेत, वाचनीय आणि उद्बोधक आहेत. रावसाहेब चव्हाण अशाच लिखाणाची भर वाङ्मयांत घालतील अशी आशा आहे.

३३, नातूबाग,
पुणें २.

— चिंतामण विनायक जोशी

मराठी ग्रंथ सं. । . ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 22360 वि: निबंध
क्रमांक 1164 नोंद दि: 23/4/66
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 70684

१...

# मी मिशी उतरली !

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

मिशीचा पराकोटीचा अभिमानी होतों मी. मिशी हें पुरुषाचें भूषण आणि पौरुषाचें लक्षण होय या मताचा कट्टा पुरस्कर्ता होतों. बिनमिशीवाला पुरुष दिसणें हें अभद्रांतलं अभद्र दर्शन होय असं मी मानीत होतों. जन्मदात्यापैकीं कुणी स्वर्गस्थ झाले किंवा ईर्षेनं लावलेली अटीतटीची पैज हरलों तरच माझ्या-कडून मिशी उतरविली जाण्याची शक्यता होती. त्याशिवाय नाहीं. एवढं महत्त्व माझ्या मिशीला देत होतों मी ! पण आज अशा कोणत्याहि महत्त्वाच्या लौकिक कारणाशिवायच मला माझी मिशी उतरावी लागली होती !

त्या स्वरूपांत माझ्या मित्रानं मला प्रथम पाहिलं, त्या वेळीं त्याला आश्चर्याचा एवढा धक्का बसला, कीं त्याच्या वासलेल्या तोंडांत मूठभर तरी माशा सहज गेल्या असतील, त्याच्या विस्फारलेल्या डोळ्यांच्या पांढऱ्या कवड्या तर बाहेर गळून पडतात कीं काय असं वाटलं ! लवकरच त्यानं वासलेलं तोंड मला प्रश्न विचारण्यासाठीं मिटलं म्हणून बरं, नाहींतर त्याला वाताचा झटका आला आहे असाच कुणाचाहि समज झाला असता. ओसंडल्या आश्चर्याच्या भरांतच कसा तरी त्यानं मला प्रश्न केला, "तूं–तूं मिशा काढल्यास ! कां—कां ?"

होय, मीं मिशा काढल्या होत्या ! नव्हे उतरल्या होत्या ! कां ?

ज्या भरल्या अंतःकरणानं मीं मिशा उतरल्या होत्या, त्याच भरल्या अंतः-करणानं त्याला उत्तर दिलं,

'मीं मिशा कां उतरल्या ?...कां उतराव्या लागल्या ? नव्हे, त्या कां उतराव्या लागतात ? तें बॅ. तात्याराव सावरकरांना विचार. आज हयात असते, तर सरदार पटेलांनीं किंवा खरं म्हणजे मोतीलाल नेहरूंनीं या प्रश्नाचं तुला अत्यंत समर्पक उत्तर दिलं असतं. बायकांनीं एकदां त्यांच्या ओंगळ छपरी मिशाबद्दल नापसंती व्यक्त केली असतां, ज्या तरुण मोतीलालजींनीं बाणेदार उत्तर देऊन त्यांना गप्प बसविलं होतं त्याच मोतीलालजींनीं उतार वय होतांच आपल्या मिशा साफ उतरून टाकल्या होत्या! त्याच्या दुःखद कारणाची फोड त्यांनींच अधिक चांगल्या रीतीनं करून सांगितली असती तुला !'

माझं उत्तर बिनतोड होतं, अचूक होतं ! पण त्यानं माझ्या मित्राला कांहीं बोध झाला असावा असं दिसेना. आणि तें साहजिकहि होतं.

माझी मिशी मला जीव कीं प्राण होती. विशीच्या वेशींत पाऊल टाका-यला अवधी होता तेव्हांपासून न उगवलेली मिशी कुरवाळण्यांत रममाण होत असे मी. आणि ओठावरच्या उत्तर-दक्षिण टोकांवर मिशीचीं शेपटें उगवूं लागल्यापासून गोगलगाईच्या शिंगांप्रमाणें पीळ भरलेलीं मिशीचीं इवलालीं टोकें उभवून छाती पुढें काढून अभिमानानें मिरविणारी माझी मूर्ति अनेकांनीं पाहिली होती.

दिवसेंदिवस मिशी वाढत होती आणि त्या प्रमाणांत माझा चेहरा अधि-काधिक खुलत होता ! जेव्हां भरदार मिशीच्या पुंजक्यानें माझ्या रुबाबांत भरपूर भर टाकली, तेव्हां तर तिची जोपासना करतां करतां केव्हां दिवस निघून जाई हें कळत सुद्धा नव्हतं. आपली वेणीफणी आवरण्यास रंगेल तरुणीला किती तरी वेळ लागतो म्हणे. माझ्या वाढत्या मिशीचा प्रपंच ठाकठीक करण्यांत उगवला दिवस तट्कन मावळून जात असे ! वाढत्या वयाबरोबर वाढणाऱ्या मिशीचे कारहिं बहुविध आणि बहुढंगी ठरतील असे चोखंदळ प्रयत्न करण्यांत मीं कधींहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 22380 वि: निबंध
क्रमांक 1184 नोंदी 23/8/82



कसूर केली नव्हती. आरंभीं ' पृथ्वीराज-काट ' झाला. थांबा, असें बिचकूं नका. पृथ्वीराज म्हणजे आपला सिनेमानट नव्हे. त्याचा बुच्चा काट मीं अंगीकारीन असं तुम्हाला वाटलं तरी कसं ? हा माझा आदर्श पुरुष ऐतिहासिक पृथ्वीराज होय. हत्तीच्या दोन सुळया दातांप्रमाणें ओठांच्या कोपऱ्यांतून मिशांचीं दोन नाजूक टोकें हमेशा वरतीं वळलेलीं असायची माझीं ! मिशांचा संभार वाढूं लागला तसा त्याचा कालांतरानें आपोआप ' छप्पर-काट ' झाला. तिची आणखी वाढ होऊं लागली तशीं बेतशीर कात्री लावून तिचा ' टर्फ काट ' केला. पुढें त्यालाच कोरून त्याचा ' दाभण-काट ' केला.

हे फक्त ढोबळ काट सांगितले तुम्हांला. दर चार दोन दिवसांनीं लहानसहान फरकांचे आजवर एवढे काट केले आहेत कीं, बायकांनीं शोधून काढलेल्या केश-रचनेच्या असंख्य प्रकारांहूनहि खचितच ते अधिक भरतील ! यावरून माझ्या मिशांची किती आस्थेनें आणि दक्षतेनें जोपासना करीत होतों मी याची सहज कल्पना येईल तुम्हांला. मिशी म्हणजे माझा जीव कीं प्राण होती, असें म्हटलं तें उगीच नव्हें ! छे, जीव कीं प्राणच काय, पण त्याहून अधिक ! कारण चार चौघांत बोलायचा तसाच प्रसंग आला तर निर्धारानं मी बोलून जात असें, कीं ' प्रसंगीं मान उतरून देईन, पण मिशी उतरून देणार नाहीं !' मिशीचा इतका पराकोटीचा अभिमानी, तोच मी पोटच्या पोराप्रमाणं आजवर आंजरल्या-गोंजारलेल्या त्याच माझ्या मिशीवर शस्त्र चालवून आज मोकळा झालों होतो !

त्याला काय कारण घडलं याचं उत्तर दिलं होतं मी मित्राला. पण एक तर तें त्याला समजलं नसावं, किंवा समजलं असलं तरी मानवलं तरी नसावं. कारण फाकलेले डोळे आणि वांसलेलें तोंड यांच्यासह लांबलेला त्याचा चेहरा अजूनहि तसाच प्रश्नार्थक भाव दाखवीत होता. मग मीं त्याला स्पष्टच सांगितलं, कळवळत्या अंतःकरणानं सांगितलं, कीं 'बाबा रे,मीं मिशी उतरल्याचं पाहून तुला आश्चर्याचा धक्का बसलाय हें जाणतों मी, पण कुणींहि आश्चर्य करावं अशा क्षुद्र कारणासाठीं मीं ती उतरली असेल असं मात्र समजू नकोस बरं. एक महान् झुंज हरल्यामुळें नाइलाजानं मला ती उतरून द्यावी लागली आहे. काळाशीं सतत चाललेल्या युद्धांत

आज मी पराभूत झालों आहे. न कळत, एकाएकी अपेशाच्या दारांत येऊन उभा राहिलों आणि त्याच क्षणीं काळाचं विजयी हास्य त्रिखंड भरून उरलं! माझा सारा अभिमान क्षणांत गळून पडला. त्यासरशीं पायांशीं लोळण घेत शरण गेलों मी त्याला! त्याची निशाणी म्हणून प्राणांहूनहि प्रिय असलेली माझी मिशी मला उतरावी लागली.

'काय सांगूं मित्रा, काळानं कसा न कळत माझा पराभव केला रे! कसा तें सांगतोंच तुला. नीट ध्यान देऊन ऐक, म्हणजे माझ्या अंतरीची व्यथा पटेल तुला. मित्रा, अशाच एका सकाळीं आरशांत पाहून माझ्या मोहक मिशीचा संभार गोंजारण्यांत दंग झालों होतो मी. या नादांत किती वेळ रमून गेलो असतों कुणास ठाऊक, पण लगतच्या जाळींतून अकल्पित वाघ आडवा यावा आणि त्याला पाहताच आपल्याच तंद्रींत चालणाऱ्या वाटसरूची भीतीनें गाळण उडावी तशी मिशी गोंजारतां गोंजारतां एकाएकीं अवस्था झाली माझी. टोंकदार मिशीचा सारा रुबाब क्षणांत गलितगात्र झाला! चेहरा पांढरा फटक पडला! कारण हातांतल्या आरशांत माझं स्पष्ट प्रतिबिंब पडलेलं होतं, त्यांत मला तो प्रथमच उमगला. तो—तो—उजव्या नाकपुडीच्या खालीं काळयाभोर मिशीच्या पुंजक्यांत एकच पांढराशुभ्र केस होता तो!

हें दृश्य दिसतांच केवढा हादरून गेलों मी! मिशींतला एकच पांढरा केस उतरणीला लागलेल्या वयाची स्पष्ट निशाणी होय, या कटु जाणिवेची भयंकर सणक एकदम देहांतून आरपार निघून गेली माझ्या!

खरंच, मिशीआधींचं वय हें बालपण मानलं. तर ओठावर उगवणाऱ्या पहिल्या काळ्या केसापासून तों या पहिल्या पांढऱ्या केसापर्यंत यौवनावस्था मानावी लागेल. अर्थात् या पांढऱ्या केसानं माझी यौवनावस्था संपून वृद्धावस्था सुरू झाली आहे—अरेरे! केवढी तिरस्करणीय, अनुकंपनीय अवस्था ही! आणि ज्या मिशीचं मी अभिमानानं कौतुक करीत होतों, तीच—तीच मिशी या अवस्थेची मर्मभेदी जाणीव द्यायला कारणीभूत व्हावी अं! मग तिचं यापुढं तोंड पहाणं कसं शक्य होतं मला?

भर जवानींत आपल्या मिशांचा रुबाब सांभाळणारे थोर पुरुषहि उतार वयांत त्यांच्यावर निर्दयपणें शस्त्र चालवितात तें उगीच नव्हे. मग मींहि तेंच केलं, तर त्यांत नवल कसलं ?

काळानं माझं गर्वहरण केलं, माझ्यावर मात केली, म्हणून त्याला शरण गेल्याचं निदर्शक म्हणून मीं मिशी उतरली खरी, पण अशी पिकलेली दाढीमिशी निर्धारानं तशीच राखणाऱ्या महाभागांबद्दल मात्र मला फार फार आदर वाटतो. मस्तकावर दुर्दैवाचे असंख्य प्रहार, असंख्य आपत्ति धैर्यानें झेलीत खंबीरपणें तसेच उभे राहणारे वीर वंदनीय तर खरेच, पण त्याहूनहि अशा पिकलेल्या पांढऱ्या शुभ्र दाढीमिशा छातीवर हंसत वागविणारे महापुरुष मला अधिक धैर्याचे आणि म्हणून अधिक वंदनीय वाटतात.

आपल्या पिकलेल्या दाढीमिशांना कौतुकानें आणि प्रेमानें कुरवाळणारे असे महापुरुष पाहिले, म्हणजे सर्वस्वाचा सत्यानाश करणाऱ्या आपल्या भयंकर शत्रूच्याहि पाठीवरून कौतुकानं हात फिरविणाऱ्या महान् विभूति पाहिल्याप्रमाणं माझं मस्तक आपोआप विनम्र होतं ! आपल्या पौरुषाचं, स्वाभिमानाचं, कर्तृत्वाचं वैभवशाली जीवन संपल्याची ग्वाही देणारी पांढऱ्या दाढीमिशांची ही ढळढळीत पताका छातीवर वागविणाऱ्या हंसतमुख महापुरुषांची कुणाशीं तुलनाच करावयाची झाली, तर ती शत्रूच्या असंख्य वारांनीं झालेल्या जखमांतून निथळणाऱ्या रक्तानिशीं त्याच्या शौर्याचं कौतुक करीत त्याच्याशीं हस्तांदोलन करणाऱ्या योद्धयाशीं, किंवा अंगावरील जखमेंत असह्य वेदना देत वळवळणारा एखादा कृमी खालीं पडला तर उपासमारीनें मरेल म्हणून त्याला उचलून पुन्हा जखमेवर सोडणाऱ्या सहनशील बुद्ध भिक्षूशींच करावी लागेल ! त्या योद्धयाच्या आणि बुद्ध भिक्षूच्या वृत्तींत प्रतीत होणारें तें अंतःकरण, तें मन, तीच वृत्ति पिकलेल्या दाढीमिशा छातीवर वागविणाऱ्या वृद्धांच्या वागणुकींतहि तितक्याच उत्कटतेनें वसत आहे, हें थोडयाशा विचाराअंतीं कुणालाहि पटेल यांत शंका नाहीं.

सक्तीनें संन्यस्तवृत्ति आचरणाऱ्या दुबळ्या हिंदु विधवेप्रमाणं केवळ पारंपारिक रूढीच्या दडपणामुळें दाढीमिशा वागविणारे बुद्रुक माझ्या आदराचे

विषय नव्हेत हें मला आधीं स्पष्ट केलं पाहिजे. ज्या कारणासाठीं गरीबांना एकादशीचं पुण्य लाभत नाहीं, दुबळ्या दुःखपीडितांना सोशीकपणाचं श्रेय मिळत नाही, त्याच कारणासाठीं पिढयान्‌पिढयांच्या रूढीचं आंधळं अनुकरण करून दाढीमिशांचें जंगल वाढविणाऱ्या बुढ्ढयांना केसाचंहि महत्त्व नाहीं. जाणीवेच्या जागतेपणाखेरीज केलेल्या कृतींत उदात्तपणाचा उदय कुठून होणार ?

या उदात्तपणाचं विराट स्वरूप पुरतं आकलन झालं नसेल अजून तुम्हांला. तें पहा, जाणीवेच्या जागतेपणानं पिकलेल्या दाढीमिशा छातीपर्यंत रुळूं देणाऱ्या महाभागांच्या उदात्ततेचं खरं रूप ! त्यांनींच माणसाच्या मनांतील 'मी' पणाचा पीळ ढिला केला आहे, समर्थांना सोशीकपणा शिकवला आहे, समानतेचा तोल सावरला आहे ! इतकेच नव्हे, तर विश्वप्रेमाचा, परमसहिष्णुतेचा, अखिल शांतीचा जगाला कुणीं संदेश दिला असेल, तर तोहि या पिकलेल्या दाढीमिशांनींच होय, असं माझं ठाम मत आहे.

'कुणीं एका गालावर मारलं, तर दुसरा गाल पुढं कर, आपल्या शत्रूवरहि प्रेमच कर' असा आदेश द्यायला येशू ख्रिस्ताला त्याच्या पिकलेल्या दाढी–मिशांनीं मारलेल्या अहंकारामुळेंच स्फूर्ति मिळाली असली पाहिजे, असं नाहीं तुम्हांला वाटत ?

थोर विभूतींनीं आपल्या पराभवाचंहि मौलिक भांडवल करावं आणि जीवनाचा उच्च आदर्श घालून द्यावा. आणि माझ्यासारख्या सामान्यांनीं मात्र त्याची बाह्यात्कारी चिन्हं तेवढीं पुसून काढावींत आणि आंतल्या आंत कुढत रहावं, ही आमच्या जीवनाची पातळी !

२...

# संकटांचं मोल

भीति ही धृतराष्ट्रासारखी आंधळी आणि संकटांच्या शंभर काल्पनिक पुत्रांना जन्म देणारी असते असं म्हटलं तर तें फारसं वावगं होणार नाहीं. या काल्पनिक संकटांनीं पछाडलं गेल्यामुळं माणसाची मुळची भीति आणखी पुष्ट होते, आणि धष्टपुष्ट झालेली ही भीति पुन्हां दुप्पट प्रसवशक्तीनं नव्या संकटांच्या असंख्य काल्पनिक पुत्रांना जन्म देते! असं हें दुष्ट वर्तुळ सारखं वाढतच जातं; आणि मग त्यानं भयभीत झालेला माणूस अधिकाधिक खचत जाऊन कोणतंहि काम अंगावर घ्यायला अगदीं निकामी होऊन बसतो.

काल्पनिक संकटांनीं माणूस असा ग्रासलेला असतो याचा अर्थ त्याला खऱ्याखुऱ्या संकटांना तोंड द्यावंच लागत नाहीं असं मात्र नव्हे. आपल्या मार्गांत आपल्याला खरीखुरीं संकटं भेटणं हा तर आपल्या जीवनाचाच एक भाग आहे. पण म्हणून त्यांना घाबरून जाण्याचं कांहींच कारण नाहीं. कारण त्यांतील बहुतेक संकटं अगदीं सामान्य असतात. त्यांना जरा धिटाईनं तोंड दिलं, कीं कुठल्या कुठं पळून जातात तीं. पण कांहीं संकटं मात्र बरींच चिवट आणि तापदायक असतात हें नाकारून चालणार नाहीं. आपल्या शक्तियुक्तीचा, आपल्या

सोशिकपणाचा आणि आपल्या हिंमतीचा निकषच ठरतात तीं. पण अशीं संकटं क्वचितच आपल्या वाट्याला येतात हेंहि विसरून चालणार नाहीं. आणि अशीं संकटं आपल्या वाट्याला आलींच तर त्यांत तरी बिघडलं कुठं ?

आपल्या मार्गांत वारंवार आडवीं येणारीं लहानसहान संकटं हीं तर आपले हितकर्ते मित्र आहेत. कां ? खरं वाटत नाहीं तुम्हांला ? मग समजा, आपल्या जीवनांत असं एकहि संकट उरलं नाहीं, कीं जें निवारल्याखेरीज आपलं ध्येय साध्य होईल; अशी एकहि अडचण उरली नाहीं, कीं जी दूर केल्याखेरीज आपलं श्रेय प्राप्त होईल; असा एकहि अडथळा उरला नाहीं, कीं जो ओलांडल्याखेरीज आपलं श्रेय सफल होईल; असं जीवन तुम्हांला लाभलं, तर त्यांत जगण्यासारखं कांहीं आहे असं वाटेल तुम्हाला ?

ज्या जीवनांत हवं म्हणतांच हातावर पडतं, कधीं कशाबद्दल वाट पहात तात्कळत बसावं लागत नाहीं, कधीं कशाबद्दल धडपड करायचं कारण नाहीं, कसली खटपट करायचं कारण नाहीं, कीं कशाच्या उणेपणाबद्दल तळमळ नाहीं; कसं काय वाटेल हें जिणं तुम्हांला ? मला नक्की वाटतं, कीं तुम्हांला जें मिळविण्याची ओढ नाहीं, तें मिळाल्याचं कोडकौतुकहि असणार नाहीं; ज्याच्या प्राप्तीची उत्कंठा नाहीं तें प्राप्त झाल्याच्या आनंदाला उत्कटताहि असणार नाहीं ! जें नसल्याचं दुःख नाहीं, तें असल्याचं सुखहि मिळणार नाहीं ! माझी खात्री आहे कीं असल्या आळणी, सपक, निर्जीव जिण्याइतकं दुसरं एखादं रुक्ष कंटाळवाणं जिणं असेल अशी कल्पनासुद्धां कुणाला करतां येणार नाहीं. ज्या जिण्यांत कशाची आतुरताच असणार नाहीं, त्या जिण्यांत आनंदाची काडीमात्र तरी कुणाला आशा करणं शक्य आहे का ? मी तर असं म्हणेन, कीं एखाद्या वांछित गोष्टीच्या प्रत्यक्ष प्राप्तीपेक्षां त्या गोष्टीच्या प्राप्तीची आतुरताच अधिक सुखावह असते. मग त्या वांछित गोष्टीच्या प्राप्तीच्या आणि आपल्या दरम्यान आडवा पडलेला तो संकटाचा अडसरच—सुखावह आतुरतेचा जन्मदाता नव्हे का ? मग आपल्या जीवनाच्या वाटेवर उभीं असलेलीं हीं संकटं उपद्रव देणारे आपले शत्रू नसून पर्यायानं आपणाला आनंदाचा लाभ करून देणारे आपले परम मित्र होत असं म्हटलं तर त्यांत गैर काय आहे ?

निसर्गाची शिकवण तरी याहून वेगळी कुठं आहे ? आपल्या पृथ्वीची एकंदर रचना, तिची संपूर्ण जडणघडणच पहा ना. पृथ्वी गोल आहे हें सत्य आहे. पण घासून पुसून गुळगुळीत केलेल्या चेंडूसारखी ती गोल थोडीच आहे ? उलट सामान्य माणसाला ती गोल आहे, कीं दऱ्याखोऱ्यांनीं नि डोंगरकपारींनीं गजबजलेली अशी कोसळलेल्या दगडामातीची एक अवाढव्य नि अस्ताव्यस्त रास आहे अशी शंका यावी, इतकी ती ओबडधोबड आहे. तथापि माणसाचें आजचें सामान्य ज्ञान त्याला पृथ्वी गोलच आहे हें विसरू देत नाहीं. पृथ्वी गोल आहे हें मान्य करण्याइतका आजचा मानव प्रगत झाला आहे. मात्र पृथ्वीच्या या अस्ताव्यस्त ओबडधोबड पसाऱ्यांतहि एक प्रकारची शिस्त आहे हें चटकन् त्याच्या ध्यानीं येणार नाहीं.

पृथ्वीच्या अफाट पाठीवर उजाड आणि रुक्ष अशा लहान मोठ्या डोंगरांच्या अनेक रांगा अस्ताव्यस्त पसरल्या आहेत. पण म्हणूनच त्या डोंगरकपारींच्या मधलीं खोरीं झुळझुळ वाहणाऱ्या नद्याओढ्यांनीं सचेतन झालीं आहेत आणि फळाफुलांनीं बहरलेल्या संपन्न शेतवाडींनीं सुशोभित झालीं आहेत.

पण समजा, अशा दऱ्याखोऱ्यांनीं आणि डोंगरकपारींनीं व्यापलेल्या उंचसखल भूमिऐवजीं ती एकजात सपाट, आपल्या दृष्टीच्याहि पलीकडे—अगदीं दूर—दूरपर्यंत एकसारखी सपाट आणि सपाटच असती तर ? . . तर . . तर . . एका रुक्ष, ओसाड आणि भकास अशा सहारा वाळवंटाखेरीज या पृथ्वीतलावर दुसरं काय उरलं असतं ?

आपलं जीवन झाल तरी असंच आहे. तें एक या पृथ्वीच्या रचनेची छोटीशी प्रतिकृति आहे असं म्हटलं तरी चालेल. पृथ्वीवरील लहान मोठ्या डोंगरकपारींप्रमाणं आपलं जीवनहि लहान मोठ्या अडचणींनीं आणि संकटांनीं असंच व्यापून टाकलेलं असतं, आणि डोंगरकपारीमधल्या त्या सुपीक संपन्न खोऱ्याप्रमाणंच आपल्या आयुष्यांतील अशा संकट—मालेच्या खोऱ्यांत निर्भर आनंदाचीं, सुखाचीं आणि समाधानाचीं रम्य स्थळें निर्माण झालेलीं असतात. तो आनंद, तें सुख, तें समाधान, हीं सर्व त्या संकटाचींच अपत्यें होत असं म्हणतात तें याचसाठीं. हा संकटांचा चढउतार आपल्या आयुष्यांत नसता, एकजात

सपाट जमिनीप्रमाणं आपलं सारं जीवनहि असंच एकसुरी सपाट राहिलं असतं, तर...त्या ओसाड, भकास सहारा वाळवंटासारखंच आपलं जीवनहि शुष्क, नीरस आणि अत्यंत तापदायक झालं नसतं का ?

म्हणूनच मी म्हणतों, कीं आपल्या जीवनाच्या वाटेवर उभीं असलेलीं हीं संकटं उपद्रव देणारे आपले शत्रु नसून पर्यायानं आपणांला आनंदाचा लाभ करून देणारे आपले परम मित्रच होत.

आपणाला ताप देणारीं, आपणाला हतबल, हतबुद्ध करणारीं अशीं कांहीं थोडीं संकटं आहेत हें खरं, पण तीं अगदीं थोडींच आहेत हेंहि आपण आपलं सुदैवच समजायला हवं. त्यांच्यावर आपणाला विजय मिळवितां येवो अगर न येवो, पण त्यांनाहि तोंड द्यायचा आपण निर्धार केला, तर आरंभाला वाटतो तितका नंतर त्यांचा बागुलबुवा वाटत नाहीं हेंहि कांहीं खोटं नाहीं. बरं त्यांना भिऊन आपण पळून जायचं म्हटलं, तरी तीं आपणाला थोडींच टळणार आहेत ?

असा पळून दूर जायचा नुसता विचार मनांत आणायचा अवकाश, संकटांना त्याचा कुठून कसा सुगावा लागतो कोण जाणें, तात्काळ दुप्पट आवेशानं आमच्यावर झडप घालतात तीं. आमच्या भित्रेपणामुळं जणूं त्यांना अवसानच चढतं. मग पळून जाण्याऐवजीं निर्धारानं त्यांना तोंड कां द्यायचं नाहीं ? निर्धाराच्या जोरावर केवळ एका करांगुलीवर गोवर्धनसारखा पर्वतहि तोलतां येतो, हें आपल्या उदाहरणानं श्रीकृष्णांनीं आम्हाला दाखवून दिलेलं नाहीं का ? मग त्यांचंच अनुकरण करून निर्धारानं संकटाला तोंड देऊन आपल्या पुरुषार्थाचं सार्थक करणं आपलं कर्तव्यच नाहीं कां ? या द्वंद्वांत त्या संकटावर फार तर मात करतां येणार नाहीं आम्हांला. पण मर्दासारखं सामना दिल्याचं वीराचं समाधान तरी मिळेल ? मग हाहि लाभ कांहीं थोडा नव्हे !

आणि सुदैवानं अशा प्रबळ संकटावर आपण मात करूं शकलोंच तर लाभणाऱ्या त्या विजयानंदाचं सुख काय वर्णावं ! जगांत असे फारच थोडे आनंद असतील, कीं जे या आनंदाची बरोबरी करूं शकतील. मग अशा आनंदाला मुकणं, म्हणजे जीवनांतील परमानंदालाच मुकणं नव्हे कां ?

—— मग संकटांना भ्यायचं कशासाठीं ?

३ . . .

# लादलेलं थोरपण

कांहीं माणसं जन्मतःच थोर असतात. कांहीं माणसं स्वतःच्या कर्तृत्वानं थोर होतात आणि कांहीं माणसांच्यावर थोरपण लादलं जातं. थोरपण लाभणं हें भाग्याचं लक्षण होय असं मानतों आपण. पण तें नेहमींच खरं नसतं. जो स्वतःच्या हिंमतीवर थोरपण प्राप्त करुन घेतो तो भाग्यवान् खरा. पण ज्याच्यावर थोरपण लादलं जातं तो मात्र एका परीनं दुर्भागीच म्हणावा लागेल. कारण आगंतुक कारणानं लाभलेलं हें थोरपण एक तर दीर्घकाल टिकत नाहीं. आणि तें लाभलेल्या माणसाच्या अंगीं टिकविण्याची कुवतहि असत नाहीं. त्यामुळं थोड्याच वेळांत तें लादलेलं थोरपण गळून पडतं. मग त्याची जी करुणास्पद स्थिति होते, तिला दुसरी तोड शोधूनहि सांपडायची नाहीं. मी असं कां म्हणतों हें खालील गोष्ट वाचल्या खेरीज तुमच्या नाहीं ध्यानीं येणार. काबूल कंदाहारकडील गोष्ट आहे ती. ती गोष्ट अशी आहे :

काबूल कंदाहारकडे घोड्यापेक्षां गाढव अधिक पूज्य मानलं जातं. मंगलप्रसंगीं अगर उत्सवसमारंभांत मिरवणुकीसाठीं घोड्याऐवजीं गाढवाचाच प्रामुख्यानं उपयोग केला जातो.

सालाबादप्रमाणं यंदांहि एका गांवीं कुठल्या तरी देवाची गाढवावरून मिरवणूक निघाली होती. ठिकठिकाणीं भक्तजन भक्तिभावानं गाढवाच्या पायांवर मारे पाण्याचे घड्यावर घडे ओतीत होते, धूपदीपादि उपचारांनीं त्याला ओंवाळीत होते, अबीरबुक्का उधळून त्याचा सन्मान करीत होते, आणि भरल्या अंतःकरणानं मस्तक नमवून त्याला वंदन करीत होते.

गाढवाला हा सर्व प्रकार नवीनच होता. आजवर त्याच्या धन्याची त्याच्याशीं घडत असलेली कठोर वागणूक व आजचा हा अपूर्व सन्मान या दोहोंतील क्षणोक्षणीं मनांत उभ्या राहणाऱ्या विरोधानं त्याच्या अंतःकरणांत एकच गोंधळ उडून गेला होता. असा कोणता चमत्कार घडून आल्यामुळं आपलं दैव आज इतकं फळफळलं असावं याची त्याला उमज पडत नव्हती. दुसरा चांगला धनी तर आपल्या वाट्याला आला नसेल? ज्या कारणामुळं रोज आपली पाठ सडकून निघत असे ते आपले सारे दोष तर आज नाहींसे झाले नसतील? हो, तसंच कांहीं तरी असलं पाहिजे. नेहमींपेक्षां आज आपली योग्यता कांही तरी वाढली असली पाहिजे हीच गोष्ट खरी! आणि हा उत्साह-वर्धक विचार मनांत येतांच आनंदभरानं खेंकाळत मागील दोन्ही पाय एकदम अंतराळांत उडवून त्यानं ' कसरत ' करून दाखविली.

मिरवणूक पुढं पुढं चालली होती. त्याला आंजारून गोंजारून, त्याच्या-वरून बत्तासे, फुलें वगैरे उधळून दर्शन घेण्यासाठीं धडपडणाऱ्या भक्तांची गर्दी वाढतच होती. गाढव ठिकठिकाणीं फुर्र फुर्र करून गर्दींत हळूच लाथा झाडीत होतं, आणि शेपटीच्या चवरीनं अनेकांचीं कानशिलं सडकीत होतं. भक्तगणहि तो ईश्वरी प्रसाद समजून भक्तिभावानं मस्तक नमवून त्याचा स्वीकार करीत होते. हा सर्व प्रकार, कुतूहलानं केळीच्या कोक्याप्रमाणं कान उभवून तें गाढव तिरप्या दृष्टीनं टवकारून पहात होतं. आपली योग्यता वाढली असली पाहिजे याबद्दल त्याला आतां बिलकूल शंका उरली नव्हती. आणि मग त्यानं जवळ येईल त्याला मनसोक्त खरपूस प्रसाद चारायला सुरवात केली. जणूं मानव जातीनं आजवर त्याच्याशीं केलेल्या अन्याय्य वागणुकीची आज तें पुरेपूर परतफेडच करीत होतं!

कांहीं वेळानें मिरवणूक संपली. पण आपली योग्यता वाढली असल्या-बद्दलची रुजलेली कल्पना तशींच त्या गाढवाच्या डोक्यांत राहून गेली. आणि दुसऱ्या दिवशीं मिरवणुकींतल्या प्रमाणंच आसपास येईल त्याला मुक्त हस्तानं—नव्हे, पादानं खरपूस प्रसादाची खैरात करण्याचा ते प्रयत्न करूं लागलं. नेहमींप्रमाणं त्याला कामावर नेण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं मालक त्याच्याजवळ आला, पण त्यालाहि लत्ताप्रसादानं पावन करण्यासाठीं आपली लाथ उचलण्यास त्यानं कमी केलं नाहीं. मालकानं पुष्कळ चुचकारून पाहिलं, पण लकडीशिवाय मकडी वळण्याचं लक्षण दिसेना. आणि खरंच, अखेर हातांत सोटा घेऊनच या प्रकर-णाचा निकाल लावण्याशिवाय मालकाला गत्यंतर उरलं नाहीं.

अखेर झालंहि तसंच ! गाढवाची पाठ चांगलीच सडकून निघाली ! मारानं व्याकुळ होऊन तें गाढव कळवळून ओरडूं लागलं. स्वतःस देवरूपीं समजणाऱ्या गाढवाला या संकटांतून सोडविण्यासाठीं पुन्हा देवाचाच धांवा करावा लागला !

यावरून लादलेलं थोरपण हें क्षणभंगुर तर असतंच पण तें दुःखदायकहि कसं असतं हें सहज तुमच्या ध्यानीं येईल.

पण हें कटु सत्य अखेर तरी त्या दुर्दैवी गाढवाला उमजलं असेल का ? छे, कुठलं उमजायला ! आणि अशा प्राण्यांनं तें कधीं उमजत नाही हें त्याहून दुर्दैव !

## कल्पना आणि व्यवहार

आकाशांतील तारका कितीहि तेजःपुंज असल्या तरी घरांतील मिणमिणती पणतीच आपल्या उपयोगाला अधिक येते. काव्यात्मक कल्पना कितीहि उत्तुंग असल्या तरी साधे व्यावहारिक आडाखेच आपल्या अधिक हिताचे असतात.

४ ...

# निंदकाचें घर

‘ निंदकाचें घर असावें शेजारीं ’ असं तुकाराम महाराज म्हणतात. जणूं काय मुद्दाम मागणी केल्याखेरीज शेजार न मिळण्याइतके निंदक दुर्मीळच आहेत ! कदाचित् संत तुकारामांच्या वेळची परिस्थिति वेगळी असल्यास नकळे. पण आजकाल कुठंहि घर बांधा, शेजारचं घर नेमकं निंदकाचं असणार याबद्दल कुणींहि निशंक असावं !

हें विधान ऐकून चमकून उठाल तुम्ही. आणि आवेशानं म्हणाल, कीं बाबारे, सारेच शेजारी निंदक असतात हा वादविषय म्हणून बाजूला ठेवूं या क्षणभर, पण तुला शेजारी आहेत याचा अर्थ तूंहि इतरांचा शेजारी आहेस असाच होत नाहीं का ? आणि मग शेजारी म्हटला कीं तो निंदक असायचाच हें जरं खरं मानायचं झालं तर तूंहि इतरांचा निंदकच ठरत नाहीस का ?

तुम्हाला असं म्हणायचं असेल तर म्हणा बापडे. बोलणाऱ्याचं तोंड कोण धरणार ? पण तुम्ही बोलतां म्हणून प्रत्युतरादाखल मीहि कांहीं तरी तितक्याच आवेशानं बोलेन अशी तुमची अपेक्षा असेल तर ती साफ चुकीची आहे. मी

इतरांसारखा नाही, असं आपल्याच तोंडानं सांगण्याइतका अहंकारी नाहीं मी. तुम्ही माझ्याबद्दल काय समजायचं तें खुशाल समजा. मी तोंडांतून 'ब्र' काढणार नाहीं स्वतःबद्दल. हो, आपली आपण करी स्तुति तो एक मूर्ख, असं समर्थांनीं म्हटलं आहे हें चांगलं ठाऊक आहे मला. म्हणून मी आपलं शेजाऱ्याबद्दलच सांगणार आहे तुम्हाला

काय सांगत होतो तुम्हाला ?—हो, आठवलं, तर सांगायचं म्हणजे निंदकांचा शोध करण्यासाठीं फारशी धांवपळ करायला नको.

आजकाल प्रत्येक बाबतींत टंचाईनं परिसीमा गाठलीय, पण निंदकांच्या बाबतींत मात्र चांगलीच सुबत्ता झालीय ! चांगलं उजडायच्या आधींपासून ते मावळून मध्यरात्र होईपर्यंत निंदकांचे कठोर शब्द कानांवर पडत असतात. शिवाय, असे शब्द कानावर पडायला आपला निंदक शेजारच्या घरांतच रहायला हवा असं नाहीं. रेडिओ-टेलिव्हिजनच्या आजच्या चिमुकल्या जगांत सातासमुद्रापलीकडच्या निंदकाचा शब्द त्यानं तो उच्चारल्या क्षणींच आपल्या कानांवर येऊन आदळतो. मग निंदेचा गजर आजकाल अष्टौप्रहर आपल्या कानांवर येऊन आदळत असेल तर त्यांत नवल काय ?

निंदकाचें घर शेजारीं असावं असं म्हणण्यांत तुकाराम महाराजांचा हेतु हा होता, कीं त्याची निंदा ऐकून आपले दोष आपणास समजून यावेत, म्हणजे सहाजिकच आपण ते सुधारूं शकूं. आणि म्हणून पर्यायानं आपले दोष दाखवून ते सुधारायची संधि आणून देणारा निंदक हा आपला महान् उपकारकर्ताच होय असं त्यांना वाटे. पण ही झाली तुकारामांवेळची परिस्थिति. आजकाल असं झालंय, कीं मागून मिळविलेल्या एकुलत्याएक शेजाऱ्याऐवजीं सारं गांव—छेः — सारी दुनियाच आपली निंदक होऊन बसली आहे आणि आपल्या निंदेचे घाव सारखे कानीं कपाळीं बडवत आहे ! निंदकाच्या दोषदर्शनानं तुकाराम महाराजांनीं ते काढून टाकून आपला फायदा करून घेतला असेल; पण सारखं तेंच तें कानावर पडत गेल्यामुळें असत्यहि सत्य वाटूं लागतं, त्याप्रमाणं सतत आमची निंदाच आमच्या कानांवर पडत असल्यामुळं आम्ही म्हणजे संपूर्ण दोषांचें

आगरच, दुसरा जन्म घेतल्याखेरीज सुधारायला कांहीं जागाच नाहीं, अशी आमची समजूत होऊन गेलीय ! आंतर्बाह्य सारा देहच कुजून गेल्यावर उपचार कुठं करायचा ?

अशा प्रकारच्या निराश विचारांनीं व्यग्र होऊन गेल्यामुळं आपले दोष काढून टाकण्यासाठीं कांहीं करावं असं मनांतच येत नाहीं. इतकंच नव्हे, तर कांहींहि कार्य केलं तरी ते दोषपूर्णच होणार, मग कराच कशाला ? अशा नाउमेद विचारनं आम्ही निष्क्रिय होऊन गेलोंय !

म्हणून ' निंदकाचें घर असावें शेजारीं ' असं म्हणण्याऐवजीं आजकाल ' सहानुभूति दाखविणाऱ्याचें घर शेजारीं असावें ' अशी कळकळून प्रार्थना करण्याची वेळ आली आहे.

तेलाचा भरपूर पुरवठा होत असतांनाहि नैसर्गिक क्रियेनुसार ज्योतीवर जमणाऱ्या काजळीमुळं दिव्याचा प्रकाश मंदावतो. ती काजळी हलक्या हातानं कुणीं तरी झटकून टाकल्याशिवाय दिव्याचा प्रकाश पुन्हां प्रज्वलित होत नाहीं. मग अंगीकृत कार्यांत स्वाभाविक कारणानं आलेला निरुत्साह दूर व्हावा म्हणून वेळोवेळीं कुणाचा तरी सहानुभूतीचा हात आपल्या पाठीवरून फिरायला नको का ? उलट निंदेचा झंझावात सभोंवार सारखा घोंघावत राहिला, तर आपली कार्याच्या प्रेरणेची दीपज्योतिच विझून जाऊन सर्वत्र नैराश्याचा काळोख पसरला तर त्यांत नवल काय ?

सहानुभूति ही स्तुतीची धाकटी बहीण आहे. कित्येकदां स्तुतिमुळं—फाजील स्तुतिमुळं माणूस बिघडतो. पण सहानुभूतिमुळं बिघडलेला माणूस पुष्कळदां सुधारतो. सहानुभूति आणि उचित प्रशंसोद्‌गार ही एक दिव्य शक्ति आहे. मेलेल्या मनालाहि जिवंत करणारी ती संजीवनी आहे. जगांतील पुष्कळ दानें सत्पात्रीं करावीं लागतात. पण सहानुभूति हें एकच असें दान आहे कीं—त्याला दान म्हणायचं झाल्यास—त्याला अपात्र असा कुणीहि नाहीं ! केवळ सहानुभूतीच्या शद्बासाठीं आसुसल्यामुळं कितीतरी अतृप्त जीव-ज्योति निष्प्रभ झालेल्या आहेत, निकामी झाल्या आहेत. पण त्याहि सहानुभूतीच्याच शोधक नजरेनं पाहिल्याशिवाय कुणाला कशा दिसाव्यात ?

५....

# अपराधाचें शासन–क्षमा

या जगांत संपूर्ण सदाचारी असा कोणीच नाहीं, त्याप्रमाणं संपूर्ण दुराचारीहि कोणी नाहीं. सदाचारी म्हणविणाऱ्याच्या हातून प्रसंगीं दुर्वर्तन घडलं तरी समंजस माणसं त्याला सदाचारीच म्हणतात, आणि दुराचारी माणसाच्या हातूनहि कित्येकदां सद्वर्तन घडलं तरीहि तो दुराचारीच ठरतो.

हें असं कां व्हावं ?

माणूस हा जात्याच स्खलनशील आहे. माणूस म्हटला, कीं त्याच्या हातून कांहीं ना कांहीं चूक ही व्हायचीच. म्हणून प्रत्येक चुकीबद्दल प्रत्येक माणसाला प्रत्येक वेळीं दोषी का ठरवायचं असतं ? मग तसं दोषी ठरवायचं म्हटलं, तर तें कुणीं ठरवायचं ? कारण, तें ठरविणाराहि चुकीला पात्र आहेच. नव्हे, तो चुका करीतच असतो—केलेल्या असतात. आणि त्या चुकांबद्दलचं शासन कोणत्या तुरुंगांत जाऊन भोगायचं ? त्याकरितां सारं जग हाच एक तुरुंग करावा लागेल! आणि मग अशा अतिरेकी विचारसरणीनं वागूं लागलों तर हें जग म्हणजे नरकाचीच एक प्रतिकृति होऊन बसेल !

समंजस माणूस अशा विचारसरणीला कधीं बळी पडत नाहीं लिहिण्यासाठीं उपयोग करतांना कागदाला आपण कांहीं माया सोडतो. एखाद्या माणसाच्या वर्तनाचं मूल्यमापन करतांनाहि समंजस माणूस अशी माया सोडूनच त्याचं बरंवाईटपण ठरवितो. माणूस सदाचारी किंवा दुराचारी ठरतो तो नेहमींच तसा वागतो म्हणून नव्हे, तर तसं त्याचं वागण्याचं प्रमाण अन्यथा वागण्याच्या प्रमाणापेक्षां अधिक असतं म्हणून ! अशा सदाचारी ठरलेल्या माणसाच्या हातून स्वाभाविक स्खलनशीलतेमुळं घडणाऱ्या कांहीं चुकांचा विचार करतांना आपण अत्यंत जागरूक असायला हवं त्याच्या इतर सद्‌गुणाबद्दल—सदाचाराबद्दल.

चाणाक्ष बिरबल हें जाणून होता. पण कोपिष्ट बादशहाला हें कसं पटवायचं, हाच मोठा प्रश्न होता. कुणाचीहि अल्पशी चूक झाल्याचं आढळून आलं, कीं त्याबद्दल त्याला कडक शासन करायचं एवढंच तो जाणत होता. आज दरबारांत ज्या सरदाराच्या अपराधाची चौकशी व्हायची होती त्याला कोणतं भयंकर शासन भोगावं लागेल याचा कांहींच नेम नव्हता. कुणी म्हणत त्याला सुळावर चढवलं जाईल, कुणी म्हणत त्याचा कडेलोट होईल ! शिक्षेच्या प्रकाराबद्दल असा मतभेद होता, तरी कांहीं तरी भयंकर शिक्षा होणार याबद्दल साऱ्यांचंच एकमत होतं. त्या सरदाराचा अपराध तसा मोठा होता म्हणून नव्हे, तर बादशहाचा अविवेकी कठोर स्वभाव सर्वांना माहीत होता म्हणून !

यामुळं बिरबल आज बेचैन झाला होता. त्या सरदाराच्या अंगीं अवगुण नव्हते असं नव्हे. पण त्या अवगुणापेक्षां त्याचे गुण मोठे होते. तो शूर होता. पराक्रमी होता. एकनिष्ठ होता. अनेक खडतर प्रसंगीं जीव पणाला लावून राज्याचं रक्षण केलं होतं त्यानं. त्याला गमावणं म्हणजे राज्यावर एकप्रकारें संकट ओढवून घेण्यासारखं होतं. पण बादशहाच्या तें ध्यानींमनींहि नव्हतं—आणि याचमुळं बिरबल आज बेचैन होता.

त्या सरदाराची बादशहाजवळ उघड उघड रदबदली करावी तर तें शक्य नव्हतं. त्या सरदाराबरोबर आपलीहि गर्दन उतरायला बादशहा कमी करणार नाहीं, हें बिरबल पुरतं जाणून होता.

दरबार भरलेला होता, सरदाराची चौकशी चालू झाली होती. सिंहासनस्थ बादशहाची मुद्रा क्षणाक्षणाला अधिकाधिक उग्र होत होती. त्या सरदाराला आतां तोफेच्या तोंडीं देण्याचा हुकूम होतोय, हत्तीच्या पायीं दिलं जातंय, कीं तिथल्यातिथं तलवारीनं शिर उडवलं जातंय, या विचारानं साऱ्यांचीं अंतःकरणं जड झालीं होतीं पुढचा हुकूम काय होतोय हें ऐकण्यासाठीं जीव कानांत गोळा करून सारा दरबार चित्रासारखा तटस्थ बसला होता. सारं वातावरण सुन्न झालं होतं. आणि इतक्यांत बिरबल त्या दरबारांत आला. सोन्याच्या मिन्यानं नक्षीकाम केलेली एक सुंदर सुरई बरोबर आणली होती त्यानं. आदबीनं बादशहाच्या ती समोर ठेवून, त्रिवार मुजरा करून तो बाजूला हात जुळवून उभा राहिला.

साऱ्यांचं लक्ष त्या सुरईनं आपल्याकडं वेधून घेतलं. तशी अप्रतिम कलाकृति होतीच ती ! पुढं चाललेलं चौकशीच काम क्षणभर सारेचजण विसरून गेले. बादशहासुद्धां त्या सुरईकडेच कौतुकानं टकमक पहात राहिला. पहातां पहातां तिच्या कलाकुसरीनं त्याची तब्येत खूष झालेली दिसत होती. हा झालेला अपेक्षित परिणाम ध्यानीं येतांच नम्रपणें खालीं वाकून बिरबलानं ती सुरई कांहींशी फिरवून ठेवली. सुरईच्या त्या बाजूकडं नजर जातांच बादशहा दुःखाश्चर्यानं एकदम उद्‌गारला,

" या अल्ला ! कितनी आफसोसकी बात है ! "

खरंच आफसोसकी बात ! ––सुरईच्या त्या बाजूला एक भोंक पडलेलं होतं. आणि साध्या मळक्या कापडाचा बोळा घालून बंद केलेलं होतं तें. केवढी अप्रतिम कलाकुसरीची चीज ती ! आणि तिला भोंक पडून ती कायमची विशोभित व्हावी ! मग ही आफसोसकी बात नव्हे तर काय ?

" खाविंद—" नम्रपणें हात जोडून बिरबल म्हणाला, " या जगांत कोणतीहि गोष्ट संपूर्ण सौंदर्यानं नटलेली नसावी, असाच अल्लाचा शाप आहे कीं काय कोण जाणे ! कलावंतानं आपलं सारं कौशल्य खर्च करून ही चीज निर्माण केली, पण कुठं कसा कच्चा दुवा राहून गेला व ती तयार होऊन बाहेर पडल्यानंतर

हाताळतां हाताळतां थोड्याशा धक्क्यानं या सुरईला इथं भोक पडलं! पण म्हणून एवढ्याशा भोकासाठीं सुरईच का फेकून द्यायची? एवढयाशा वैगुण्या-साठीं सारं कलाकौशल्य मातींत का फेकून द्यायचं?"

हें ऐकून बादशहा गालांतल्या गालांत हंसला. बिरबलाच्या बोलण्याचा एकंदर भाव त्याच्या ध्यानीं आला असावा. कारण त्या सरदाराच्या चौकशीचं काम त्यानं तिथंच थांबवलं; आणि झाल्या गुन्ह्याबद्दल त्याला क्षमा केली आहे, असं सांगून दरबार बरखास्त केला.

## यशाचें मर्म

एकाच घावानं मोठं झाड कधीं तुटत नाहीं. अनेक वेळां घावावर घाव घालावे लागतात त्या साठीं. पण म्हणून झाड तोडण्याच्या कार्यातील पहिला घाव वायां गेला असं कांहीं म्हणता येणार नाहीं. अंशतः कां होईना त्यानं आपलं काम केलेलं असतं. पण तेवढ्यावरच तुम्ही थांबलांत, कीं मग मात्र पहिला घाव वायांच जातो. कारण लवकरच पहिल्या घावानं पडलेली खाच नैसर्गिक रीत्याच बुजली जाते.

कीर्तीचंहि असंच आहे. एका सत्कृत्यानं माणसाची कधीं कीर्ति होत नाहीं. त्यासाठीं वारंवार सत्कृत्य करीत रहावं लागतं. त्यांत खंड पडला, कीं तुमचीं पहिलीं सत्कृत्यं विस्मृतीच्या काळोखांत गडप झालींच म्हणून समजा.

६ ...

# स्त्री-जन्मा, ही तुझी कहाणी !

बायकांची अब्रू ही कांचेच्या भांड्यासारखी आहे असं म्हटल्याचं पुष्कळ वेळां ऐकतो आपण. पण ही उपमा बायकांच्या अब्रूची यथार्थ अवस्था स्पष्ट करायला पुरेशी नाहीं. थोड्याशाहि धक्क्यानं भंग पावणाऱ्या कांचेच्या भांड्याप्रमाणं बायकांची अब्रू नाजूक आहे हें तर खरचं. पण कांचेच्या भांड्याला जें संरक्षण आहे, तें संरक्षण बायकांच्या अब्रूला मात्र नाहीं.

कांचेचं भांडं आपल्या मालकीचं असो अगर इतरांच्या मालकीचं असो, त्याला धक्का लावायला, त्याच्यावर एखादा दगड मारायला सहसा कोणी धजत नाहीं. कारण भांडं आपलं असेल तर तें फुटल्यानं आपलंच नुकसान होतं, आणि दुसऱ्याचं असेल तर बुद्ध्या कळ अंगावर ओढून घ्यायला कोण तयार होणार ? म्हणून कांचेच्या भांड्याशीं जो तो जपूनच व्यवहार करतो. याच्या उलट अगदीं धसमुसळेपणानं, बेदरकारपणानं बायकांच्या अब्रूशी आपण वागतो. आपल्या हलगर्जीपणामुळं एखादं कांचेचं भांडं फुटलं, तर थोड्याशा पैशाचं नुकसान होईल फार तर; पण बायकांच्या अब्रूशीं ज्या हलगर्जीपणानं आपण वागतों त्यानं एका जिवाच्या जन्माचा सत्यानाश होतो, हें कांहीं आपल्या ध्यानीं येत नाहीं.

पुरुषाला आपली पत्नी नुसती एकनिष्ठ असून चालत नाहीं, तर तिचं एकनिष्ठत्व संशयातीतहि असावं लागतं. स्वतःच्याच नव्हे, तर साऱ्या जगाच्या दृष्टीनं तिच्या एकनिष्ठत्वाची स्वतःला खात्री असली, तरी तेवढ्यानं समाधान होत नाहीं त्याचं. साऱ्या जगाला ती एकनिष्ठ असल्याची खात्री असायला हवी, असा त्याचा आग्रह असतो. एकनिष्ठ राहणं एका परीनं बायकांच्या हातचं तरी आहे. पण जगांतील कोणत्याहि फाटक्या तुटक्या माणसाकडून त्या एकनिष्ठत्वाची हमी बायकांनीं कोणत्या उपायानं मिळवायची? त्यांच्या हातीं अशी कोणती सत्ता आहे, कीं त्यानं कोणत्याहि बेजबाबदार माणसाचं तोंड बंद करूं शकतील त्या? मग जें त्यांच्या हातीं नाहीं, त्याची आम्हीं अपेक्षा करावी आणि तें जमलं नाहीं कीं त्याबद्दल त्यांना जबाबदार धरून शासन करायला उठावं, हा कुठला न्याय? खरंच, आमच्या अशा वागण्यानं बायकांवर आम्ही महान् अन्याय करीत आहोंत हें न कळण्याइतके आम्हीं निर्बुद्ध पशु तरी असले पाहिजे किंवा बेशरम गुंड तरी असलें पाहिजे, असंच कुणीहि म्हणेल.

पण यापैकीं आम्ही कोणीच नाहीं आणि तरी बायकावर असा अन्याय आम्ही करीतच असतों. आम्हींच काय पण आमच्यांतील आदर्श अशा रामासारख्या थोर पुरुषानंहि असा अन्याय करावा, हें केवढं आश्चर्य? सीतामाई पवित्र होत्या, हें रामाला काय माहीत नव्हतं? तरी केवळ लोकांच्या समजुतीसाठीं तिला अग्निदिव्य करायला लावलंच त्यांनीं. राज्यकर्त्यांच्या कर्तव्यपालनासाठीं तसं करणं आवश्यक होतं असं समजूं या फार तर. पण एक वेळ खात्री पटल्यानंतर आणि ती जगाला पटविल्यानंतर एका नादान बेजबाबदार परटाच्या बरळण्याला महत्त्व देऊन गरोदरपणामुळं अवघडलेल्या अवस्थेंतहि आपल्या पत्नीला पुन्हां रानावनांत सोडून देणाऱ्या त्या रामाच्या न्यायबुद्धीची कींवच करायला हवी!

आपल्या पत्नीच्या चारित्र्याची ग्वाही साऱ्या जगानं द्यायला हवी असं ज्याप्रमाणं आपणाला वाटतं, तसं तें इतरांनाहि वाटत असणार; आणि म्हणून इतरांच्या बायकांबद्दल बोलतांना आपण अत्यंत खबरदारी घ्यायला हवी, ती आपली एक सामाजिक जबाबदारी आहे, याची तरी आम्ही कधी दखल घेतों,

म्हणतां ? छेः, उलट बदनामीच्या कोळशांत परस्त्रियांच्या चारित्र्याची वेडीवाकडी चित्रं रंगविण्यांतच आम्ही रंगून जातों. नव्हे, चव्हाट्याचव्हाट्यावर टोळक्यानं बसून अशीं चित्रं रंगविणं हा शिळोप्याच्या वेळचा आमचा करमणुकीचा मुख्य विषय असतो. मेलेल्या बेवारशी जनावरांवर गिधाडांची धाड पडते, त्याप्रमाणं स्त्रियांचं चारित्र्य हा आपल्या कुटाळ करमणुकीचा बेवारशी ठेवा समजून त्यावर आमची मचमच सारखी सुरू असते. आणि कुटाळ करमणूकींत आनंद मानणाऱ्या अशा नादानांकडून बायकांनीं आपल्या सचोटीची शाबासकी मिळवायला हवी अशी आम्ही अपेक्षा करतों; ती पुरी झाली नाहीं कीं तात्काळ एखादं 'दिव्य' करायला फर्मावतों.

नरभक्षक वाघाच्या उपद्रवामुळं हैराण झालेल्या प्रजेला संरक्षण न देतां उलट त्या वाघाला पाळीव कुत्र्यासारखं शेपटीचा गोंडा हालवीत आपल्या मागून चालायला लावा, आणि तें जमत नसेल तर पिसाळलेल्या सिंहाच्या आयाळाचा लगाम करून त्याच्या पाठीवरून नगर प्रदक्षिणा करा, असं फर्मावणाऱ्या क्रूर राजाच्या माथेफिरू हुकमाहून आमचं वागणं कांहीं वेगळं आहे का ?

स्त्री ही एकाची पत्नी पण अनेकांची माता असते, अनेकांची बहीण असते, आपली शालीन कन्या असते. बाळपणीं आईच्या प्रेमानं आपलं संगोपन करते. प्रौढपणीं आमच्या कर्तृत्वाला कौतुकानं ओंवाळते. वृद्धपणीं आपल्या आशांचा आधार होते. अशा विविध कोमल नात्यांनीं आम्हा पुरुषांची सेवा करते ती. आणि आम्ही कृतघ्न तिची विटंबना करण्यांत धन्यता मानतों ! पण तिनं त्याबद्दल आमचा कधीं धिक्कार केला नाहीं !

स्त्रीजात म्हणजे जणू क्षमेची मूर्तिमंत पुतळीच ! पण या शापभ्रष्ट देवतेच्या मोठ्या मनाचं मोल आहे कोणाला ? ती कितीहि मोठं मन करो, आम्ही तिची परवड काढीतच राहणार ! नालस्ती करीतच रहाणार !

कोणत्या जन्माचं पाप फेडायला ती या स्त्रीजातीच्या जन्माला आली आहे कोण जाणे !!

## ७...

# नागोबाला दूध

नागोबाला दूध आणि दानव्याच्या नशिबीं गळाचा सूळ! आणि हें दूध पाजणाऱ्यालाच दंश करून यमसदनाला पाठविण्याइतका नाग कतघ्न असतांना आणि बिचारा दानवा कुणाला कसलाहि उपसर्ग देत नसतो तरी – काय हा न्याय? मानवी व्यवहारांत आजकाल हाच प्रकार जणू चालू आहे!

कुणाला आश्चर्य वाटेल पण जगांत सज्जनापेक्षां दुर्जनाचाच अधिक बहुमान होतांना दिसतो खरा! मग काय, लोकांना सौजन्यापेक्षां दुष्टपणाची आपुलकी अधिक वाटते? छे! छे! लोकांचा सौजन्याबद्दलचा सुप्त आदर वेळोंवेळीं उफाळून आलेला कैक वेळेला पहातोंय आपण! मग सज्जनापेक्षां दुर्जनाला अधिक मान मिळतो हें कसं?

बरेच दिवस हें कोडं मला कांहीं उलगडतां आलं नव्हतं. पण एक दिवस अचानक उलगडा झाला त्याचा.

त्याचं असं झालं. मी आणि माझा मित्र फिरायला म्हणून सहज बाहेर पडलों होतों त्या दिवशीं. संध्याकाळची वेळ असल्यानं माणसांनीं रस्ता गजबजलेला होता. रस्त्यानं जातांना पुष्कळ मान्यवर माणसं भेटत होतीं आम्हांला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 22380 वि: निबंध
क्रमांक 1184 नों दि 23/8/88



कुणी दाट परिचयाचं होतं, कुणी साधारण ओळखीचं होतं, तर कांहींना फक्त आम्हीच ओळखत होतों. प्रत्येकाला आम्ही आमच्या परिचयानुसार आणि ज्याच्या त्याच्या दर्जानुसार नमस्कार करून आमचा आदर दर्शवीत होतों.

असंच कांहींसं पुढं गेलों असेन नसेन, तोंच समोरून एक व्यक्ति येत असलेली दिसली. तिला पहातांच नकळत तिरस्कारानं आठ्या पडल्या माझ्या कपाळाला. मानानं मोठी होती ती व्यक्ति. गुणामुळं नव्हे—अधिकारामुळं, सत्तेमुळं. पण मनानं इतकी क्षुद्र होती, कीं तिची बरोबरी करणारी दुसरी व्यक्ति क्वचितच भेटेल. दुष्टपणा तर नसानसांत भरला होता तिच्या. आणि आढ्यता तरी केवढी? माजलेल्या पोळाचा दुसरा अवतारच! तिला पाहतांच मला खूप राग यावयाचा. पण तो आंतल्या आंत दाबून टाकीत होतों मी. कारण ती व्यक्ति सत्ताधीश होती. आणि सत्तेनं धुंद झालेल्या त्या व्यक्तीला तर प्रत्येकानं आपणांस वंदन केलं पाहिजे, आपला बहुमान केला पाहिजे असं वाटायचं. तसा जुलमाचा रामराम करणाऱ्यांनाहि कांहीं तोटा नव्हता. पण जुलमाचा रामराम आणि आदराचा सन्मान यांतील फरक ध्यानीं घ्यायची तसदी तिनं कधींच घेतली नाहीं. अशा जुलमाच्या नमस्कारानं आपला सन्मान झाला असंच वाटे तिला. आणि कुणीं असा रामराम करायला कसूर केलेली दिसली, कीं भरलीच त्याचीं शंभर वर्षे! असा ' नखशिखांत ' खुनशी माणूस होता तो.

आणि—

आणि असा हा माणूस एकदम माझ्यासमोर आला—नागासारखा. मला न कळतच चटकन् माझं तोंड दुसरीकडं वळलं. त्याच क्षणीं जवळून एक पूज्य, सन्माननीय व्यक्ति जात असलेली दिसली. आदरानं मस्तक खालीं लववून दोन्ही हात जोडले मीं तिला. दुसऱ्याच क्षणीं माझ्याबरोबर असलेल्या स्नेह्याकडं माझं लक्ष गेलं. जवळून जाणाऱ्या त्या पूजनीय व्यक्तीचं अस्तित्व त्याच्या गांवीहि नव्हतं जणू. कारण तो त्या दुष्टाला लवून नमन करण्यांत गुंतला होता! आणि ती व्यक्ति किंचित् हांसून आढ्यतेनं हालविलेल्या मानेनं त्याचा नमस्कार स्वीकारीत होती, आणि डोळ्याच्या कडांतून माझ्यावर संतापाचा अग्नि ओकीत होती.... मी तसाच पुढें गेलों.

थोडं पुढं गेल्यावर माझ्या मित्राकडं वळून मीं त्याला म्हटलं, ‘ त्या नीच माणसाला नमस्कार करण्यांत धन्यता वाटली तुला ! आणि जवळून गेलेल्या त्या पूजनीय व्यक्तीकडं तूं ढुंकूनहि पाहिलं नाहींस ! असा कसा रे तूं नादान माणूस ? ’

हें ऐकून माझा मित्र हंसला, आणि जराशानं एका निवांत जागीं जाऊन बसल्यावर तो म्हणाला, ‘ वेड्या, ती जवळून गेलेली पूजनीय व्यक्ति मी पाहिली का नव्हती ? पण ती थोर होती म्हणूनच मीं नमस्कार केला नाही आणि दुसरी व्यक्ति दुर्जन होती म्हणूनच तिला आधीं नमस्कार केला.’

या विचित्र बोलण्यानं क्षणभर मी गोंधळून गेलों. पण तेवढ्यांत माझा मित्र पुढं बोलूं लागला, ‘ दर वर्षी आपण नागपंचमीचा सण साजरा करतो. नागोबाला दूध पाजतो. तें काय नागाच्या आद्य पूर्वजानं—त्या शेषानं आपल्या पृथ्वीचा भार आपल्या मस्तकावर सावरलाय त्याच्या उपकाराची स्मृति म्हणून ?—छे ! आपली पृथ्वी कशावर सांवरलेली आहे हें आपणास चांगलं माहीत आहे. आणि त्याच्याशी शेषाचा काडीइतकाहि संबंध नाहीं हें काय कुणाला माहीत नाहीं ?—तरीहि नागाची पूजा करून पंचमीचा सण आपण साजरा करतो दरसाल.

‘ कां ?—नागासारख्या दुष्टाला प्रथम वंदन केलें पाहिजे हें रागाच्या भरांत नेहमीं विसरतो आपण, त्याचा विसर होऊं नये म्हणून. सज्जनांच्या उदार अंतःकरणांत आपल्या चुकलेल्या कृत्याकडं क्षमाशील दृष्टीनं पहाण्याइतकी दया असते. शिवाय नमस्काराचा बाह्योपचार केला नाहीं तरी अंतर्मन त्या थोर व्यक्तीला शतशः प्रणाम करीत असतं हें तूं विसरू नकोस. उलट क्षमा, दया या नाजुक भावना दुर्जनांना माहीतच नसतात. मग केवळ बाह्योपचारानं आपलं वैर करण्यापासून त्यांना दूर ठेवतां येत असेल, तर वरकरणीं दोन हात जोडायला काय बिघडयंत ? तुला वाटत असेल ही लाचारी आहे. पण नाहीं, ही लाचारी नसून हा व्यवहार आहे—धूर्त व्यवहार बरं ! ’

८...

# कोपिष्ट माणूस

कोप हा एक वेडाचाच प्रकार आहे, असं पुष्कळदां म्हटल्याचं ऐकतों आपण. पण तें ऐकतों आणि दुसऱ्याच क्षणीं विसरून जातों. त्यावर फारसा कधीं विचारच करीत नाहीं आपण. पुष्कळ चांगल्या चांगल्या गोष्टी आपण ऐकतों. पण त्या एका कानानं ऐकतों आणि दुसऱ्या कानानं सोडून देतों. याहि बाबतींत असंच घडतं. निदान माझ्या बाबतींत तरी दुर्दैवानं तें घडलं होतं. मी कोपिष्ट होतों. क्षुल्लक कारणावरून नित्यशः इतरांवर रागावर होतो, चिडत होतो. पण यांत न्याय्य रागावणं किती आणि वेडाचा भाग किती याचा कधीं विचारहि करीत नव्हतों.

दुसऱ्यांच्या अनुभवानं शहाणं न होतां स्वतःला ठेंच लागल्याशिवाय डोळे उघडायचे नाहींत, अशा वृत्तीची कांहीं माणसं असतात. त्यांतलाच मी एक होतों खास. पण ज्या अनुभवाच्या ठेचेनं माझे डोळे उघडले, ती इतकी भयंकर होती, कीं आज तिच्या नुसत्या आठवणीनं माझा जीव कासावीस होतोय! ती ठेंच मानसिक होती. पण शारीरिक वेदनेपेक्षां मानसिक वेदनाच अधिक दुःखदायक नसतात का? त्या मानसिक ठेचेच्या वेदना अजूनहि जाणवतात

मला. आणि या जाणिवेनंच मला जाग आली होती. रागाच्या भरांत आपण केवढं निर्दय वर्तन करीत होतो, याचं स्पष्ट चित्र या अनुभवानं माझ्या डोळ्यांपुढं प्रथम उभं केलं होतं.

अशा निर्दय अन्यायाचं दुःख काय असतं, हें त्या अवस्थेंतून गेलेल्या माणसाखेरीज इतरांना नाहीं उमजायचं. दुःखावर काळासारखं दुसरं औषध नाहीं म्हणे. पण माझ्या या दुःखावर काळाचं औषधहि निष्प्रभ ठरलं होतं. त्या प्रसंगाची स्मृति झाली, कीं आजहि पहिल्या दिवसाइतकीच काळजांत कुठं तरी तीव्र कळ उठते. आंत कुठं तरी भयंकर पीळ पडतो. आणि जिवाची जी असह्य तगमग होते, ती मग बराच वेळ कशानंहि शमत नाहीं.

माझ्या तगमगीचं कारण कळलं, म्हणजे तुम्हांला सुद्धां कल्पना येईल तिच्या तीव्रतेची. सुमारे वीस वर्षांपूर्वीची घटना आहे ही. माझी मुलगी नऊदहा वर्षांची होती त्या वेळीं. एकदोन दिवसावर वाढदिवस आला होता तिचा. त्या करतां शेजारच्या शिंप्याकडं छानदारसं परकर-पोलकं शिवायला टाकलं होतं. तें शिवून झालंय कीं नाहीं हें पाहण्यासाठीं दिवसांतून तिच्या किती खेपा होत होत्या, हें एक देवालाच माहीत ! अशीच एकवेळ ती शिंप्याकडं गेली असतां त्या परकर-पोलक्याबद्दल तिची आणि शिंप्याची कांहीं प्रश्नोत्तरं झालीं. पण तिच्याबरोबर गेलेल्या तिच्या मैत्रिणीस काय वाटलं कुणास ठाऊक. ती पळत पळत घरीं आली आणि मला सांगूं लागली कीं, " तुमची मुलगी शिंप्याबरोबर भांडायला लागलीय, गाढव म्हणाली त्याला ! "

" गाढव म्हणाली ? " मी संतापून ओरडलों, " कुठं आहे कारटी ती ? त्या म्हाताऱ्या शिंप्याला गाढव म्हणण्याइतकी मोठी झालीय कां ही ? "

इतक्यांत माझी मुलगी तिथं आली. तिच्या मनांत मला कांहीं तरी सांगायचं होतं. कारण आशाळभूत नजरेनं पहात ती माझ्या अगदीं जवळ आली. पण लाडिकपणानं ती मला कांही तरी सांगणार, तोंच काडकन् मीं तिच्या मुस्कटांत मारली.

" त्या शिंप्याला गाढव म्हणालीस नाहीं का ? " मी ओरडलों.

" नाहीं, नाहीं म्हणाले..." ती चांचरत आणि गाल चोळीत कसं तरी उत्तरली.

" वर खोटं बोलतेस ?–" असं म्हणून पुन्हा एक सपाटा लगावलाच मीं, त्यावेळीं डबडबलेल्या डोळ्यांनीं अशा कांहीं केविलवाण्या मुद्रेनं तिनं माझ्याकडं पाहिलं, कीं ती कांगावा करीत आहे असंच समजून मी पुन्हां एक मुस्कटांत मारणार तोंच—' हं, हं, आबासाहेब काय हें ?' असं म्हणत तो शिंपीच आमच्या दोघांमध्यें उभा राहिला.

" तुम्हांला ही गाढव म्हणाली नाहीं का ? " मी शिंप्याला विचारलं. माझ्या शब्दांत तिच्याबद्दलचा राग अजूनहि भरून ओसंडत होता !

" छे छे, मला गाढव कशाला म्हणतील त्या ! मीं त्यांना सहज म्हटलं, कीं तुमचं परकर-पोलकं आणखी दोन दिवस नाहीं व्हायचं. तेव्हां हिरमुसल्या होऊन त्या म्हणाल्या, ' माझा वाढदिवस आहे उद्यां. भल्या पहाटें उठून आंघोळ करून नवीन परकर-पोलकं घालायचं आहे मला. तेवढं आजच्या आज द्या ना शिवून—द्याल ना ? ' मीं म्हटलं, ' बघीन जमलं तर. ' केवळ थट्टा केली त्यांची. पांचच मिनिटांत परकर-पोलक्याची गुंडाळी त्यांच्या हातांत ठेवून चकीत करणार होतों मी पण तेवढ्यांत त्या घरीं निघून आल्या. आंत काजं करायचं काम चाललं होतं. हें पहा, काजं होतांच परकर-पोलकं घेऊनच आलोंय बरोबर. मला वेडवाकडं कांहीं एक म्हणाल्या नाहींत त्या, " एवढं एका दमांत बोलून काखोटीची परकर-पोलक्याची गुंडाळी शिंप्यानं माझ्या हातांत दिली.

" मग ती पोरगी कसं म्हणाली, कीं ही तुम्हाला गाढव म्हणाली म्हणून ?— "

" कोण मुलगी ? "

" काय ग ? " म्हणून मीं बाजूला पाहिलं. पण ती आगलावी मुलगी जाग्यावर होती कुठं ? ती केव्हांच पसार झाली होती !

" नाहीं, साफ खोटं. मला कशाला गाढव म्हणतील त्या !... "

अरेरे, या वृद्ध शिंप्याला माझी मुलगी कांहीं एक वेडंवाकडं बोलली नव्हती तर ? आणि मीं तिला अकारणच सपाटे लगावून मोकळा झालों होतो ! मी तिला सपाटे मारले होते, पण आतां कुणीं तरी माझ्या मुस्कटांत मारीत आहे असं वाटलं मला ! तिथं आतां उभं राहणं मला अशक्य झालं. झट्कन तोंड वळवून मी माझ्या खोलींत आलों नि कोचावर अंग टाकून दिलं.

मी इतका शरमून गेलों होतो, कीं उघड्या डोळ्यानं जगाकडं पहायचाहि मला धीर होईना. मीं गच्च डोळे मिटून घेतले. तेंच दृश्य मिटलेल्या डोळ्या-समोर अधिकच नाचूं लागलं. कांहीं तरी अपेक्षेनं आशाळभूत नजरेनं पहात माझ्याकडं लगबगीनं माझी मुलगी आली काय आणि मागचा पुढचा कसलाहि विचार न करतां खाडकन् मुस्कटांत मारून तिच्या अपेक्षेचा मीं चक्काचूर केला काय ! या अनपेक्षित प्रकारानं ती भांबावून गेली होती. डोळ्यांत आसवं दाटलीं होतीं, कंठ भरून आला होता. मुद्रा केविलवाणी झाली होती. पण मोठ्यानं रडायचीहि तिला चोरी झाली होती. भळभळा आसवं गाळायचीहि भीति वाटत होती. एखाद्या असहाय्य जीवानं अत्यंत भरंवशानं एखाद्याच्या आश्रयाला जावं आणि त्यानंच त्याला लाथ मारून बाहेर काढावं अशी करुणा-स्पद अवस्था झाली होती तिची ! – हें एकंदर दृश्य डोळ्यांपुढं येतांच एकदम भडभडून आलं मला. हुदंका अनावर झाला. आणि त्याच वेळीं पलिकडच्या खोलींतून मुसमुसून रडत असल्याचा माझ्या मुलीचा दबलेला आवाज माझ्या कानीं आला. मग तर माझ्या शोकाला सीमाच राहिली नाहीं.

चटकन् रागावण्यानं माणूस किती आंधळा बनतो, किती अन्यायी बनतो, हें वरील उदाहरणानं चांगलं कळून आलं मला. पण हें कळून येण्यापूर्वी मीं असे किती अनन्वित प्रकार केले असतील कोण जाणे ! त्याचा शांतपणें विचार करूं लागलों म्हणजे माझी मलाच लाज वाटते आतां. कारण यापूर्वी घरांत मार-हाणीचे प्रकार जरीं अधूनमधून होत होते, तरी माझी करड्या चढत्या सुरांत बोलण्याची तऱ्हा नित्याची होती. शब्दांत मार्दव, समंजसपणा किंवा आपुलकीचा मागमूसहि असायचा नाहीं. त्यामुळें घरांतील मुलंमाणसं मला अगदीं घाबरून

असत. मी घरीं असलों कीं तीं इतकी चूपचाप असत, कीं कुणाला वाटावं घर ओसच पडलंय. पण असं शांत घर असलं कीं मी मनातल्या मनांत खूष असें. केवढा हा माझा दरारा? अशा विचारानं संतोष व्हायचा मला. विकृत संतोष !

पण माझ्या अशा करड्या, चिडक्या स्वभावानं इतरांच्या संतोषाचा मीं अगदीं चोळामोळा करून टाकला होता, याची मला दखलहि नव्हती.

जरा कुणीं माझ्या मनाविरुद्ध वागलं, कीं माझ्या रागाचा पारा एकदम चढत असे. माझा अपमान करण्यासाठींच ते तसं वागले असले पाहिजेत असं मला वाटे. माझ्या मनाविरुद्ध वागणूक झाली असली तरी ती तशी व्हायला इतरांना कांहीं सबळ कारण घडलं असेल, असं चुकूनसुद्धां कधीं माझ्या मनांत येत नसे.

तसंच घरच्या मुलामाणसांनीं कसं वागलं पाहिजे याबद्दलच्याहि माझ्या कांहीं खास कल्पना होत्या. त्यांचं कुणी उल्लंघन केलं कीं त्याचं पुरेपूर प्रायश्चित्त दिल्याखेरीज माझ्या मनाची खवखव कमीच होत नसे. माझ्या आवडीनिवडी-खेरीज घरच्या मुलामाणसांनीं आपली स्वतःची वेगळी आवडनिवड केलेली तर मला बिलकूल आवडत नसे. माझ्या मुलीच्या सातव्या कीं आठव्या वाढदिवशीं तिला एक लहानशी साडी आणा असं माझ्या बायकोनं मला सुचविलं होतं. माझ्या मुलीलाहि साडी नेसायची फार हौस आहे हें मला कळून चुकलं होतं. पण तिचं साडी नेसायचं वय अजून खूप दूर आहे. नसत्या वयांत नसता हट्ट करणं हा एक मूर्खपणा आणि त्याचं कौतुक करणं हा दुसरा मूर्खपणा, असं माझ्या बायकोला स्पष्ट सांगून मीं त्या वाढदिवसाला एक फ्रॉकच घेऊन दिला होता. आधींच्या पांचचार फ्रॉकमध्यें आणखी एकाची भर पडली होती एवढंच. त्या नव्या फ्रॉकची कुणीच विशेष दखल घेतली नव्हती. पण त्याचीहि मला पर्वा नव्हती.

माझ्या मुलीला मीं नवी साडी घेऊन दिली नव्हती तरी मीं घरीं नसलों, कीं आपल्या आईची जुनीपानी साडी नेसून ती आपली हौस पुरवून घेत होती. हा 'पोरखेळ' अनेक दिवस केला असता तिनं. पण एक दिवस अचानकपणें तो

माझ्या दृष्टीला पडला ! असंच एके दिवशीं मीं घरीं नाहीं असं पाहून जुनं पातळ नेसून माझी मुलगी आपल्या इतर मैत्रिणींबरोबर कसला तरी धांगड-धिंग्याचा खेळ खेळत होती. त्यांचा खेळ ऐन रंगांत आला होता आणि नेमकं त्याच वेळीं एका पाहुण्यासह मी दारांत येऊन उभा राहिलों.

दारांत कुणी तरी आल्याची चाहूल लागतांच माझ्या मुलीनं चमकून दाराकडं तोंड वळविलं आणि त्याच क्षणीं माझी आणि तिची दृष्टादृष्ट झाली. माझी रोखलेली तीक्ष्ण दृष्टि पाहतांच तिची गाळण उडाली. तें नेसलेलं पातळ सोडून माझ्या दृष्टीआड करतां करतां पुरे वाट झाली तिला. पण अखेर तें तिनं दूर फेकून दिलं होतं. अत्यंत आवडीनं नेसलेलं तें पातळ एखादी गलिच्छ वस्तु अंगावरून झटकून दूर फेकून द्यावी त्याप्रमाणं तिनं तें फेकून दिलं होतं. रागानं गरगर डोळे फिरवीत कसा तरी पाहुण्यांना घेऊन मी माझ्या खोलींत गेलों. तिथें जमून दंगामस्ती करणाऱ्या साऱ्या पोरींची, विशेषतः जुनं पातळ नेसण्याचा ‘ पोरखेळ ’ करणाऱ्या माझ्या मुलीची, चांगली खरडपट्टी काढायचा माझा बेत होता. पण बरोबर पाहुणा असल्यामुळं मला तसं करतां आलं नाहीं. आणि यामुळं तर मी अधिकच चिडून गेलों होतों. कुण्या परक्यांच्या देखत घरच्या मुलामाणसांवर तोंड च्यायला मी कमी करीत असें असं नव्हे. तेवढा निस्संग होतों मी. पण आजचा पाहुणा अगदीं वेगळ्या दर्जाचा होता. त्यामुळं मुकाट्यानं गप्प बसण्याखेरीज मला इलाजच उरला नव्हता.

पण तीच घटना आठवून आज विचार करूं लागलों म्हणजे माझ्या त्या क्षुद्र मनोवृत्तीच्या पश्चात्तापानं जीव जळतोय माझा. लहान मुलींना मोठ्या बायकांसारखं पातळ नेसून मिरवायची स्वाभाविक आवड असते. जुनं पानं पातळ नेसून माझी मुलगी ती हौस पुरवून घेत होती. पण तिचा हा बिनखर्ची निरागस आनंद माझ्या विकृत मनोवृत्तीला खुपत होता !... माझ्या भीतीनं तिनं पुन्हां कधीं असं पातळ नेसलं नव्हतं ! हौस पुरवून घेतली नव्हती ! आणि म्हणूनच तें आठवलं, कीं पश्चात्तापानं जीव जळतोय आज !

कोपिष्ट माणूस हा खुनशी नसेल, पण क्षुद्र असतो खास. क्षुद्र आणि स्वार्थी ! तो नेहमीं आपलीच सोय पहातो. आपलेच विचार दुसऱ्यावर लादतो.

आपलाच हेका चालवीत असतो. पण त्याप्रमाणं सदाकाळ घडून येणं कधींच शक्य नसतं; आणि मग तो अधिकच चिडतो, कातावतो, संतापतो, मारहाण करायला प्रवृत्त होतो, स्वतःचें मनःस्वास्थ्य गमावून बसतो आणि इतरांचं मनःस्वास्थ्य गमावतो.

परवा पुण्यांत एक तरुणी पदराला आग लागून पेटली. तिला मदत करायला म्हणून धांवून येणाऱ्या नवऱ्याला तिनं मिठी मारली आणि अखेर दोघंहि पेटून होरपळून मरण पावले. त्याप्रमाणें एवढ्यातेवढ्यानं संतापणारा माणूस हा सदा पेटलेल्या अवस्थेंतच असतो आणि ज्याच्या ज्याच्या संगतींत येईल त्याला त्याला होरपळून टाकून जिवंतपणीं मरणाच्या यातना देत असतो. रिकामं भांडं चटकन् तापतं त्या प्रमाणं चट्कन् तापणारा माणूस हाहि रिकाम्या माथ्याचाच असला पाहिजे. त्या शिवाय आपल्या जीवनाबरोबर इतरांच्या जीवनाचाहि वणवा त्यानं खचित पेटवला नसता !

मीहि असा सदा पेटलेलाच असें. मग शांति, सुख, समाधान, आनंद यांची तोंडओळख तरी कुठून असणार मला ? पण तें मला नको होतं असं मात्र नव्हे. मला तें सर्व कांहीं हवं होतं, पण तें माझ्या कोपिष्ट वृत्तीनं वागून हवं होतं. पण पाणी आणि अग्नि यांचं साहचर्य संभवत नाहीं, त्याप्रमाणं संताप आणि सौख्य यांचे सख्यहि शक्य नाहीं हें मला उमजत नव्हतं.

एका पात्रांतून वहात असूनहि गंगायमुनांचे प्रवाह एकजीव होऊं नयेत, त्याप्रमाणं माझं आणि माझ्या मुलामाणसांचं जीवन चाललं होतं. ‘ राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ॥ ’ असं म्हणतात. पण मीं माझ्या घरच्या माणसांचीं अंतरेंच दुरावून बसलों होतों, मग कसल्या भाग्याची अपेक्षा करणार मी ? मुळांतच ‘ सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥ ’ हा साऱ्यांच्या जीवनांतला एकंदर वांटा. पण मी माझ्या वागणुकीनं इतरांच्या आयुष्यांतील सुखाचा हा अल्पसा वांटाहि नष्ट करून टाकला होता. आणि मी स्वतः रागानें सदा पेटलेला असल्यामुळं अंतर्यामीं जळत होतों. जीवनांतील साऱ्या आनंदाचाच मारेकरी झालों होतं मी. संसारांत स्वतःची थोडीशी गैरसोय

सोसून दुसऱ्याची सोय पाहिल्यानं, दुसऱ्याला आनंद होईल, समाधान होईल, असं वागण्यानं आपण स्वतःचाच आनंद, समाधान मिळवत असतो, हें त्या वेळीं मला उमजलं नव्हतं. स्वतःचीच सोय पाहिल्यानं नव्हे, तर इतरांसाठीं केलेल्या बारीकसारीक त्यागानंच संसारांत आनंदाचं भव्य मंदिर आपण उभं करीत असतों हें माझ्या ध्यानीं येत नव्हतं.

हा सर्व मजकूर वाचून कुणाला वाटेल, कीं कुणावरहि आणि कोणत्याहि परिस्थितींत रागावणं हें एकंदरींत वाईटच असं मला म्हणायचं आहे. पण नाहीं. कांहीं माणसावरचा कांहीं कांहीं वेळचा राग समर्थनीय तर असतोच, पण आवश्यकहि असतो. नव्हे, कांहीं कांहीं वेळां न रागावणं हेंच आपल्या नादानपणाचं लक्षण ठरतं. समजा, एखाद्यानं आपल्या पूजनीय देवतेचा किंवा वंदनीय विभूतीचा अनादर केला, तर काय चवताळून उठून आम्हीं त्याला त्याचा जाब विचारायचा नाहीं ? समजा, एखाद्यानं आपल्या आयाबहिणींच्या अब्रूला हात घातला, तर काय संतापानं दांत ओंठ खात आम्हीं तो हात कलम करायला धावायचं नाहीं ? समजा, एखाद्यानं आमच्या अमोल हक्कावर अन्यायानं अतिक्रमण केलं, तर काय अनिवार रागानं प्रतिकार करून त्याची हड्डी मऊ करायची नाहीं ? ज्याला सत्य, शिव आणि सुंदर यांचा अनादर, अपमान आणि अवहेलना पाहून राग अनावर होत नाहीं, तो माणूस कसला ? शुद्ध नादान, निर्लज्ज, षंढ तो !

पण म्हणून माणसानं एवढ्यातेवढ्या कारणानं रागावत सुटणं मात्र केव्हांहि समर्थनीय ठरणार नाहीं. असा राग पुष्कळ वेळां आंधळा आणि अविचारी ठरण्याचाच अधिक संभव, आणि म्हणूनच तो आपल्या व इतरांच्या दुःखाला अधिक कारण होतो. शीघ्रकोपी स्वभाव तर स्वतःच्या आणि इतरांच्या दुःखाला कारण होणारा वडवाग्नीच !

मीहि असाच शीघ्रकोपी होतों. कोपानं सदा जळत होतों, आणि दुसऱ्यांना जाळत होतों. या भयंकर सत्याची जाणीव मला माझ्या मुलीच्या त्या परकरपोलक्याच्या प्रसंगानं झाली. माझे डोळे चांगले उघडले त्यानं. तेव्हांपासून

पूर्ण विचार केल्याखरीज कुणावरहि अकारण रागवायचं नाहीं असा मीं निश्चय केला; आणि तितक्याच निग्रहानं आजवर मीं तो पाळला व आजहि पाळीत आहे. त्यानं लाभणाऱ्या मनःशांतीचं, समाधानाचं, सुखाचं वर्णन मला करतां येणार नाहीं. तें ज्याचं त्यानंच अनुभवायला हवं.

पण हें सौख्य भोगायला मीं फार मोठं मोल दिलं आहे. एकीकडं मी हें सौख्य भोगतों खरा, पण तें मिळवून देणाऱ्या त्या करुण प्रसंगाची आठवण झाली, कीं आजहि काळजांत कुठं तरी तीव्र कळ उठते. आंत कुठं तरी भयंकर पीळ पडतो आणि मग जिवाची जी असह्य तगमग होते, ती मग बराच वेळ कशानंहि शमत नाहीं. म्हणून देवा, तुझ्याजवळ एवढंच मागायचं आहे मला, कीं माझ्या-सारखे जे कोणी शीघ्रकोपी असतील त्यांना सद्‌बुद्धि देण्यासाठीं असं जन्मभर बोंचणाऱ्या पश्चातापाचं मोल द्यायला भाग पाडूं नकोस. उद्यां त्यांना मिळणाऱ्या समंजस शांतपणाच्या सौख्याला पश्चातापाच्या भयंकर बोंचणीचं असं गालबोट लावूं नकोस.

## अडला नारायण

गळ्यापर्यंत चढलेल्या नदीच्या प्रवाहांतून पायीं पैलतीर गांठतांना पायांतल्या वहाणा डोकीवर धराव्या लागतात. म्हणून कांहीं त्या शिरोधार्य ठरत नाहींत.

१....

# आरसा

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

पुरुषाला पत आणि स्त्रीला पातिव्रत्य भूषणावह असतं यांत शंका नाहीं. त्या त्या गुणामुळंच स्त्री-पुरुषांना जगांत मोल असतं. पण हे गुण स्त्री-पुरुषां-जवळ नुसते असून भागत नाहींत तर ते असल्याबद्दलची पावती जगानं द्यायला हवी असते. एरवीं ते असून नसल्यासारखेच ठरतात ! पुरुषाची पत ही जगानं मान्य करण्यावरच अवलंबून असते हें उघडच आहे. ती जगानं मान्य केली नाही, तर पुरुषाला पतीवर व्यवहारच करतां येत नाहीं. पण स्त्रीलाहि आपलं पातिव्रत्य जगानं मान्य केल्याशिवाय जीवनांत स्थान राहूं नये हें केवढें आश्चर्य !

जग हें आरशा सारखं आहे असं पुष्कळ वेळां म्हटलं जातं. असं म्हणणाऱ्यांना सुचवायचं असतं, की आरसा हें आपलं सत्य स्वरूप दाखविणारं प्रामाणिक साधन आहे, तसं जगाचं मतप्रदर्शन हें आपलं खरंखुरं रूप चित्रित करीत असतं. वास्तविक आरसा हा आपलं सत्यस्वरूप दाखवितो, हेंच तितकंसं खरं नाहीं. आणि जगाचं मतप्रदर्शन हें आपलं खरं रूप चित्रित करतं हें तर त्याहूनहि खरं नाहीं. हं, जग हें आरशासारखं आहे, पुष्कळ बाबतींत

आरशासारखं आहे. पण तें अगदीं वेगळ्याच बाबतींत. आरसा हंसणाऱ्याबरोबर हंसतो, रडणाऱ्या बरोबर रडतो. कुणाला वाटावं केवढं प्रगाढ प्रेम हें ! पण खरं पाहिलं असतां तो इतका हृदयशून्य आहे, कीं पाहणाऱ्याची पाठ फिरतांच त्याच्या भावनेचा मागमूसहि आरशांत उरत नाही!

एखाद्या माणसाबद्दलची जगाची भावना तरी याहून वेगळी कुठं आहे? वरकरणीं आपलं आगतस्वागत करणारं हें जग पाठ फिरतांच आपली कितीशी बूज ठेवतं? निर्विकारपणें आपणाला लगेच तें विसरून जात नाहीं का? तोंड-पुजेपणा हा तर आरशाचा प्रमुख गुण. आपल्याबद्दलची जगाची पुष्कळशीं मतं अशींच तोंडदेखलीं नसतात का? आणि आरशाच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल—नव्हे स्पष्टदर्शीपणाबद्दल बोलायचं झालं, तर तें केवळ बाह्यांगापुरतंच खरं म्हणतां येईल. कुणाच्या अंतर्यामाचें खरें दर्शन आरशानं आजवर कधीं घडविलं आहे? एखाद्याबद्दलची जगाचीं मतं सुद्धां अशींच केवळ बाह्य कारणानं बनविलेलीं असतात. खोलांत जाऊन खरं खोटं पहाण्याची तसदी घेतो कोण?

एखाद्या वस्तूचा निर्मळपणा विशेषत्वानं वर्णायचा झाला, कीं तिला आरशाची उपमा देतात. पण आरसा निर्मळ आहे हेंच मुळीं खरं नाहीं. खरं सांगायचं तर त्याला पाहाणारी दृष्टि निर्मळ असते ही त्यांतील खरी गोम आहे. सज्जनाला सारं जग सज्जन दिसतं आणि दुर्जनाला दुर्जन दिसतं. हाहि त्यांतलाच प्रकार.

बरं, आरसा आमचं बाह्य स्वरूप तरी यथातथ्य स्वरूपांत दाखवीत असेल म्हणावं, तर त्यांतहि पुष्कळदां आपली फसगत होते. आमचं हुबेहूब प्रतिबिंब उमटविणारे प्रामाणिक आरसे फार थोडे. कांहीं तरी विकृत स्वरूप देऊन फुगीर गाल, बसकें नाक, तिरळे डोळे, आणि लोंबती हनुवटी, असं अवयवांना कांहींच्या-बाहींच आकार देणारे वक्र मनोवृत्तीचे आरसेच फार. असहिष्णु जगाची मनो-वृत्तीहि याच जातीची. गुण जवाच्या मापानं आणि दोष पर्वताच्या तोलानं मापायचे, एवढचं तिला ठाऊक. मग माणसाच्या अंगच्या गुणांचं योग्य मूल्यमापन आणि त्याचं उचित चीज या जगांत व्हावं कसं?

असहिष्णु वृत्तीमुळं इतरांकडून आपल्या गुणांचं चीज होत नाहीं, त्याप्रमाणं फाजील आपलेपणामुळं स्वतःच्या गुणाला आम्ही अवास्तव महत्त्व देऊन बसतों. अंतीं दोन्हीचा परिणाम मात्र एकच—निराशा आणि दुःख !

कधीं काळीं इतरांची काकदृष्टि आणि स्वतःची आपुलकी यांची युति जमेल त्याच वेळीं सहानुभूतीचा टीकाकार जन्माला येईल आणि माणसाच्या अंगच्या गुणांचं यथायोग्य मूल्यमापन होईल, तोपर्यंत हें असंच चालायचं, हेंच खरं.

## पांढरे-काळे

शुभ्रपणा हा शुचितेचं लक्षण मानलं जातं, पण म्हणून कोड कधीं कुणाला आदरणीय वाटलं आहे ? काळेपणा हा मलिनतेचं लक्षण होय, पण म्हणून एखाद्या युवतीचे काळे कुरळे केस कुणाला कमी मोहक वाटले आहेत ?

१०...

# सावधान !

आत्मविश्वास हा माणसाला आवश्यक असलेल्या गुणांपैकीं एक होय, यांत शंका नाहीं. तथापि योग्य आत्मविश्वास आणि फाजील आत्मविश्वास यांच्या सीमारेषा एकमेकांत इतक्या मिसळून गेलेल्या असतात, कीं योग्य आत्मविश्वास संपतो कुठं आणि फाजील आत्मविश्वास सुरू होतो कुठं, हेंच पुष्कळदा कळत नाहीं. त्यामुळं फाजील आत्मविश्वासच पुष्कळ वेळां योग्य आत्मविश्वाच्या गादीवर विराजमान झालेला असतो. आणि ही त्याची तोतयेगिरी इतक्या उशीरां ध्यानीं येते, कीं त्या वेळीं त्याचा कांहींच उपयोग नसतो. त्याच्या परिणामाचीं कटु फळं भोगण्याखेरीज दुसरा उपायच नसतो.

आत्मविश्वासामुळें माणूस बिनदिक्कतपणें नियोजित कार्याला हात घालतो आणि सहजतेनें तें पार पाडतो. पण फाजील आत्मविश्वामुळें तें घिसाडघाईनें तरी अंगावर घेतो, किंवा त्याची चालढकल तरी करतो. शिवाय फाजील आत्मविश्वासाच्या तोऱ्यांत आवश्यक तें अवधान न राखतां माणूस गाफील राहतों तें निराळेंच.

सहजगत्या घडलेल्या एका गोष्टीवरून मला याचें प्रत्यंतर आलें.

## ★ ★ ★ मनाचा पारवा ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

संध्याकाळीं नेहमीं मी फिरायला जातो त्याप्रमाणें त्यादिवशींहि नेहमीच्या तळयाच्या काठीं मी फिरायला गेलो होतो. त्या तळयाच्या उतरंद पाळीवर आडवा होऊन एक शिकारी विसांवा घेत होता. तो अत्यंत नेमबाज आणि तरबेज शिकारी होता. आपल्या कष्टार्जित कौशल्याचा त्याला अभिमानहि होता. पण आज मात्र त्याच्या एकंदर अवतारावरून त्याची दिवसभरची पायपीट वायां गेलेली दिसत होती. कारण त्यानं एकादी शिकार साधल्याचं चिन्ह त्याच्या जवळपास नव्हतं. आणि दमून व निराश होऊनच त्यानं जमिनीवर अंग टाकलेलं होतं, हें कुणालाहि सहज ओळखू येण्यासारखं होतं. पडल्या पडल्याच त्याची नजर पाणभुईवरून फिरत होती. त्या तळयांतील पाणी त्यावेळीं इतकें स्थिर आणि नितळ होते, कीं आरशांत पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणें आजू-बाजूची सृष्टि त्या पाणभुईवर उमटून दिसत होतीं. हें दृश्य पहाण्यांत तो रमून गेला होता कीं काय कोण जाणे.

तोंच पडल्या पडल्याच त्यानं आपली बंदूक सावरली. जवळच्या झाडावर नुकताच एक पारवा येऊन बसला होता. पण बंदूकीचा नेम त्या पारव्यावर धरलेला नव्हता तर पाण्यांत पडलेल्या त्याच्या प्रतिबिंबावर !

त्यानं हें काय चालविलं आहे याचा क्षणमात्र मला बोधच झाला नाहीं.

पण दुसऱ्याच क्षणीं बंदूकीचा बार उडाला —पाण्यांतील पारव्याच्या प्रतिबिंबावर नेम धरलेल्या बंदुकीचा ! गोळीच्या माऱ्यासरशीं तळयांतील पाणी उसळलें आणि पारव्याचें प्रतिबिंब लुप्त झालें !

या साऱ्या दृश्यानं तो शिकारी चांगलाच भांबावला ! काय झालंय हें त्याचं त्यालाच कळेना ! विचार करीतकरीतच चटकन् तो सावरून बसला. सहज त्यानं वर पाहिलं. बंदूकीच्या आवाजानं भिऊन पारवा उडून चालला होता. खालीं बंदुकीच्या गोळीनं उसळलेलं पाणी अजूनहि लाटांच्या रूपानं हेंदकाळत होतं !

आणि हें विदारक सत्य ध्यानीं येतांच गाफीलपणानं बंदूक चालवून अखेरची शिकारहि आपण गमावून बसलों या उद्वेगामुळं त्या शिकाऱ्यानं खालीं मान घातली होती !

## ★ ★ ★ अठ्ठेचाळीस ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

११...

# जोंवरीं असतीं शितें

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

मानवी जीवनांत प्रीतीचं महत्व किती आहे, हें मीं नव्यानं सांगायला नको. या प्रीतीमुळंच जीवनाच्या पेल्यांत आनंदाचं अमृत ओसंडेपर्यंत भरलं आहे. जीवनांतून प्रीति वजा केली, कीं बाकी उरेलं एक भलं मोठं पूज्य ! प्रीति असेल तरच या जीवनांत जगण्यासाररखं कांहीं तरी आहे. नाहीं तर जीवन म्हणजे एक रुक्ष, ओसाड, प्रदीर्घ वाळवंटच ! संसाराच्या तापानं होरपळून निघणाऱ्या जीवाला विसांव्याला ना जिथं सांवली, कीं तहानेनं व्याकूळ झालेल्या जीवाला तृप्त करायला ना जिथं पाणी ! म्हणून मानवी प्राणी प्रीतीसाठीं सदा आसुसलेला दिसावा हें अगदीं सहाजिक आहे.

मानवी जीवनांत प्रीतीला एवढं मोल आहे म्हणून मागणी तसा पुरवठा या न्यायानें तिचा पुरवठाहि त्याच प्रमाणांत भरपूर होत असेल अशी कुणाची कल्पना असेल, तर तो निव्वळ भ्रम होय ! खरी प्रीति इतकी दुर्मीळ आहे, कीं तिचा लाभ होणारे भाग्यवान या जगांत फार थोडे ! एकीकडं मालाची मागणी तीव्र व्हावी पण इकडं मालाचा सांठा मात्र जेमतेम असावा; म्हणजे लुच्चा व्यापाऱ्याला जसं भेसळ करायला फावतं, तसं जीवनाच्या बाजारांत खऱ्या

प्रीतीचा पुरवठा अगदींच जुजबी होत असल्यामुळें खोट्या बनावट प्रीतीच्या व्यापाराला चांगलीच तेजी आली असेल तर त्यांत नवल तें काय ?

अपुऱ्या पुरवठ्याच्या दिवसांत भेसळ व बनावट माल मिळवायलासुद्धां जसं दामदुप्पट मोल मोजावं लागतं आणि तसं मोजण्याची तयारी असलेल्यांनाच तो मिळतो त्याप्रमाणं प्रीतीचा लाभसुद्धां पुष्कळदा पैसेवाल्यालाच होत असतो. प्रीतीसाठीं प्रीतीचा लाभ होणं हें दिवास्वप्न असून, स्वार्थासाठीं प्रीति हा जीवनाचा दस्तूर आहे.

माझं हें विधान पुष्कळांना अतिशयोक्त वाटेल. कित्येक जण खऱ्या प्रीतीची म्हणून अनेक उदाहरणं तोंडावर फेकून मला गप्प करण्याचा प्रयत्न करतील. तरीहि मी त्यांना नम्रपणें सांगेन, कीं बाबांनों, तुम्ही म्हणतां इतकी खरी प्रीति नक्कीच सवंग नाहीं. तुम्ही सांगणार असलेल्या उदाहरणांपैकी कित्येक भ्रममूलक असण्याचाच अधिक संभव आहे. तुम्हीं नेहमीं नेहमीं खऱ्या प्रीतीचं उदाहरण म्हणून दीपज्योतीवर झडप घालणाऱ्या पंतगाचं नांव पुढं करीत असता, पण त्यांत सुद्धां खऱ्या प्रीतीचं अस्तित्व आढळून येत नाहीं मला !

तसं पाहिलं तर प्रीतीचं बनावट नाणंच व्यवहारांतील सर्रास चलनी नाणं होऊन बसलंय. इतकं, कीं त्याच्या बनावटपणाची साधी शंकासुद्धां कुणाला येऊं नये. मग असलं बनावट नाणंच तुम्ही खरं मानून चालत असाल तर त्यांत तुमचा तरी काय दोष ? जग ही एक रंगभूमि आहे आणि माणसं हीं त्यावरील पात्रें होत असं म्हटलं जातं. पण हीं पात्रं नुसतींच पात्रं नसून अत्यंत कसबी आणि अभिनयकुशल अशीं पात्रं आहेत. विशेषतः प्रेमाचं नाटक तर तीं इतक्या कौशल्यानं करतात, कीं 'मी मी' म्हणणाऱ्यांना सुद्धां तें नाटक नसून एक चालतं बोलतं सत्य आहे असंच वाटतं. मग तुम्हालाहि तसंच वाटलं तर आश्चर्य मानायला नको !

आतां तेजाळ ज्योतीनं उजळलेल्या त्या दीपाचंच उदाहरण घ्या. ती पहा त्या दिव्याची धर्मपत्नी—छाया—त्याच्या सभोंवार कशी पिंगा घालीत आहे. बेहोषीनं अंग मोडमोडून, आपल्या पतीला सुखविण्यासाठीं एकसारखी नाचत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सुटली आहे ! तशींच तीं फुलपाखरं प्रसंगीं आत्मार्पण करावं लागलं तरी त्या ज्योतीसभोंवार धरलेला फेर सोडून दूर व्हायला तयार नाहींत ! आदर्श प्रीतीचं प्रतीक असंच कुणालाहि वाटेल त्यांना पाहून. पण खरंच ती तशी आहेत का ?

मीं शंका व्यक्त केली तरी तुम्हांला अजूनहि तशी शंका येत नाहीं. सहाजिक आहे. अजूनहि छायेचा—त्या दीप-पत्नीचा आपल्या पतीच्या सभोंवार पिंगा चालूंच आहे. फुलपांखरांचं रिंगण सुरूंच आहे ना !

थांबा, वारा वाहू लागला आहे. दीप थरथरू लागला आहे. छायेचा पिंगा बेहोषीची परिसीमा गाठींत आहे फुलपाखरं ज्योतीवर आदळून, भाजून, होरपळून निघत आहेत. माझी शंका फोल असल्याच्या समाधानानं तुमचा चेहरा उजळून निघाला आहे. मला कांहीं तरी सांगण्यासाठीं तुमचे ओठ वळवळूं लागले आहेत. पण थांबा...

वाऱ्याच्या वेग बराच वाढला आहे. चांगला सोसाट्यानं वाहूं लागलाय तो. त्याच्या सपाट्यानं दिवा आतां मालवतोय कीं मागाहून मालवतोय असं होऊन गेलंय. अरेरे ! वाऱ्याचा भलताच जोरदार झोत आला. आणि—

आणि दुसऱ्याच क्षणीं दीप मालवला गेला. तुम्हांला कांहीं तरी सांगायचं होतं, त्यापूर्वींच तो दीप मालवला गेला. आणि तें पहातांच तुम्ही भांबावून गेलाय ! समजलों. तुम्ही असे कां भांबावून गेलाय. त्याचं कारण समजलों मी. आणि मी काय म्हणत होतों तेंहि समजलां आहात तुम्ही.

पाहिलंत ? त्या दिव्याची पत्नी—ती छाया—त्याच्या सभोंवार मारे पिंगा घालीत होती. आतां कुठं गेली ती ? दिवा विझला ना ? पतीच्या मस्तकावरील ज्योतीचा सोन्याचा मुकुट नाहींसा झाला. वैभव लोपलं त्याचं. मग पत्नीचा पिंगा लोपला तर त्यांत नवल काय ? तीं फुलपांखरंहि पांगली कुठल्या कुठं! ज्योतीचं दिव्य तेज काळोखांत विलीन झालं ! त्याचं स्वत्व नष्ट झालं. मग कोण पुसतो आतां त्याला ? वैभवाच्या वेळचे सुखाचे सोबती वैभवाबरोबरच पार पांगले कुठल्या कुठं !

दीप ज्योतीवर झडप घालून आत्मयज्ञ करणारीं तीं फुलपांखरं पाहून दिव्य प्रीतीचं प्रतीक समजत होतां तुम्ही. पण खरं म्हणजे तो सोन्याचा मुकुट हस्तगत करण्याच्या लुंग्यासुग्याच्या प्रयत्नांचं फळ म्हणजेच फुलपांखरांचा तो आत्मयज्ञ ! कुठली प्रीति आणि काय ! सारा मतलबाचा मामला !

बनावट प्रीतीचं खोटं नाणं फक्त प्रसंगानचं असं उघडं पडतं. तोंपर्यंत खरं म्हणूनच व्यवहारांत तें चालू राहतं; आणि माणूसहि तें खरं समजूनच चालतो.

## या संसारीं !

देहास भूषविणारा अमोल मणी आणि देहाचा नाश करणारं जलाल विष यांनीं एकाच सर्पाच्या शिरीं वास करावा,

किंवा तेजस्वी प्रकाश आणि काळी काजळी एकाच दीपज्योतीपासून निर्माण व्हावींत,

किंवा गगनचुंबी शिखर आणि पाताळभेदी दऱ्या एकाच हिमालय पर्वतांत आढळून याव्यात,

किंवा सुंदर सुवासिक फुलं आणि तीक्ष्ण बोचरे कांटे एकाच गुलाबावर आढळून यावेत,

त्यांप्रमाणं हवं असलेलं सुख आणि नको असलेलं दुःख मानवाला एकाच संसारांत अनुभवाला येतात.

१२...

# आपलीं मुलं

आपलीं मुलं हीं आकाशींचीं फुलं आहेत, देवाचीं देणीं आहेत, असं प्रत्येकाला वाटत असतं. तीं दैवानं दिलेले जणू मायेचे अमृताचे कुंभ आहेत असं सारेच आईबाप समजतात. आणि त्या तोलानं पुष्कळजण त्यांच्यावर मायाहि करतात. ती करणं सहज प्रवृत्तीनंच घडतं. इथंच कित्येकांच्या कर्तव्याची परिसीमा संपते. कारण मायेबरोबर ज्या रीतीनं ते आपल्या अपत्यांचं संगोपन करतात, ज्या तऱ्हेनं ते त्यांना वाढवितात, त्यानं तीं देवाचीं देणीं अखेर कवडीमोल कथलाचीं लेणीं ठरलेलीं पुष्कळदां आपण पहातों.

आपल्या अपत्यांचं अनहित व्हावं असं कुणालाच वाटत नाहीं, हें खरं. पण केवळ तसं वाटून इष्ट कार्यभाग साधत नसतो. त्यासाठीं माया हवी असते ती अत्यंत विचारपूर्वक आणि जाणतेपणानं केलेली. निसर्गाच्या स्वाभाविक प्रेरणेनुसार अपत्यांना जन्म देतां येतो. पण अंतःकरणाच्या सहज प्रेरणेनुसार केलेल्या मायेनं त्या अपत्यांना योग्य वळण लावतां येत नाहीं. त्यासाठीं विशिष्ट ज्ञानाची आणि त्यानुसार आखलेल्या मार्गाच्या सक्त अंमलबजावणीची जरुरी असते. पण या बाबतींत त्यांच्या अज्ञानी अपत्यांहूनहि पिते अधिक अनभिज्ञ असल्याचें आढळून

येतें. आणि मग आपल्या स्वभावधर्मांनुसार कुणी कसाहि आपल्या अपत्यांना वाढवितो आणि अखेर त्यांचं जन्माचं अनहित करून ठेवतो !

कांही आईबाप आपल्या मुलांवर इतकी माया करतात, कीं त्यांच्या सभोंवार सदैव लपेटलेली रुईच्या कापसाची जशी काय मऊमऊ रेशमी दुलईच ! कांहीं गुलहौशी लोक असा मुलायम रुईचा कापूस तलम खुतनीच्या थैल्यांत भरून झोपण्यासाठीं त्याची गादी तयार करवून घेतात. पण त्यांना कल्पना नसते, कीं अशी गादी सुखावह झोंप येण्याच्या दृष्टीनं फारशी उपयुक्त नसते. भावनाशील ममताळू आईबापांचाहि असाच गैरसमज झालेला असतो. ते आपल्या मुलांवर माया करतात—निरतिशय माया करतात. जणूं अशी माया करीत राहणें हेंच आपलं इतिकर्तव्य आहे, अशी त्यांची समजूत असते. मग तीं मुलं कितीहि वाह्यात् असोत, उद्धट असोत, स्वछंद बेजबाबदारपणें वागोत, उचित अशा कठीण शब्दानीं त्या मुलांची कानउघाडणी करून त्यांची चूक सुधारणं आवश्यक असतं, हें त्यांच्या गांवींच नसतं, किंवा गांवीं असूनहि आपल्या उच्छृंखल मुलांची सक्त शब्दांनीं कानउघाडणी करणं त्यांच्या जिवावर येतं. अशा सक्त कठीण शब्दांनीं आपण आपल्या मुलांची माया गमावून बसूं अशी त्यांना भीति वाटत असते. आणि म्हणूनच त्यांच्या दोषांकडं आणि दुर्गुणाकडं दुर्लक्ष करून त्यांचं कोडकौतुक करीत राहणं एवढंच त्यांचं कार्य होऊन बसतं. पण आपल्या स्वच्छंदी, उच्छृंखल पोरांना सुधारण्यासाठीं सक्त उपाय योजण्याऐवजीं आपल्या अशा गैदी ममताळूपणानंच आपण आपल्या मुलांचं अकल्याण करीत आहोंत हें मात्र सोईस्करपणें ते विसरून जातात.

हा गैदी विसराळूपणा आईबापांच्या प्रेमळ अतःकरणाचा परिपाक असो किंवा आपल्यावरील आपल्या मुलांची माया टिकविण्याच्या मूर्ख प्रयत्नाचा भाग असो, आपल्या मुलांचं आंधळं कोडकौतुक करण्याच्या भरीं पडून उद्यांच्या खडतर जीवनाला तोंड देण्यासाठीं आवश्यक असलेल्या शिस्त, संयम, आणि सहनशीलतेच्या शिकवणुकी अभावीं असे फाजील मायाळू आईबाप आपल्या मुलांचं जन्माचं नुकसान करीत असतात, एखाद्या दीर्घद्वेषी शत्रुपेक्षांहि अधिक घात करीत असतात !

अनुक्रम 22360 दि: निबंध



तसं पाहिलं तर जीवन हें एक युद्ध आहे. खडतर युद्ध आहे. दोन देशामध्यें होणाऱ्या युद्धाहून अधिक खडतर आहे. कारण दोन देशामध्यें होणारीं युद्धं हीं मर्यादित काळच चालू असतात. पण जीवनाचं युद्ध हें माणसाच्या अंतापर्यंत अखंड चालू असतं. आतां देशामध्यें माजणाऱ्या अशा तात्कालिक युद्धासाठीं सुद्धां शस्त्रास्त्रांच्या प्रचंड सामुग्रीपासून जवानांच्या शारीरिक, मानसिक आणि तांत्रिक पूर्व तयारीचा केवढा तरी प्रदीर्घ खटाटोप करावा लागतो. मग मानवाच्या अंतापर्यंत चालणाऱ्या या अखंड युद्धाची पूर्व तयारी त्याहूनहि सर्वांगीण आणि संपूर्ण साधनानिशीं करायला नको का ? गांवांतला धर रंगरूट, कीं कांहींहि तयारी न करतां, युद्धाचं लवमात्र शिक्षण न देतां पाठव आघाडीवर असं युद्धांत केलं, तर त्याची भीषण क्रौर्यांतच गणना करावीं लागेल. मग जीवनाच्या अंतापर्यंत अखंड चालणाऱ्या युद्धासाठीं आपल्या अपत्यांची यथायोग्य तयारी न करतां त्यांना तसंच बिनतयारीनिशी त्या युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या तथाकथित प्रेमळ आईबापांच्या क्रौर्याला कोणतं नांव द्यायचं ?

देशादेशामध्यें माजणाऱ्या युद्धांतून पळ काढून सुरक्षित ठिकाण गाठणं जवानांना क्वचित् शक्य तरी असतं. असं पळून जाणं मर्दाला शोभण्यासारखं नाही, हा प्रश्न वेगळा. म्हणून पळून जाण्याची शक्यता असते, हें कांही नाकारतां यायचं नाहीं. पण जीवनाच्या महान् युद्धांतून मात्र कोणत्याच सजीव प्राण्याला पळवाट नाही. इच्छा असो अगर नसो, प्रत्येकाला या युद्धाला तोंड द्यावंच लागतं. देशादेशांतील शस्त्रास्त्रांच्या युद्धांचा संभवहि हळूहळूं कमी होत आहे. कदाचित् भावी काळांत अशा युद्धापासून जग मुक्तहि होईल. पण मानवजात अस्तित्वांत असेपर्यंत जीवनाच्या युद्धापासून मात्र कुणालाच मुक्तता नाहीं. मग जें अटळ आहे त्याला हिंमतीनं तोंड देऊन यशस्वी होण्यासाठीं आपल्या मुलाबाळांची प्रारंभापासूनच शारीरिक, मानसिक नि बौद्धिक तयारी करणं, हें आई-बापांचं कर्तव्यच नाही का ? मग हें कर्तव्य विसरून फाजील ममतेच्या वेडगळपणानं आपल्या मुलाबाळांची कसलीहि तयारी न करतां

त्यांना जीवनाच्या युद्धांत लोटणारे हे आई-बाप दीर्घद्वेषी शत्रुपेक्षांहि अधिक घातक होत असं मीं म्हटलं तर त्यांत खोटं काय आहे ?

जीवनाच्या खडतर युद्धाची जाण नसलेले गाफील आईबाप आपल्या अपत्यांचें एकप्रकारचे शत्रु, तर त्या युद्धाच्या भीषणतेचा फाजील धसका घेऊन आपल्या अपत्यांना सदैव भीतीच्या आणि चिंतेच्या व्याकुळ वातावरणांत वाढविणारे आईबाप हे दुसऱ्या प्रकारचे शत्रु होत.

जीवन हें एक युद्ध आहे हें खरं. पण युद्धांतहि गंमतीजमतींना वाव नसतो असं थोडंच आहे ? मात्र युद्धाच्या केवळ काळ्या बाजूकडेच लक्ष केंद्रित केलेल्या माणसांना त्याच्या प्रसन्न, उज्ज्वल बाजूची कल्पना यायची नाहीं. जीवनाच्या गंभीर बाजूनं त्यांना जणूं ग्रासूनच टाकलेलं असतं. जीवनाकडं पाहण्याचा त्यांचा एकंदर दृष्टिकोणच बिघडून गेलेला असतो. चरफडणं, कुढणं आणि उदास सुतकी चेहऱ्यानं वावरणं हा त्यांचा नित्यक्रम असतो. उद्यां आपणाला मरायचं आहे हा एकच विचार त्यांना सदैव जणूं गांजत असतो. आपल्या जीवनांत मौज करायला पुष्कळच अवसर असतो. हें त्यांना माहीत नसतं असं नव्हे; पण अशी मौज करणं, प्रसन्न खुल्या दिलानं जीवनाचा आनंद लुटणं, म्हणजे आपण कांहीं तरी अनीतिमय कृत्य करीत आहोंत, भयंकर पाप करीत आहोंत, अशीच त्यांची विपरीत समजूत असते. त्यामुळें स्वतःहि कधीं प्रसन्न, आनंदी असत नाहींत आणि आपल्या अपत्यांनाहि कधीं आनंद उपभोगूं देत नाहींत.

बालपण म्हणजे मौजमजेच्या फुलांनीं बहरलेलं रम्य उद्यान. त्यांत स्वैर हंसण्याबागडण्याचा बालकांचा नैसर्गिक हक्क ! पण असं दिलखुलास हंसणंखेळणं म्हणजे मुलांना बिघडविणारी अनिष्ट गोष्ट होय, असं त्या दुर्मुखल्या आईबापांना वाटतं ! अशा आईबापांची आपल्या मुलांवर माया नसते का ? कोण जाणे, कदाचित् असलीच, तर ती विकृत असते, कठोर असते, क्रूर—होय क्रूर असते—त्यांची माया क्रूर असते ! छेः मायेऐवजीं अज्ञानामुळं आपल्या क्रौर्याचाच वर्षाव करीत असतात ते. म्हणूनच मीं वर म्हटलं आहे, कीं असें आईबाप हेहि आपल्या अपत्यांचे दुसऱ्या प्रकारचे शत्रूच होत.

आपल्या मुलांवर, वर सांगितल्याप्रमाणं 'मृदु' प्रेम करणारे आणि कठोर 'क्रूर' प्रेम (?) करणारे आईबाप या जगांत कांही थोडे नाहींत.

पहिल्या प्रकारचे आईबाप आपल्या मुलांना मायेचं कवच पांघरून युद्धाच्या खाईंत लोटतात– कसलीहि तयारी केल्यावाचून! तर दुसऱ्या प्रकारचे आईबाप आपल्या मुलांना इतकं धास्तावलेल्या मनःस्थितींत वाढवितात, कीं एकतर तीं मुलं पुढील आयुष्यांत भित्रीं, बुजरीं, कचखाऊ निघतात, किंवा आईबापांचा करडा सुतकी अंमल संपुष्टांत येतांच सर्व संयम झुगारून अगदीं बेताल, बेदरकार बनून कायमचीं बहकून जातात! मग अशा मुलांची जीवनाच्या खडतर युद्धांत कोण दैना उडत असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

'मुलं हीं राष्ट्राची संपत्ति होय,' असं मोठ्या अभिमानानं म्हटलं जातं. हें जर खर असेल, तर अडाणी आईबापांच्या हातून या अमोल राष्ट्रीय संपत्तीची जी हानि होत आहे, तिकडं कुणाचंच कसं लक्ष जात नाहीं? अन्य राष्ट्रीय संपत्तीची अशी कुणीं बेजबाबदार नासधूस केली असती तर तो 'राष्ट्रद्रोह' समजून त्याला केवढं तरी भयंकर शासन भोगावं लागलं असतं; मग राष्ट्राच्या या सजीव संपत्तीचीच हेळसांड कां? ती अशीच चालू द्यायची का? कां मुलांना 'राष्ट्राची संपत्ति' म्हणून आपण गौरवितों, तें केवळ शाब्दिक अलंकार म्हणून?

वास्तविक भौगोलिक चतुःसीमेनं आंखलेला प्रदेश म्हणजे राष्ट्र नसून त्या प्रदेशांत नांदणारे रहिवासी, त्यांची परंपरा आणि त्यांची संस्कृति म्हणजेच राष्ट्र होय. म्हणजे मुलं ही आजच्या राष्ट्राची संपत्ति असलीं तरी तीं उद्यांचें प्रत्यक्ष राष्ट्रच होत. मग उद्यांच्या आपल्या त्या राष्ट्राचा आपल्या डोळ्यांदेखत घात होत आहे, आणि आम्ही हात जोडून तें पहात स्वस्थ बसून आहोंत, हा केवढा नादानपणा? वास्तविक मुलांना योग्य रीतीनं वाढविण्याचं ज्ञान असल्याशिवाय मुलांना जन्म देण्याचा कुणाला अधिकारच असतां कामा नये. तसा कायदाच व्हायला हवा. पण नको असलेले भाराभर कायदे पास करण्याचा हव्यास जडलेले आमचें सरकार हा अत्यावश्यक कायदा पास करण्याचं मात्र कधीं मनांत सुद्धां आणणार नाहीं!

आणि वेळीं– अवेळीं आम्ही पुकारतच रहाणार कीं, ‘मुलं ही आपल्या राष्ट्राची संपत्ति आहे!’ समुद्राच्या तळाशीं सांपडणाऱ्या मोत्यांच्या राशीऐवजीं नदीनाल्यांच्या पात्रांतील गारगोट्यांच्या ढिगालाच आपली संपत्ति म्हणून अभिमानानं गौरविण्यासारखाच हा वेडेपणा आहे; दुसरं काय!

## सुखाचें संगतीं–

सुखाच्या काळीं सारेच सोबती असतात. आपत्तीच्या काळीं मदतीचा हात देणारे फार थोडे. प्रभातींच्या हांसऱ्या जगाला आनंदविण्यासाठीं आपला मत्त सौरभ उधळीत नाचणाऱ्या फुलवंता अनेक आहेत. पण रात्रीच्या भीषण काळोखांतच उमलून एखाद्या हतभागी कुंढल्या जिवाला संतोषविणारी रातराणी एखादीच!

# १३...

# महत्त्वाकांक्षा ? छे, मनोरथ !

गजाभाऊ म्हणजे केवढा नामवंत लेखक ! त्याचें लिखाण नाहीं असं मासिक विरळा. बहुतेक मासिकांत दर महिन्याच्या अंकांत त्याचें कांहीं ना कांहीं लिखाण असायचंच. त्याचा हेवा वाटायचा मला. आणि एक दिवस तो धांवतच माझ्याकडं आला आणि सहानुभूतीच्या अपेक्षेनं कळवळून म्हणाला, " अरेरे, जगांत गुणांची पारख नाहीं हेंच खरं ! "

त्याचे हे आकस्मिक आणि हताश उद्‍गार ऐकून त्याच्या तोंडाकडं आश्चर्यानं टकमक पहातच राहिलों मी. नाना शंका क्षणांत चमकून गेल्या माझ्या मनांतून. एखाद्या संपादकानं त्याचं लिखाण 'साभार परत' तर पाठविलं नसेल ? तसं असेल तर मात्र तें दुःख भयंकर खरं ! चांगला अनुभव आहे मला अशा दुःखाचा. माझ्या लिखाणाच्या 'साभार परती' ची परत भेट ही माझी नित्याची बाब होती. त्या मुळं अशा दुःखाचा खरा जाणकार माझ्या शिवाय दुसरा कोणी भेटणार नाही, हें ओळखून तर गजाभाऊ आपलं दुःख सांगायला माझ्याकडं आला नसेल ? गजाभाऊसारख्या नामवंत लेखकाचं लिखाण साभार परत करायचं म्हणजे केवढा प्रहार ? मग अशा प्रहारानं

गजाभाऊ अगदी कासावीस होऊन गेला असेल तर त्यांत काय नवल ! म्हणून सहानुभूतीच्या मृदु स्वरांत मी हळूंच गजाभाऊला विचारलं, " एखाद्या बेअकली संपादकानं तुझं लिखाण साभार परत तर नाहीं ना केलं, गजाभाऊ ? "

" परत ? – हुंः " गजाभाऊ अशा कांहीं तिरस्कारयुक्त आविर्भावानं हुंकारला, कीं फलंदाजानं एखादा चेंडू अलगद सीमापार टोलवावा त्याप्रमाणं माझी शंका त्यानं कुठल्याकुठं कोलवली ! कुठल्या संपादकानं याचं लिखाण ' साभार परत ' पाठविलं नाहीं तर ? मग हा लेखक असा काकुळतीला कां आला असावा ? मला कांहींच अंदाज बांधतां येईना. प्रश्नार्थक लोंबत्या मुद्रेनं मी तसाच त्याच्याकडं पहात राहिलों.

" कुठल्या संपादकानं माझा लेख परत नाहीं पाठवला रे. पण–पण– " सांगतां, सांगतां मध्येंच गजाभाऊ अडखळला. संपादक ज्याचा लेख कधींच परत करत नाहींत–नव्हे, करूं शकत नाहींत अशा महान् लेखकाशेजारीं मी बसलों आहे हा विचार तेवढ्यांत माझ्या डोक्यांतून सरकन् चमकून गेला. पण तेवढ्यानं किती संकोचल्यासारखं–ओशाळल्यासारखं झालं मला !

" पण-पण-हा पाहिलास अंक ?— " काखोटीस मारलेला एक मासिकाचा अंक बद्कन् माझ्या समोर आपटीत तो पुढं बोलूं लागला, " यांत संपादकनं गेल्या वर्षांतील वाङ्मयाचा आढावा घेतला आहे. पण त्यांत पहिल्या एक दोन लेखकांत तर राहोच पण सबंध लेखांत त्यानं माझा एका अक्षरानंहि गौरवपूर्ण उल्लेख करूं नये म्हणजे काय ? गेल्या वर्षीं मीं दोन कादंबऱ्या, पंचवीस गोष्टी, कित्येक... " आणि मग आपण लिहिलेल्या इत्थंभूत लेखनाचा पाढा वाचला त्यानं.

" फक्त म्हणतोय काय ? तर म्हणे भाषांतरं बरीं केलीं आहेत ! "

बोलतां बोलतां मग गजाभाऊचा पारा इतका चढला, कीं त्याला कसाबसा शांत करून वाटेला लावतां लावतां पुरेवाट झाली माझी.

गजाभाऊला कसंबसं घरीं पाठवून दिलं. पण त्याच्याबद्दलच्या विचारांनीं मात्र माझ्या डोक्यांत चांगलंच घर केलं. एवढं लिखाण करून त्याचं चीज कां

बरं होऊं नये ? त्या संध्याकाळीं ह्याच विचार माझ्या डोक्यांत घोळत होता. त्या दिवसाची सारी रात्र याच विचारानं ढवली. आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे फिरायला बाहेर पडलों, तरी हाच विचार सारखा मनांत घोळत राहिला. एवढं लिखाण करून त्याचं चीज कां बरं होऊं नये ? गजाभाऊ म्हणाला होता त्याप्रमाणं त्याचं लिखाण खरोखरीच माप्यानं मोजण्याइतकं अफाट होतं, तरी वाङ्मयसमीक्षकांकडून त्याचं चीज होत नाहीं याचा अर्थ काय ?

पूर्वायुष्यांत गजाभाऊ एक नाणावलेला शिक्षक होता. त्याला शिकवायची हातोटी अशी कांहीं साधली होती, कीं वर्गातील 'ढ' विद्यार्थ्याला सुद्धां तो शिकवत असलेला विषय सहज आकलन व्हावा ! शिवाय विषयांत रंजकता आणण्याचं त्याचं कसब तर आगळंच होतं. त्यामुळं त्याच्या तासाला वर्गातील एकूण एक विद्यार्थी तर हजर रहातच; पण वरच्या वर्गातील कांहीं विद्यार्थी सुद्धां कधींकधीं येऊन बसत. शिवाय लेखक म्हणूनहि तो हळुहळू पुढं येत होता. त्यामुळं विद्यार्थ्यांच्या प्रेमाचं आणि आदराचं तो एक केंद्रस्थान होऊन बसला होता. गुणांच्या पाठोपाठ अहंकाराचा जन्म व्हावा असा सृष्टिक्रम आहे कीं काय कोण जाणे. कारण विद्यार्थ्यांतील आपल्याबद्दलच्या प्रेमादरामुळं त्याला अहंकाराची थोडी बाधा झाली होती एवढं खरं.. या अहंकारामुळंच त्याची वरिष्ठाशीं आढ्यतेची आणि बेपर्वाईची वागणूक होऊ लागली. त्याबद्दल वरिष्ठाकडून त्याला तंबी येतांच 'शिक्षक म्हणजे कांहीं स्वाभिमानशून्य गुलाम नव्हे' असा रोकडा जबाब देऊन तो राजीनामा देऊन मोकळा झाला होता.

लहानसं कां होईना, पण चरितार्थाचं नियमित साधन तेवढं एकच होतं. तेंहि अशा रीतीनं मुकलं. मग लेखनावरच सारी भिस्त येऊन पडली. पोटासाठीं पुष्कळ लेखन केलं त्यानं. पण तें बहुतेक भाषांतरित होतं. त्यानं जसं फारसं पोट भरलं नाहीं, तसं नांवहि झालं नाहीं. पण तो अत्यंत मेहनती होता. चांगलें चांगलें लिखाण भाषांतरित करतां यावं म्हणून अनेक परकी भाषा शिकून त्यांतील मौलिक ग्रंथ स्वभाषेत आणले होते त्यानं. त्याचं चीज व्हावं असं त्याला

वाटे पण तें कधीं झालं नाहीं. चांगल्या लेखकांत त्याचं कुणीं कधीं नांव घेतलं नाहीं. असं कां व्हावं ? जगांत गुणाची पारख नाहीं, हेंच त्याचं कारण असेल का ?

काय हा न्याय ! जगांत गुणाचं चीज होऊं नये म्हणजे काय ? त्या दिवशीं पहांटे मी फिरायला बाहेर पडलों तो मनांत हा विचार घोळवतच ! मनांत विचार घोळत होता आणि पाय आपली वाट चालत होते. चालतां चालतां नेहमीच्या संवयीनुसार मी त्या सरोवराच्या कांठीं येऊन पोंचलों. सरोवरासभोंवारचं सृष्टिसौंदर्य फारसं मनोरम होतं असं नव्हे. उलट तो भाग उदास आणि मठ्ठ देखाव्यांनींच गजबजून गेला होता; पण तो निवांत होता. धुरळ्याकचऱ्यापासून, धांवपळीच्या जीवनापासून अलिप्त होता; आणि म्हणूनच तो माझ्या विशेष आवडीचा होता.

सरोवराच्या काठीं गर्द झाडी होती. तिची घनदाट छाया सर्वत्र पसरली होती. त्यामुळं पहांटेच्या धूसर वातावरणांत अधिकच धूसरता भासत होती सभोंवारची पुसट मठ्ठ शोभा अधिकच उदास झाली होती. झाडाझुडपांतून किलबिलाट करीत इकडून तिकडं उडणारे पक्षी त्या वातावरणाला कांहीं थोडासा जिवंतपणा आणत होते तेवढाच. बाकी सरोवरासभोंवारचें निवांतपण भकास असेंच होतें.

जवळ येतांच पाण्यांत पाय सोडून मी एका दगडावर बसलों. पायांना कसा थंडावा आला एकदम ! पण डोकं मात्र अधिकच तापलं होतं. जगांत गुणाचं चीज कां होऊं नये, या विचारानं डोकं भगाणून गेलं होतं. हें विचारचक्र कांही केल्या माझ्या डोक्यांतून जात नव्हतं. इकडं सरोवराच्या मंद लाटा पायांवर लोळण घेत होत्या; किनाऱ्यावरील एखाद्या दगडावर आपटून त्या खंड विखंड होत होत्या. त्यावरील इवलाला फेंस इकडं तिकडं उधळला जात होता. तक्रारीच्या सुराप्रमाणं लाटांची अखंड सळसळ कानावर येत होती ...तक्रारीचा सूर !

तक्रारीचा सूर ! ही कल्पना डोक्यांत येतांच केवढ्यानं दचकलों मी ! गजाभाऊप्रमाणं सरोवराचीहि कांही तक्रार असेल ? त्याच्याहि गुणाचं चीज झालं नाहीं म्हणूनच का तें असं सळसळत, तळमळत असेल ? तसंच असलं

पाहिजे. लाटांच्या या सळसळीचा एकंदर सूर तेंच सांगतोय. मग या सरोवराला काय म्हणायचं आहे तें मला ऐकलंच पाहिजे. अरेरे ! आजवर तें दुःख व्यक्त करण्याचा त्यानं अनेकदां प्रयत्न केला असेल; अनेकांच्याकडं केला असेल ! पण तें सहानुभूतीनं कुणीं ऐकून घेण्याची तसदीहि घेतली नाहीं म्हणून का त्यानं आज आपलं गाऱ्हाणं ऐकून घेण्यासाठीं माझ्या पायावर अशी लोळण घेतली आहे ? " नको, माझ्या पायावर अशी लोळण घेऊ नकोस; " असं म्हणून चटकन् मीं माझे पाय पाण्यांतून मागं घेतले. " सांग तुला काय सांगायचं असेल तें खुशाल सांग. तुझं गाऱ्हाणं आनंदानं ऐकून घेतों मी! "

माझं हें बोलणं ऐकून लाटावरचा फेंस विशेषच चमकला असं मला वाटलं. सरोवरानं समाधानानं मंद स्मितच केलं जणूं

सरोवराची सळसळ बोली सुरूच होती. एकाग्र चित्तानं मी ती ऐकत होतों. नवशृंगारांनीं नटलेली उषा त्या वेळीं नुकतीच नभोमंदिरीं अवतीर्ण झाली होती. एक एक तारा आकाशांत हळुहळू विलीन होत होती, आणि याबरोबरच त्या सरोवरांत प्रतिबिंबित झालेली एक एक ताराहि लोपून जात होती.

त्याच वेळीं त्या सरोंवराच्या कढत्या बोलांना जणू अधिकच तीव्रता आली होती. सारं कांहीं उत्कंठेनं ऐकत होतों मी. आणि काय गंमत सांगूं ? अशा तंद्रींत असतांनाच त्या सरोवराच्या एकसुरी मुखर वाणींतून एक एक अर्थवाहक शब्द स्पष्टपणें माझ्या कानावर येऊं लागला.

तें सरोवर सांगत होतं :

' मित्रा, नभीचं सारं वैभव माझ्या अंतःकरणांत सांठवून प्रति तारा-खचित नभोमंडळच पृथ्वीवर अवतीर्ण करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे सायासाप्रयासानं तसं मी दररोज करीतहि आलों आहे. परंतु ज्या वेळीं अशी नक्षत्रमाला माझ्या अंतःकरणांत प्रतिबिंबित होते, त्यावेळीं सारं जग माझ्याकडं उपेक्षेनं पाठ फिरवत आणि डोळे झाकून घोरत पडतं. मी एवढी करामत करतोंय त्याकडं अशी डोळेझांक करायची आणि लगतच्या देवळांतील शिवाला वहाण्यासाठीं म्हणून ज्यांची अपेक्षा त्या कमलफुलांची

क्षणभंगुर आणि क्षुद्र निर्मिति मी करूं इच्छित नाही म्हणून माझ्याकडं तिरस्काराचा तीक्ष्ण कटाक्ष फेकून दूर निघून जायचं ! शाश्वत नक्षत्रांचं भांडार मी या जगापुढं खोलतोय पण या अडाणी जगाला त्याची किंमत नाहीं ! त्याला क्षणांत कोळसणाऱ्या कमलांची निर्मिति हवी आहे ! काय म्हणावं या अरसिक जगाला ? माझ्या महत्त्वाकांक्षेचं चीज कसं व्हायचं त्याच्या कडून ?

एखाद्या निवांत रात्रीं कुणी प्रियकर आपल्या प्रेयसीला बरोबर घेऊन माझ्या कांठाला फिरायला आला तर माझ्यांत प्रतिबिंबित झालेलं तें तेजस्वी तारामंडळ पाहून क्षणभर वेडावून जातो. पण दुसऱ्याच क्षणीं तो कृतघ्न आपल्या प्रेयसीच्या कानांत हळूंच कुजबुजतो, ‘ तुला भुलविण्यासाठीं देवादिकांनीं सुद्धां माझ्याशीं स्पर्धा चालविलीय बरं का ? तुला मोहित करण्यासाठींच जणू आपला सारा जवाहिरखाना आकाशाच्या अंगणांत देवांनीं मांडून ठेवला आहे. म्हणजे पहा आतां ! माझ्या करामतीनं खूप व्हायचं आणि कौतुक मात्र देवांचा जवाहिरखाना म्हणून करायचं ! हें शल्य मला नाहीं सहन होत, आतां. तूं तरी माझ्या गुणाचं चीज करशील म्हणून माझं अंतःकरण उघडं केलंय मीं तुझ्यापुढं ! ’

हें गाऱ्हाणं ऐकून क्षणभर मी बुचकळ्यांतच पडलों. काय उत्तर द्यावं हें मला कळेना. त्याच्या नसत्या गुणाचं चीज मी तरी कोणत्या रीतीनं करणार ? आणि त्याचं समाधान तरी कसं करणार ? एखाद्यानं मोठी महत्त्वाकांक्षा बाळगणं चूक नाहीं. पण सरोवराची महत्त्वाकांक्षा म्हणजे महत्त्वाकांक्षा नव्हेच ती—शुद्ध मनोरथ. केवळ शेख महंमदी स्वप्नचं. जें करतां येण्यासारखं आहे, जें करण्यासाठींच आपला जन्म आहे तें क्षुद्र म्हणून बाजूला सारायचं आणि भलतंच कांहीं तरी करूं पहायचं याला महत्त्वाकांक्षा का म्हणायचं ? महत्त्वाकांक्षा ही परिस्थितीचा आढावा घेऊन, शक्याशक्यतेचा विचार करून, योग्य साधनांची सिद्धता करून आखलेली योजना असते. बेअंदाजी, बेफाट आणि बेबंद कल्पना म्हणजे वाऱ्यावरचे वारू ! मनोरथ म्हणतात तिला. अशा मनोरथांच्या मागं लागून फसलेल्या जिवाबद्दल दुःख करावं कीं कींव करावी हेंच कळेना मला. तसाच घुटमळत स्तब्ध बसून राहिलों मी.

"मित्रा, तूंहि नाहीं माझ्या गुणाचं चीज करीत ! अरेरे जगांत गुणाची पारख नाहीं हेंच खरं." सरोवर केविलवाणे पुटपुटले.

पण मागून येऊन अत्यंत हताश होऊन गजाभाऊच मला तो प्रश्न करतोय असा भास झाला. त्याचं उत्तर माझ्या तोंडाशीं आलं होतं. पण मीं तें बाहेर पडूं दिलं नाहीं. आधींच व्यथित झालेल्या जीवांना कटु सत्याचा आणखी एक अप्रिय वळसा द्यावा असं वाटलं नाहीं मला. मी तसाच उठलों आणि मागंहि न पाहतां झपझप पावलं टाकीत घरीं निघून गेलों.

## असें होईल कां ?

मेघांनीं अमृतवृष्टि केली, तरी बाभळीला कधीं गुलाब फुलतील का ? जगांत बाराहि महिने वसंत अवतरला, तरी कावळ्याला कोकिळेचा कंठ फुटेल का ?

१४...

# सांवटाखालचं झुडूप

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

'हिंमत मर्दा तो मदत खुदा' असें म्हटलें जातें तें उगीच नव्हे. जो स्वतःच्या हिंमतीवर आपला जीवितपथ आक्रमायला सुरवात करतो, त्यालाच ईश्वरी मदतीचं वरदान लाभतं. असाच पुरुषसिंह जीवनाच्या खडतर युद्धांत विजयी होतो, थोरपदाला चढतो. आणि दीर्घोद्योग व ईश्वरी सहाय्य यांचं पुण्यफळ चाखण्याचं भाग्य उपभोगतो.

बेहिंमत कचखाऊ माणूस स्वतःची स्वतःलाच मदत करायला कचरतो, तिथं त्यानं दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा कां करावी ? आणि ईश्वरी सहाय्याची अपेक्षा तरी कशी फलद्रुप होणार ? पण नाहीं. ही गोष्ट या लोकांच्या कधीं ध्यानीं येणार नाहीं. ते दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करणार, आणि कांहीं चमत्कार घडून येऊन ईश्वरी सहाय्य मिळावं असंहि इच्छिणार ! त्यांच्या इच्छे-प्रमाणं असा चमत्कार कधीं घडून येत नाहीं हें निराळं, पण दुसऱ्याच्या मदतीची त्यांची अपेक्षा मात्र कांहीं उदारधींच्या कृपेनं कधींमधीं पुरी होते यांत शंका नाहीं. पण यानं हितापेक्षां दुप्पटीनं अनहित मात्र पदरांत पडतं. या अशा निष्क्रिय नालायकांच्या पदरांत मदत पडल्यामुळं एकतर त्यांच्या दुबळ्या

परावलंबित्वाला प्रोत्साहन दिल्यासारखं होतं आणि दुसरं, लायक गरजवंत मदतीच्या अभावीं तसेच कुचंबत रहातात.

औदार्य आंधळं नसतं पण तें उतावीळ असतं खास. दैन्य दिसलं, रे दिसलं कीं तें आंतल्या आंत कळवळतं आणि मदतीचा हात द्यायला चटकन् पुढं धावतं. पण तें दैन्य प्रयत्नवाद्याच्या दुर्दैवाचा परिपाक आहे कीं नामर्दाच्या निष्क्रियेतचं फळ आहे, हें पारखून पाहीपर्यंत औदार्याला आपल्या मदतीचा उमाळा आवरून धरतां येत नाहीं. तें तावडतोब मदत देऊन मोकळं होतं; आणि अशी मदत मिळत गेल्यामुळं त्या नामर्द निष्क्रिय माणसाला स्वतः हातपाय न हालवितां ऐत्या मदतीवर जगण्याची संवयच लागून बसते !

अशा रीतीनं दुसऱ्याच्या आश्रयानं जगतां आलं, आपलं मुळचं दैन्य झांकतां आलं, तरी परावलंबी जिण्याचं एक आगळंच अमंगळ दैन्य वाट्यांला येतं हें त्याला कळत नाहीं. सांवटाखालीं वाढणार झुडूप कधीं अंग धरत नाहीं. तजेलदार रसरशीतपणा कधीं त्याच्या पानोपानीं दिसणार नाहीं. पुऱ्या उंचीची डौलदार वाढ कधीं गांठता येणार नाहीं. सर्व बाजूनीं कुचंबणाच त्याच्या वांट्याला येत असते. दुसऱ्याच्या आश्रयाखालील लाचार जिण्याचा परिपाक तरी याहून वेगळा कसा असेल ? असा माणूस देहानं व मनानं खुरटला गेल्याशिवाय कसा राहील ?

थांबा, तुमच्या आकुंचित झालेल्या डोळयांत कसल्या तरी शंकेचा भाव उमटला आहे तो दिसतोय मला. तुम्हांला कसली शंका आली आहे, सांगूं? तुम्हांला विचारायचं आहे, कीं मोठ्या वृक्षाच्या सांवटाखालीं वाढणारं झुडूप खुरटतं, पण त्याच वृक्षाच्या सांवटाखालीं रुजलेली वेल इतक्या जोमदारपणें पोसली गेली आहे, वाढली आहे, कीं तिचा विस्तार वाढत वाढत त्या वृक्षाच्या माथ्यापर्यंत जाऊन पोंचला आहे. कुणाला वाटावं कीं जणूं ती त्या वृक्षाच्या डोकींवरच जाऊन बसली आहे. हें असं कां व्हावं ?

याचं उत्तर शोधायला फारसं दूर जायला नको. कारण ती वेल त्या वृक्षाची सखी आहे. दिव्य प्रेमानं एकरूप झालेलं जोडपं आहे तें. दोन देह, पण

एक जीव झालाय त्यांचा. एकच जीवनरस दोघांच्या नसानसांतून वहातोय. मग प्रेमामृतानं पोसलेली ती वेल वृक्षाच्या सांवटांत वाढली म्हणून खुरटेल कशी ?

औदार्य हा सुद्धां एक प्रेमाचाच भाग आहे हें खरं. पण प्रिया आणि प्रियकर यांच्यामध्यें एकरूपता साधणाऱ्या प्रेमाशीं त्या औदार्याला बरोबरी कशी करतां येईल ? दाता कितीहि उदार झाला, तरी तो याचकाशीं एकरूप कसा होणार ? प्रियेचं प्रियकराच्या ठायीं होणारं आत्मसमर्पण हा गौरवाचा भाग आहे; तर याचकाला दात्याच्या औदार्याचा आश्रय हा लाचार, लज्जास्पद व हीनतेला पोंचवणारा भाग आहे.

मोठ्यांच्या आश्रयाचं आकर्षण कर्तृत्ववान् माणसाला कधीं वाटत नाहीं त्याचं कारण हेंच ! ईश्वरी मदतीचं अमृत सोडून अशा लाचार मदतीच्या ताकामागं कोण लागणार ?

## पैसा

जगांत पुष्कळदां मनगटांतील जोरापेक्षां मुठींतील पैसाच अधिक कार्यक्षम ठरतो. किंवा मुठींत पैसा येतांच दुबळयाच्याहि मनगटांत जोर येतो असं म्हटलं तरी चालेल.

१५...

# दंभ

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

जो उठतो तो दुसऱ्याला दांभिक, ढोंगी म्हणून दूषण देतो. जणूं काय तो स्वतः दंभ किंवा ढोंग यापासून अलिप्तच आहे. तसं पाहिलं तर या जगांत ढोंगी कोण नाहीं ? कुणाला खोटं वाटेल पण प्रामाणिकांतील प्रामाणिक माणूसहि प्रसंगीं ढोंग करीत असतो हें विसरून चालणार नाहीं. फक्त त्याच्यांत आणि इतरांत फरक असतो तो प्रमाणाचा—व्याप्तीचा. शिवाय ढोंग म्हटलं, कीं तें वाईटच असलं पाहिजे हें कशावरून ? वास्तविक ढोंग हा आपल्या जीवनाचा आवश्यक भाग आहे. ढोंगावाचून जीवनांतील बहुसंख्य व्यवहार आपणाला मुळींच करतां येणार नाहींत. अंतिम हितासाठीं पुष्कळ वेळां आपणास खोटं बोलावं लागतं; नको त्याचं हंसून स्वागत करावं लागतं. पुष्कळांची कंटाळवाणी चर्पटपंजरी ऐकून घेऊन खोटीच सहानुभूति, पोकळ आस्था दाखवावी लागते. ढोंगबाजीचे हे विविध प्रकार वेळेनुसार आचरले नाहींत तर प्रत्यक्ष आपलं जिणंच अशक्य होऊन बसेल.

समजा, आपला शेजारी अतिशय नालायक मनुष्य आहे. तो आपणाला बिलकूल आवडत नाहीं. त्याच्याबद्दलचं आपलं मत अत्यंत वाईट आहे. पण

तोच शेजारी दारांत भेटतांच " कसं काय भाऊसाहेब, ठीक आहे ना ? " असं वरकरणीं हंसून आपण विचारतोंच ना ? त्यावर तोहि हंसून " उत्तम आहे, अण्णासाहेब— " असं म्हणतांच " वः वः ! आनंद झाला, " असं बेधडक खोटं बोलून निरोप घेतों आपण त्याचा. मनांत कांहींहि असलं तरी वरकरणीं असं शिष्टाचाराचं ढोंग करावंच लागतं. तसं न करतां उलट प्रामाणिकपणाच्या नांवाखालीं आपण जर त्याला आपलं खरं मत ऐकवलं तर ?... पण आपलीं खरीं मतं तरी अशीं कुणाकुणाला म्हणून ऐकविणार ? कारण या जगांतील हरेक माणसाची हरेक कृति आपणास आवडेल हें शक्यच नाहीं. मग प्रत्येक माणसाला कां आपलं प्रतिकूल मत ऐकवायचं ? आणि तसं ऐकवायचं म्हटलं तर त्याचा काय परिणाम होईल ? वरकरणीं कां होईना गुण्यागोविंदानं चाललेले आपसांतील व्यवहार आधीं बंद पडतील. एकमेकांतील वैमनस्य वाढीला लागेल. इतकं कीं हरेक माणूस दुसऱ्या माणसाचा शत्रु होऊन बसेल. आणि त्याचंच पर्यवसान म्हणजे प्रत्येक माणसाची उभी ह्यात म्हणजे माणसामाणसांत माजलेलं विरोध, प्रतिकार, शिवीगाळ आणि हाणामारी यांचं उघडं नागडं रणकंदनच ठरेल ! मग हें सर्व टाळायला समर्थ ठरणारं ढोंग वाईट कसं ?

बरं, ढोंग किंवा दंभ वाईटच आहे असं क्षणभर मानू या आपण. पण ढोंग, दंभ, लपंडाव, लपवाछपवी किंवा गुप्तता हें तर एकाच कुटुंबांतील आप्तस्वकीय होत. मग ढोंग, दंभ हे जर वाईट मानायचे तर त्याबरोबर लपंडाव आणि गुप्तता यांनाहि वाईट मानावं लागेल. आणि तसं मानून त्यांचा त्याग करायचा असं ठरविलं तर आयुष्यांत आपणाला केवढ्या तरी आनंदाला मुकावं लागेल. आयुष्यांतील अर्ध्याहून अधिक आनंद आपल्या वागणुकींतील लपंडाव आणि लपवाछपवी यांत साठविला आहे बरं !

लहान मुलंच केवळ लपंडावाचा खेळ खेळतात असं नाहीं, तर तरुण-तरुणींमधल्या प्रियाराधनांत लपंडाव हाच प्रमुख खेळ आहे. या खेळांत तशी कांहीं गंमत नसती तर लहान मुलं तो खेळ कशाला खेळलीं असतीं ? आणि तरुणतरुणी तरी आपल्या प्रियाराधनांतील अमोल वेळ त्यांत खर्च करायला कशाला तयार

झाले असते ? मग काय लहान मुलांच्या लपंडावांत गंमत आहे, तरुणतरुणीं मधल्या लपंडावांत मजा आहे; पण इतर माणसांच्या जीवनांतील इतर व्यवहारांत लपंडावाला जागा नाहीं असं समजायचं ? नाहीं, पुष्कळदां इतर व्यवहारांतहि लपंडाव हाच आनंदाचा आत्मा असतो बरं !

लपवाछपवी किंवा गुप्तता ही लपंडावाचीच सख्खी बहीण. कर्तृत्वांत भावाला अगदीं शोभण्यासारखी. कारण जीवनांत आनंद निर्माण करण्याच्या बाबतींत ती आपल्या भावाला हार जाईल ही शंकाच नको....तुम्हांला खरं वाटत नाहीं माझं म्हणणं ? काय करावं ! अहो, गूढ असं मी कांहींच सांगत नाहीं तुम्हाला. अगदी व्यवहारांतील बाब आहे ही......अजूनहि ध्यानांत येत नाहीं तुमच्या ? नाहींच यायची. मीच सांगतों तुम्हांला कशी तें.

चारचौघं जमून पत्त्याचा खेळ खेळत असतांना आपण त्यांत किती रमून जातो ? कशामुळं बरं आपण त्यांत इतकं रमून जातो ? तर त्या खेळांतील प्रत्येक भिडू आपआपल्या हातांतील डाव दुसऱ्याला न कळू देतां खेळत असतो म्हणून. प्रत्येकजण आपआपल्या हातांतील डावाबद्दल गुप्तता राखतो. एक प्रकारची लपवाछपवीच करीत असतो म्हणा ना. आणि हेंच तर त्या डावांतील गंमतीचं मूळ. तेंच सारे भिडू आपआपला डाव उघडा मांडून खेळूं लागले तर ? तर त्या खेळांत खेळण्यासारखं कांही आहे असं कुणाला तरी वाटेल का ? नाहीं. कदापि नाही. लपंडाव असो कीं गुप्तता किंवा लपवाछपवी असो आपल्या जीवनांतील अर्ध्याहून अधिक आनंदाच्या मुळाशी ती आहे असं मी म्हणतों तें याचसाठीं. ढोंग किंवा दंभ हीं त्याच गुणधर्माचीं भावंडें होत. मग व्यवहारांत त्यांचीहि तितकीच उपयुक्तता आहे हें सांगणे नकोच.

ढोंगबाजीची ही व्यावहारिक उपयुक्तता पुष्कळांना माहीत आहे; आणि व्यवहारांत ती सर्रास उठवलीहि जात आहे. एरवी ही ढोंगबाजी दिसते तितकी सार्वत्रिक दिसलीच नसती. या व्यावहारिक उपयुक्ततेखेरीज ढोंगबाजीला एक नैतिक मूल्य आहे हें मात्र फारच थोडे जाणत असतील.

गतानुगतिक विचारसरणीला बळी पडून ढोंग म्हटलं कीं नाक मुरडतो आणि प्रामाणिक स्पष्टवक्तेपणाचा उदोउदो करतो आपण. पण असं करण्यानं

कित्येकदां आपण केवढी चूक करीत असतो हें फारच थोड्यांच्या ध्यानीं येतं. माणसानं लांडी-लबाडी करायची, न्यायनीतीचा खून पाडायचा आणि प्रामाणिकपणाच्या नांवाखालीं त्याचीच शेखी मिरवायची ! अशा मुजोर, मुर्दाडपणापेक्षां ते केलेले अनाचार आपण केलेले नाहीत असं भासवून सज्जन म्हणून मिरविणाऱ्याचा भित्रा ओशाळेपणाच अधिक चांगला हें खोलवर विचार केल्याखेरीज कुणाच्या कसं ध्यानीं यावं ?

माणसानं शेखी मिरवायची असते ती कांहीं तरी बहादुरी केली असेल त्याची. मग केलेल्या अनाचाराची बहादुरी करून शेखी मिरविणारा माणूस हा मेलेल्या मनाचा जिवंत राक्षसच नव्हे का ? अनाचाराला जो अनाचारच मानत नाहीं, उलट शेखी मिरविण्यासारखं आपण कांहीं तरी थोर कृत्य केलं आहे असं समजून चालतो तो, कितीहि प्रामाणिक असला तरी त्याला सुधारण्याची सारी आशा केंव्हाच संपली आहे असंच यावरून ठरत नाहीं का ?

ढोंगी माणूस आपण केलेल्या कृत्यावर पांघरून घालून सज्जनपणाचा आव आणतो, तें का ? तसं केलं नाहीं तर आपण बदनाम होऊं अशी भीति वाटते त्याला. पण त्याला ही वाटणारी भीतिच अजूनहि त्याला चांगुलपणाची चाड आहे, न्यायनीतीची मुरवत आहे, खऱ्याची लाज आहे हेंच उघड करीत नाही का ? चांगलं कोणतं आणि वाईट कोणतं हें कळतं त्याला. पण तें वळत नाही. म्हणूनच प्रसंगी वेडंवाकडं कृत्य होऊन जातं त्याच्या हातून. त्यानं ओशाळतो तो; आणि म्हणून तें झाकून टाकायचा प्रयत्न करतो तो कारण चांगुलपणाच्या जिवंतपणाची धुगधुगी अजूनहि शाबूत असते त्याच्यांत. तिच्या समाधानासाठीं वरकरणीं कां होईना, पण सज्जनपणाचं सोंग सजवत असतो तो. जोपर्यंत ही चांगुलपणाची जाणीव त्याच्यांत आहे तोपर्यंत त्याला सुधारायला पुष्कळ सवड आहे, हें काय सूज्ञ माणसाला मीं सांगायला पाहिजे ?

मग केलेल्या दुष्कृत्याची शेखी मिरविणाऱ्या निर्ढावलेल्या माणसाच्या मुर्दाड प्रामाणिकपणापेक्षां तीं कृत्यें झांकून ठेवूं पहाणाऱ्या ढोंगी माणसाचा भित्रा ओशाळेपणाच अधिक चांगला होय असं मी म्हटलं तर त्यांत वावगं काय आहे ?

दुसऱ्याचं अनहित करून, दुसऱ्याचा नाश करून स्वतःचं हित साधण्यासाठीं आचरलेला ढोंगीपणा मात्र सर्वस्वी त्याज्य होय, हें प्रत्येकानं नीट ध्यानांत ठेवलं पाहिजे. निरुपद्रवी ढोंगाच्या नांवाखालीं अशा घातकी ढोंगांचं समर्थन करण्याचा माझा बिलकूल इरादा नाहीं हें मी मुद्दाम स्पष्ट करूं इच्छितो.

### दैव

एखादा माणूस प्रकाशित ज्योतीच्या जितका जवळ येईल तितकी मागं पडणारी त्याची छाया मोठी असते, त्याप्रमाणं एखाद्याचा उज्ज्वल गुणांशीं जितका अधिक संबंध तितकं त्याच्या पाठीशीं उभं असलेलं त्याचं दैव अधिक खडतर असावं ना ?

१६...

# मनाचा पारवा

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

एके काळच्या माझ्या थोर आकांक्षांच्या भव्य पण आजच्या पडक्या प्रासादाच्या उजाड अवशेषांच्या खिंडारीं बसून माझ्या मनाचा पारवा एक सारखा साद घालीत आहे. असा साद घालीत राहणें एवढा एकच चाळा उरला आहे आतां. आजवरची देहमनाची धडपड शांत होऊं लागली आहे. आपल्या आकांक्षांना नव्यानं साकार करण्याची उमेद उरलेली नाहीं. आजवर उपसलेल्या कष्टांचा आणि त्यांतून हातीं लागलेल्या फलाचा आढावा घ्यायचं काम तेवढं उरलं आहे आतां. पण आढावा तरी कशाचा घ्यायचा ? सारा जमाखर्च उघडाच आहे. तारुण्याच्या प्रारंभकालीं मनांत वागविलेलीं कित्येक सुरम्य ध्येयं स्वप्नासारखीं आज विरून गेलीं आहेत. त्यांची स्मृति तेवढी शिल्लक उरली आहे. ही स्मृति श्रद्धेनं जागवीत राहणं एवढंच काम उरलंय आतां. आणि ही स्मृति निदान स्मृतिशेष तरी रहावी म्हणून माझ्या मनाचा पारवा त्या पडक्या प्रासादाच्या उजाड अवशेषांच्या खिंडारीं बसून सारखा साद घालीत आहे.

एके काळीं मी किती तरी थोर आकांक्षा, उच्च ध्येयं मनाशीं बाळगलीं होतीं ! त्यांतील एकेका आकांक्षेच्या पूर्तीसाठीं, एकेका ध्येयाच्या प्राप्तीसाठीं

माझ्या परीनं मी कष्ट केले होते. पण त्यांतील कांहीं आकांक्षा माझ्या आटोक्याच्या बाहेरच्या ठरल्या. त्यांतील कांहीं ध्येयं गाठतांना माझ्या शक्तियुक्तीची झेंप अपुरी पडली. माझे हात त्यांच्यापर्यंत पोंहचूंच शकले नाहींत. कांहीं ध्येयं तर मला अंगीकाराव्या लागलेल्या जीवनपथापासून दूर एका बाजूला राहिलेलीं आढळून आलीं. कांहीं आकांक्षा पुऱ्या झाल्या; सामान्य ध्येयं हातीं लागलीं. मोठ्या उत्साहानं त्यांचेच चिरे करून ते भावी भव्य प्रासादाच्या उभारणीच्या कामीं लावले. पण तेवढ्यानं तो प्रासाद पुरा उभा राहणं शक्य नव्हतं. आणि अपुऱ्या उभारणींतील कांहीं चिरे तर काळाच्या तडाख्यांत निभाव न लागल्यामुळं निखळून इतस्ततः ढांसळून पडले गेले. आणि मग माझ्या मनाचा पारवा त्या पडक्या प्रासादाच्या उजाड अवशेषांच्या खिंडारीं बसून एकसारखा साद घालीत रहातो.

मनाशीं योजलेला ध्येयांचा भव्य प्रासाद अर्ध्यावरूनच कोसळून पडला आहे. त्याचे चिरे इतस्ततः विखुरले गेले आहेत. बांधला तेवढाहि प्रासाद काळाशीं सामना देऊन उभा रहाण्याइतका समर्थ ठरला नाहीं. म्हणूनच त्याचे चिरे आज असे अस्ताव्यस्त अवस्थेंत पडले आहेत. कदाचित् लवकरच ते नामशेषहि होऊन जातील. निदान भावी कालांत पुराणवस्तुसंशोधकाच्या जिज्ञासेनं कुणीं महाभागानं विस्मृतींतून त्या चिऱ्यांचं उत्खनन करून त्यांना प्रकाश दाखविला तरी पुष्कळ झालं. तथापि तसं नाहींच घडलं तरी—थांबा, ते निखळलेले चिरेच माझ्या मनाच्या पारव्याच्या रूपानं साद घालून आपलं मनोगत जणूं प्रगट करीत आहेत. ऐका....ऐकलांत तो साद ?

तो साद ऐकून कुणाला वाटेल, कीं माझ्या मनाचा पारवा आपल्या ध्येयाच्या विफलतेचाच आर्त साद घालून त्या पडक्या प्रासादाच्या उदास दृश्याला अधिकच उदासपणा आणीत आहे. विषण्णतेची अवकळा आणीत आहे. पण तसं नक्कीच नाहीं. तो साद विफलतेचा असेल, पण विषण्णतेचा नक्कीच नाहीं. आकांक्षा विफल झाल्या म्हणून विषण्ण व्हायचं काय कारण ? त्या आकांक्षांच्या पूर्तीसाठीं कष्ट करायला मीं कुचराई केली होती का ? नाहीं, मुळींच नाहीं.

कष्ट करणं माझ्या हातीं होतं. आणि जें माझ्या हातीं होतं तें सारं कांहीं माझ्या कुवतीप्रमाणं मीं केलं होतं. पण माझे प्रयत्न यशस्वी करणं कांहीं माझ्या हातीं नव्हतं. मग जे माझ्या हातीं नव्हतं तें हातीं आलं नाहीं म्हणून मीं विषण्ण कां व्हावं ?

कदाचित् मीं उराशीं बाळगलेलीं ध्येयं माझ्या आवाक्याच्या बाहेरची होतीं म्हणून तीं यशस्वी झालीं नसतील. पण ध्येयं हीं कांहींशीं आवाक्याच्या बाहेरचींच असतात—आवाक्याच्या बाहेरचींच असावीं लागतात. तीं आवाक्याच्या बाहेरचीं होतीं म्हणूनच तर त्यांना ध्येयं म्हणायचीं. जीं थोड्याशा प्रयत्नानं सहज साध्य होतात तीं ध्येय कसलीं ? आणि तीं साध्य झाल्याचं महत्त्व तरी कसलं ? आवाक्याच्या बाहेरचीं म्हणून उच्च ध्येयं पुष्कळदां हातीं लागत नाहींत हें खरं. पण सहज हातीं येणाऱ्या ध्येयांपेक्षां अशीं उच्च ध्येयं डोळ्यांपुढं ठेवणंच अधिक श्रेयस्कर नाहीं का ? ध्येयांच्या यशापयशावर तीं बाळगण्याचं मूल्यमापन करणं हेंच चुकीचं आहे. आपल्या मनोवृत्तीचा क्षुद्रपणाच उघडा पडतो त्यामुळं. अपयश हा गुन्हा नव्हे, पण खुजं ध्येय बाळगणं गुन्हा होय असं म्हटलं जातं तें याचसाठीं.

प्रातःकालच्या पूर्वार्धांत एकीकडं तेजस्वी तारामंडळ आकाशांत चमचम करीत असतं आणि दुसरीकडं अस्फुट उषारंजित क्षितिज सुरम्य सौंदर्यानं नटलेलं असतं. कुण्या दिव्य महत्त्वाकांक्षी पुरुषाचं विशाल अंतर्याम प्रकट होतंय जसं कांहीं ! होय, कुण्या महान् महत्त्वाकांक्षी पुरुषाचं मूर्त अंतर्यामच आहे तें. त्यांतील एक एक तारा म्हणजे त्यानं आपल्या हृदयांत पूजलेली एक एक महान् आकांक्षाच ! परमोच्च ध्येयच !

थोड्याच वेळांत दिशा उजळूं लागतात. सूर्योदयाचा समय जवळ जवळ येऊं लागतो. जणूं त्या महापुरुषाच्या खडतर जीवनाचा प्रारंभकालच सुरू होतो. अल्पावधींतच सूर्योदय होतो; आणि आकाशांतील एक एक तारा तात्काळ लुप्त होऊन जाते. जणूं त्या महापुरुषाचं अंतःकरणांत पूजलेलं तारारूपी एक एक ध्येयच गळून पडतं. म्हणून काय तो दिव्य पुरुष खंत करीत बसतो ? नाहीं,

नाहीं बरं. योग्य समय येतांच पुन्हा नव्या जोमानं आपली ध्येयसृष्टि पाजळून तिच्या पूर्तीसाठीं तो सज्ज झालेला असतो. तीं ध्येयं साध्य होत नसतील. पण त्याला तीं साध्य करण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांचं समाधान थोडं का मिळत असेल ?

मग माझ्या मनाचा पारवा एके काळच्या माझ्या थोर आकांक्षांच्या भव्य पण आजच्या पडक्या प्रासादाच्या उजाड अवशेषांच्या खिडारीं बसून साद घालीत आहे म्हणून तो विषण्णतेचा आहे असं कसं म्हणतां येईल ? तो साद अपयशाच्या विषण्णतेचा नाहीं तर केलेल्या कष्टाच्या समाधानाचा आहे बरं !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २२३८० वि: निबंध
क्रमांक ११८४ नों. दि: २३।९।८०

## समानतेचें सामर्थ्य !

जीवनांतील सहचरांची समानवृत्ति हें प्रेमाचें अधिष्ठान होय. आणि असें प्रेम हेंच संसाराचें वैभव. त्यामुळं सुख दुणावतें आणि दुःख विभागलें जातें.

१७...

# दोन सुंदरी

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

मानवांच्या जीवनावर ज्यांनीं सखोल परिणाम घडविला आहे, त्या दोन सुंदरी म्हणजे श्री आणि सरस्वती. मानवी जीवनाच्या बाहेर आपल्या प्रभावाला वाव नाहीं हें ओळखूनच कीं काय त्यांनीं आपला सारा प्रभाव एकट्या मानवावरच इतका केंद्रित केला आहे, कीं त्या दोघींच्या आधारावांचून सारं मानवी जीवनच अशक्य व्हावं! एकीच्या आधारावांचून मानवाला पशुतुल्य हीन जिणं जगावं लागतं, तर दुसरीच्या आधारावांचून शिंगं आणि शेपूट नसलेला शुद्ध पशुच ठरतो तो. इतक्या मानवी जीवनाशीं त्या एकजीव होऊन बसल्या आहेत!

मानवी जीवनावर सखोल परिणाम घडविण्यांत या दोघींचाहि सारखाच वांटा असला, तरी त्यांच्या एकमेकीच्या स्वभावांत मात्र जमीनअस्मानाचें अंतर आहे. श्री नटवी, चंचल आणि उद्दाम; तर सरस्वती साधीसुधी, गंभीर आणि विनम्र. श्री अत्यंत मोहक, सुंदर आणि मायावी; तर सरस्वती रुक्ष, नजरेंत न भरणारी आणि कंटाळवाणी. श्रीचा नाद फक्त एकच, एकसुरी 'छन् छन्'! पण मानवी मनाला मोहित करण्याची केंवढी जबरदस्त शक्ति त्याच्यांत! लहान

असो थोर असो सारेजण त्या नादांत दंग ! सरस्वती मयूरासनावर बसली आहे, वेगवेगळ्या सुरावटींत वीणावादन करीत आहे. पण त्या वादनाची गोडी कळणारे महाभाग किती थोडे ! आणि ती गोडी आवडीनें चाखणारे तर त्याहूनहि थोडे !

आपला जोडीदार शोधण्यांत श्री फारच गाफील आणि बेदरकार ! त्यामुळं पुष्कळदां अत्यंत नालायक जोडीदार मिळविल्याबद्दल कुप्रसिद्धि मिळविली आहे तिनं. कोणत्या वेळेला कसला जोडीदार निवडेल याला कांहीं धरबंधच नाहीं. फक्त प्रसंगीं स्वतःचा जीव मारूनहि तत्परतेनं तिची जोपासना करणारा कुणी भेटला, कीं झालीच त्याच्यावर फिदा ! आपल्या जोडीदारच्या सौख्याची तर तिला पर्वाहि नसते. मग त्याच्यासाठीं झीज सोसण्याचं तर नांवच नको ! तिला कांहीं तोशीस पडायला लागली रे लागली, कीं तिनें आपल्या जोडीदाराच्या हातावर तुरी दिल्याच !

सरस्वती मात्र लायकीशिवाय कधींच कुणावर अनुग्रह करीत नाहीं. आणि एकदां अनुग्रह केलेल्या जोडीदाराला तर ती कधींच दगा देत नाहीं. आदर्श आर्य स्त्रीसारखं आपल्या जोडीदाराच्या पायांची दासी होऊन रहाण्यांतच धन्यता वाटते तिला.

श्री ही एक नाठाळ स्त्री, तर सरस्वती पुण्यशील पतिव्रता ! पण दुर्दैव हें कीं श्रीच्या संसाराहून सरस्वतीचा संसार फारसा सुखाचा असतो असं मात्र नाहीं ! श्री ही पुष्कळदां नालायकांच्या पदरांत पडत असल्यामुळं तिच्या जीवनाच खरं सार्थक साधलं न जावं यांत कांहींच नवल नाहीं. पण सरस्वती लायख जोडीदाराच्या पदरांत पडत असली तरी असा जोडीदार पुष्कळदां संसाराची तोंडमिळवणी करण्यांतच मेटाकुटीला येत असल्यामुळें त्यांचा ओढघस्तीचा संसार सदैव दुःखीकष्टीच होतो.

एका गांवांत एक धनाढ्य मारवाडी रहात होता. त्यानं व्यापारांत जसं नांव मिळवलं होतं, तसंच दानशूर म्हणूनहि लौकिक संपादन केला होता. त्यानं बरींच देवळं बांधलीं होतीं. ठिकठिकाणीं मोफत अन्नछत्रं चालविलीं होतीं.

त्यामुळं इतर देवळं आणि त्यांतील देव यांच्या चालू असलेल्या अनास्थेंत कांहीं वर्षांनीं या नव्या देवळांच्या आणि त्यांतील देवांच्या अनास्थेची जादा भर पडणार होती, आणि चालविलेल्या अन्नछत्रामुळं भीक मागण्याच्या कलेला उत्तेजन मिळून ऐतखाऊंचा पांजरपोळ पैदा होणार होता, हें खरं. पण त्यामुळं दानशूर धर्मात्मा म्हणून त्यानं मिळविलेल्या लौकिकाला कमीपणा यायचं कांहींच कारण नव्हतं.

त्या गांवांत तसाच एक प्रतिभासंपन्न सरस्वतीभक्त रहात होता. त्याच्या प्रतिभा-विलासाचा लौकिक त्या मारवाड्याच्या लौकिकाहून मोठा होता. घराबाहेर अपरंपार लौकिक होता. पण त्याच्या घरांत अठराविश्वें दारिद्र्य नांदत होतं. कित्येकदां तर एका वेळच्या अन्नालाहि त्याला महाग होण्याची पाळी येत होती. हें न साहून त्याचा अभिमान बाळगणाऱ्या एका मित्रानं या दशेंतून त्याला मुक्त करण्यासाठीं कांहीं प्रयत्न करायचं ठरविलं.

तो मित्र आपल्या प्रतिभासंपन्न लेखकाला घेऊन त्या दानशूर मारवाड्याच्या पेढीवर गेला. नमस्कारचमत्काराचा विधि यथासांग पार पडतांच त्या लेखकाच्या कलावती लेखणीचं रसभरीत वर्णन करून त्याला कांहीं मदत मिळावी म्हणून त्यानं त्या मारवाड्याला नम्रपणें विनंति केली.

" हे कसबी लेखक हाय का ? काय मिलवते आपल्या कलेवर ? " त्या मारवाड्यानं विचारलं.

" तसं कांहीं विशेष मिळत नाहीं, म्हणून तर आपल्याकडं आलोंय. " तो मित्र म्हणाला.

" कांहीं मिळत नाहीं ? अच्छा, अच्छा. हमे चांगला काम देएल. आनि वर पगारबी देएल. " मारवाडी म्हणाला. थांबून जराशानं त्यानं पुन्हा शंका विचारली, " अरे, पन ये कसबी लेखक हाय ये तो खरा हाय ना ? "

" अहो, कसबी म्हणून काय विचारतां ? त्याचा हात धरणारा लेखक शोधूनसुद्धां दुसरा मिळायचा नाहीं तुम्हांला. " चाळवलेल्या आशेमुळं अधीरतेनं तो मित्र म्हणाला.

“ ठीक, ठीक. असाच लेखक आमी कवापून मागते. ” आणि थोडं थांबून खालच्या आवाजांत तो मारवाडी पुढं म्हणाला, “ आमचा हिसाब ‘ डुप्लिकेट ’ लिवायचा हाय, तुमचा सारा कसब लावा कामाला, ये काम हुशारीनं करेल तर आमी येला शंबर रुपया पगार देएल—शंबर रुपया ! मातर तुमचा पुस्तक लिवायचा बेकार काम सोडून ये हिसाब लिवायचा काम रातबेरात करायला मागते, बोला पसंद हाय काम ? ”

हें ऐकून काय बोलावं हेंच त्या मित्राला कळेना; तो लेखक तर हतबुद्धच झाला !

आणि मग कसाबसा निरोप घेऊन ते दोघे मित्र पेढीबाहेर पडले !—आणि त्या लेखकाचं विपन्न जिणं मग मागें तसं पुढं यथाक्रम चालू राहिलं !

श्रीकडून सरस्वतीची अवहेलना व्हावी असाच दंडक आहे कीं काय कोण जाणे !

श्रीनं आपल्या बहिणीच्या संसाराला हातभार लावायचं ठरविलं, तर या भूतलावर केवढं सुखाचं साम्राज्य नांदेल ! सरस्वतीच्या स्नेहल संगतीनं श्रीच्या जीवनाचं सार्थक होईल, तसं श्रीच्या भरीव मदतीनं सरस्वतीचा ओढगस्तीचा संसारहि समृद्ध होईल !

पण असं कुठलं व्हायला ! कारण या जगांत बायकाबायकांचं एकमेकीशीं पटलं आहे कधीं ? बायकांतील या एकमेकीबद्दलच्या हेव्यादाव्यानंच जगांतील निम्याहून अधिक दुःखाची निर्मिति झाली आहे. स्वभावाला औषध नसतं हेंच खरं !

१८...

# म्हाताऱ्याचे डोहाळे

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

वाहून गेलेलं जल, बोलून गेलेला शब्द नि निघून गेलेलं वय पुन्हां कधींहि परत येत नाहीं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं ! पण हें कटु सत्य मला आतां इतक्या उशिरां सुचलं आहे कीं, तें सुचून न सुचल्याइतकंच निष्फळ झालं आहे ! कारण लौकिकदृष्ट्या मी आतां म्हातारा झालों आहे. लौकिकदृष्ट्या म्हणायचं कारण एवढंच कीं, मनानं म्हटलं तर अजून मी पुष्कळच तरुण आहें; आणि जगेनहि म्हणतों बरींच वर्षे. पण हें जगच इतकं नाठाळ नि उपद्यापी आहे कीं, उठल्या बसल्या मला ' म्हातारा, म्हातारा ' म्हणूनच अर्धमेला करून सोडतंय ! खरंच सृष्टिक्रमाला डावलून यमाचं केव्हां बोलवणं येईल, तें तरी कुणी सांगावं ? या साऱ्याचा विचार करूं लागलों म्हणजे असं वाटूं लागतं, कीं सृष्टि-सुंदरीच्या निसर्गरम्य नंदनवनांतील सुखद प्रवास संपवून अखेर एखाद्या रुक्ष सहारा वाळवंटाच्या किनाऱ्याला येऊन पोंचलेल्या दुर्दैवी प्रवाशासारखी माझी स्थिति झाली आहे ! दुर्दैवाचा कळस हा कीं, इथून परत फिरेन म्हटलं तरी तें आतां शक्य नाहीं ! उघड्या डोळ्यानं हें समोर पसरलेलं म्हातारपणाचं —हो म्हातारपणाचंच–उजाड रुक्ष वाळवंट तुडवून पैलतीराला गेलंच पाहिजे;

नि कण्हत कुंथत जात असतां वाटेंत सहानुभूतीच्या निर्झरिणीविना तहानेनं व्याकुळ होऊन तडफडत कुठं तरी मग एकदांचा प्राण सोडला पाहिजे!

बसल्या बसल्या गतायुष्याचं सिंहावलोकन करूं लागलों म्हणजे मनःश्चक्षूंपुढून सरकणारी ती बालपणची अवखळ बालिशता नि तें लडिवाळ कौतुक; तारुण्यांतील ती बेडर वृत्ति नि तो स्वैर विहार; नि प्रौढपणांतील ती जबाबदारी नि त्यापासून वाटणारें तें अभिमानी गांभीर्य! अहाहा! हीं सारीं दृश्यें पाहिलीं म्हणजे असं वाटूं लागतं कीं, हा आयुष्यपट पुन्हां एकदां पहिल्यापासून सुरूं करायला मिळाला तर काय बहार होईल! केवळ पुन्हां एकदां मजा मारतां यावी म्हणून म्हणत नाहीं मी, तर त्या त्या वेळीं आपल्या नैसर्गिक शक्तींचा आपण इतका कांहीं दुरुपयोग केलेला असतो, इतक्या घोडचुका केलेल्या असतात, ईश्वरी देणग्यांचा आपण इतकी उच्छृंखल उधळपट्टी केलेली असते, कीं आतां त्याबद्दल पश्चात्ताप होऊनहि उपयोग नसतो. त्या वेळीं आपल्या आयुष्याची आपणास खरी किंमत कळलेलीच नसते. आणि आतां कळूनहि तिचा उपयोग नसणार! तेंच जर पुन्हां पहिल्यापासून आयुष्य उपभोगण्याची संधि मिळाली, तर आपण असं काहीं नमुनेदार जगून दाखवूं—पण तसं कुठलं व्हायला? आपल्या अनुभवांचा फायदा निदान या अलिकडील तरुणांना तरी मिळूं दे म्हणून आपण कांहीं सांगूं लागलों, तर ते दटावून म्हणतात कसें, 'चूप बसा, करून करून भागले नि उपदेश करायला लागले!'

कुणाला सांगितलं तर खोटं वाटेल, पण हें घर मुलामाणसांनीं, नातवंडापरतवंडांनीं अगदीं फुलून गेलंय ना, पण या गर्दीतसुद्धां मला कसं अगदीं एकलकोंड्यासारखं वाटतंय! सारीजण मारे आपल्या ह्यांतच दग आहेत! तो त्याचा, हा ह्याचा, पण मी मात्र जणूं कुणाचाच नव्हे! कुणाच्याच राजकारणांत मला स्थान नाहीं. मी म्हणजे जणूं एकांडा शिलेदार! अडगळींतील वस्तुंपैकीं एक! हा पाण्याचा लोटा, हा मेसाचा सोटा, ही दोऱ्यानं बांधलेली जुनी आरशी, ही संपूर्ण दांतांची कवळी नि ही तपकीची डबी; बस्स! हेच काय ते माझे सखे-सोबती नि मित्रमैत्रिणी! नाहीं तर ते तरुणपणचे दिवस!

त्याच माझी आज ही स्थिति बरं! हें म्हातारपण—हें म्हातारपणच याला सर्वस्वीं कारण आहे! छेः छे, म्हातारपणीं जिव्हाळ्यानं विचारपूस करायला माणसाला निदान आपली सत्तेची बायको पाहिजे हेंच खरं!

आतां हीं पोरंसोरं माझ्या भोंवतीं कधीं जमत नाहींत असं नव्हे, पण त्यांनीं जमायचं म्हणजे कशाला? तर माझ्याकडं आपले असावेत म्हणून ठेवलेले माझ्या विम्याचे दहा हजार रुपये कांहीं तरी युक्तीनं काढायला! एवढ्या बाबतींत कशी सर्वांची एकजूट असते अगदीं! पण या सर्वांचं मी केव्हांच बारसं जेऊन बसलोंय ना! कधींमधीं ते सारेजण माझ्या भोंवतीं जमले म्हणजे आधीं मोठ्या साळसूदपणानं माझ्या प्रकृतीची चवकशी करतात, पण दिवसेंदिवस ती टणकच होत चाललेली दिसतांच, वरून त्यांनीं कितीहि आनंद दर्शविला तरी त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं नैराश्य मात्र माझ्या अधु डोळयांनाहि स्पष्ट दिसतं; आणि मग हळूंच म्हणतात कसें, कीं 'आजोबा, तेवढें पैसे द्या ना, तुम्हाला ठेवून काय करायचे आहेत ते?'

आतां बघा, यांना पैसे पाहिजेत नि मला नकोत काय? तुम्ही सुद्धां म्हणाल कीं, म्हाताऱ्याला पैसे घेऊन काय करावयाचे आहेत म्हणून; पण तुम्हांला कसं समजत नाहीं? मी तर म्हणतों, इतर कुणापेक्षां म्हाताऱ्यांनाच पैशाच्या ऊबेची अधिक गरज आहे. दरिद्र्याला जगांत आप्तबंधु कोणी नाहींत असं तुम्हीच म्हणतां. म्हाताऱ्यांनाहि जगांत आपलं असं कोणी नसतं हें तुम्ही पहातांच. मग दरिद्री म्हातारा तर दुनियेच्या दर्यांत खसखसीच्याहि पासंगाला लागायचा नाहीं!

आणि खरं सांगू तुम्हांला? कुणाला बोलायचं नाहीं हं, अंदरकी बात आहे; म्हणून म्हणतो—कान करा इकडं. अहो, शास्त्रीय शोधाचं युग आहे हें! काय—? हो, उद्यां एखादा शोध निघाला कीं, सारे म्हातारे चुटकीसरशीं पंचविशीचे नवजवान होणार! मग—आयत्यावेळीं खर्चासाठीं कुठं धांवपळ करायची माणसानं —काय समजलं?

बाकी वर्तमानपत्रांतील त्या गुटिका आणि तीं चुर्णें किंवा ती अगडबंब नांवाचीं इंग्रजी औषधें—छे छे, या बाबतींत तीं अगदीं कुचकामाचीं! उगीच कांहीं तरी सांगत नाहीं, अनुभव घेतलाय महाराजा, म्हणून सांगतों.

★ ★ ★ चौऱ्याऐंशीं ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

लहान मूल खाण्यापेक्षां चिवडूनच जास्त मातेरं करतं. म्हाताऱ्याचं झालं तरी तसंच असतं, त्याला पुष्कळ खावंसं वाटतं; पण त्याला कशांत गोडीच वाटत नाहीं, तर तो खाणार काय कपाळ ! तुम्ही मारे पंचपक्वान्नांच्या ताटावर आडवे हात मारीत असता, पण तेंच समोर पाहिलं कीं म्हाताऱ्याला मळमळूं लागतं ! हेंच असं नव्हे, दुसरं कसलंहि विलोभनीय दृश्य—मोहक सौंदर्य दिसलं तरी त्याला असंच भडभडून येतं ! कां नाहीं येणार ? सामर्थ्य गेलं, इच्छा राहिली; वैभव गेलं आणि दुःखद स्मृति तेवढी राहिली !

बरी आठवण झाली. एकदां काय झालं, सहज रस्त्यानं निघालो होतों. मागून कांहीं मुली येत होत्या. तोंच समोरून जनावरें आलीं म्हणून जरा रस्त्याच्या कडेला झालों. त्यांतील एक म्हैस अगदीं अंगावरच यायला लागली म्हणून आणखीन् जरा कडेला व्हायला गेलों तोंच एकदम गुडघाभर खोल गटारांत पाय जाऊन खालीं कोसळणार, इतक्यांत त्यांतल्या एका मुलीनं चटकन् पुढं येऊन माझा हात धरून वर उठविलं आणि ती म्हणाली,

"आजोबा, पडत होतां ना खालीं !"

अरेरे, त्या पोरीला वाटलं असेल कीं एका म्हाताऱ्यावर आपण केवढे उपकार केले ? पण उपकाराऐवजीं अंतर्यामीं ठणकणाऱ्या आवाळूवर तिनं केवढा भयंकर घणाचा घांव घातला आहे याची तिला कल्पना तरी असेल का ? मला काका, मामा म्हणाली असती तर काय चार चव्वल खर्च झाले असते तिचे ? पण नाहीं; जो उठतोय तो आजोबा म्हणतोय ! जो भेटतोय तो आजोबा म्हणतोय ! ज्याला त्याला माझ्या म्हातारपणाची हरघडीं आठवण देण्यांत जणू काय आसुरी आनंद होतोय ! पण आजोबा हा शब्द ऐकतांच मला काय वाटतंय याची कुणाला फिकीर आहे ? म्हणे आजोबा ! अरेरे ! त्यावेळीं असं कांहीं झालं म्हणतां ! —आजोबा हा शब्द कानीं पडतांच माझ्या अंतःकरणाचं काय झालं नि काय नाही तें एक परमेश्वराला माहीत; एक माझं मला माहीत; किंवा एक माझ्यासारख्या म्हाताऱ्या जिवालाच माहीत !

बेअकली पोरटी ! तारुण्याची घमेंड मारतेय !

म्हातारपण हें हळूंहळूं आलं खरं, पण हळूंहळूं म्हणजे अगदीं चोर पावलानंच आलं! आणि म्हणूनच आकस्मिक आल्यासारखं वाटतंय मला. कुठल्याशा एका इंग्रज लेखकाला म्हणे सकाळीं झोपून उठून पाहतों तों आपण एक प्रसिद्ध पुरुष झालों असल्याचें आढळून आलं. अशाच आकस्मिक रीतीनं एके दिवशीं मीहि म्हातारा झालों असल्याचं माझ्या प्रत्ययाला आलं. मी म्हातारा होत चाललों आहे याची मला त्या आधीं कधीं कल्पनाहि शिवली नव्हती. आयुष्याचं सार्थक झालं असं वाटण्यासारखं एखादं महान् कृत्य आपल्या हातून होण्याची वेळ अद्याप यावयाची आहे. अशाच भावनेंत किती उत्कंठित; अंतःकरणानं त्या वेळेची मी वाट पहात बसलों होतों. कां इतक्यांत आकस्मिक रीतीनं म्हातारपणच माझ्या समोर येऊन उभं राहिलं? आयुष्याची इतिश्री व्हायची वेळ आली पण हातून व्हायच्या कर्तृत्वाचा अद्याप ठावठिकाणाहि नाहीं. कां त्या कर्तृत्वाची वेळ या पूर्वींच निघून गेली, नि गाफीलपणामुळं तिची मला चाहूल लागली नाहीं? माझी आई माझ्या लहानपणची म्हणून एक गोष्ट सांगत असे, तिची यावेळीं मला आठवण होते. आम्ही बैलगाडींतून मजल दर मजल करीत म्हणे पंढरपुरच्या यात्रेला निघालो होतों. अखेर आम्ही पंढरपुरला पोहचून यात्रा आटोपून पूर्वींच्याच वस्तीच्या गांवीं मुक्काम करीत परत येत असतांना तीं ओळखीचीं ठिकाणें पाहून अचंब्यानं मीं आईला विचारलं, " आम्ही परत का ग निघालों आई, पंढरपुरला जायचं नाहीं, होय? " त्यावेळीं बिचाऱ्या आईनं काय उत्तर देऊन माझं समाधान केलं कोण जाणें. पण आतां मला प्रश्न विचारावासा वाटतों कीं, " केवळ वायफळ रखडण्याकरतांच माझा जन्म होता का? आयुष्य म्हणजे आजवर घालविलं तेंच का? " यावर उत्तर देऊन माझं कोणी समाधान करील का?

तशीच परवांची हकीकत. आमच्या गल्लींतला तो म्हातारा—म्हातारा म्हणजे काय तसा अगदींच म्हातारा नव्हता तो, अवघं पाऊणशें वयमान असेल नसेल त्याचं! फारच झालं तर आणिक दहा पांच वर्षांनीं अधिक! पण गेला बिचारा! एवढं अफाट जग नि अगणित गोतावळा सोडून एकटा गेला बिचारा!

फार फार वाईट वाटलं मला ! शाळासोबती ना माझा ! हुंदके देऊन रडलों मी त्याच्यासाठीं ! माझ्या नात्यागोत्यांतील आजवर इतकीं माणसं मेलीं पण असं दुःख कधीं झालं नव्हतं मला ! पण त्या दिवशीं मात्र कळवळून रडलों स्फुंदस्फुंदून रडलों, अगदीं दिवसभर रडलों; नि रात्रभर गुडघ्यावर डोकें टेकून विचार करीत सचिंत बसलों ! मला भीति वाटूं लागलीय कसली तरी ! कसली तरी म्हणजे—माझे सारे समवयस्क सोबती जगांतून आधींच निघून गेल्यामुळं एकटेपणाची-किंवा तसं कशाला, तुम्ही मिस्किलपणानं हंसत म्हणाल कीं, यमराजाच्या आगमनाची मला भीति वाटत असेल म्हणून ! हो, मी जाणून आहें तें ! पण तसं नाहीं—खरंच नाहीं. मी स्वतःच सांगतों ना तुम्हाला ! पण आमचं म्हणणं खरं मानण्याइतकी म्हाताऱ्यांची किंमत कोठें आहे तुम्हाला ! आणि याची मला भीति—भीति नि दुःख वाटतंय ! बिचारा एवढा मोठा म्हातारा मेला; माझ्यासारखा त्रयस्थसुद्धां कळवळून रडला; पण त्याच्या नात्यागोत्यातल्यांनीं रडायचं तर राहोच, उलट 'सुटला म्हातारा, सोनं झालं त्याचं—' म्हणून समाधानाचा निश्वास सोडला ! काय ही त्याच्या मरणाची निर्दय थट्टा ! हृदयशून्य विटंबना ! त्याचं सोनं झालं अं ? जुनं तें सोनं समजून हृदयाशीं कवटाळायला तुम्हीं एका पायावर तयार ! जुनी म्हणून अनिष्ट रूढीसुद्धां तुम्हाला प्रिय ! तशीच ती दारू, जितकी अधिक जुनी तितकी अधिक औषधी नि स्वादिष्ट ! पण माणूस मात्र जितकं अधिक म्हातारं तितकं अधिक तिरस्करणीय नि त्याज्य वाटावं अं ? तो मेला कीं त्याच्या देहाची माती व्हायची आहे हें जाणत असून त्याच्या देहाचं सोनं झालं म्हणून सुटकेचा निःश्वास सोडायला तुम्ही मोकळेच ! कोण हा कठोर उपहास ! कोण ही भयंकर बेफिकीरी ! याचीच मला भीति वाटूं लागलीय. मग अशा स्नेहशून्य वातावरणांत म्हाताऱ्यांनीं जगायचं तरी कसं ?

म्हाताऱ्याच्या मरणाला काडीइतकंहि मोल असूं नये ! कुणालाहि त्याची उणीव भासूं नये ! काय हा न्याय ! म्हातारपण म्हणजे निव्वळ पोरखेळ, असं का तुम्हाला वाटतंय ? छे, छे ! तो एक फारच थोड्याच्या वाट्याला येणारा दुर्मीळ वर आहे, ईश्वरी प्रसाद आहे याची कुणालाच जाणीव नसावी काय ?

पण मी तुम्हाला सांगतों, कीं म्हातारपण म्हणजे एक दिव्य आहे ! म्हातारपण म्हणजे कित्येक वर्षांच्या तपश्चर्येचं फळ आहे ! म्हातारपण म्हणजे आयुष्याच्या हिमगिरीवरील धवल कैलास शिखर आहे ! ! —मला माहित आहे, तुमचे मिस्किल डोळे कां हांसरे झाले आहेत, तुमचे ओठ कां फुललेले आहेत ते ! माझ्या बोलण्यांतील 'धवल शिखर' नि 'कैलास' हे शब्द म्हाताऱ्याच्या पाठीला चिकटवून कांहीं तरी कोटी करण्याचा तुमचा विचार आहे, हें मी पूर्ण ओळखून आहे ! पण मी तुम्हांला ठांसून सांगतों कीं, म्हातारपण म्हणजे खरोखरीच म्हातारपण आहे, पक्वपण आहे ! नि पक्व झालेलं फळ कुणाला रुचकर—गोड लागत......

पण पिकलेलं फळ सोडून कैऱ्यांच्या मागं धावणारं जग आंबटशोकी आहे नाहीं का ? मग त्यांत आमच्या सारख्या पक्व माणसांची गोडी कुणाला वाटणार ? आणि कुणाला त्याच्या रुचीची मातब्बरी सांगून तरी काय उपयोग आहे ? उलट या पोरकट जगांत म्हातारा आत्मप्रौढी मिरवतोय म्हणून टिंगलच व्हायची आमची ! म्हणून नकोच, तोंडातून शब्द काढायला नको कुणापुढं. आपलं दुःख आपल्याच मनांत ठेवून जगायचं आहे आपल्याला. आपलं दुःख सहानुभूतीनं ऐकायला या चवचाल जगांत सवडच नाहीं ना कुणाला ? मग वायफळ बडबडच कशाला ?

लहानपणीं आईनं नेहमीं 'म्हातारा हो' म्हणून ओवाळावं. पण हा शाप ती माऊली कशासाठीं देत होती कोण जाणे. मलाहि त्या वेळीं खूपखूप जगायला मिळेल म्हणून कोण आनंद व्हायचा ! पण या म्हातारपणच्या दुःखाची त्या वेळीं थोडी जरी कल्पना असती, तर त्याच वेळीं या आयुष्याचा शेवट— पण जाऊं दे— ती वेळ निघून गेल्यावर आतां त्याचा विचार करून काय उपयोग ? एकूण माणसांनं जगण्यासारखं कांहीं जवळ आहे तोंपर्यंत मरण्यांत मौज आहे यांत शंका नाहीं ! पण आतां काय त्याचं ? आतां जगण्यासारखं कांहींच जवळ राहिलं नसल्यामुळं मरणांतहि मौज राहिली नाहीं. तेव्हां असं फुकट मरून तरी आतां काय उपयोग ?

— तेव्हां जगावंच म्हणतों आणखी बरींच वर्षं !

१९...

# ओढाळ मन

♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠ ♠

अति परिचयानं अवज्ञा होत असेल; पण थोड्याशाहि परिचयानं परिचित गोष्टींचा कंटाळा येऊं लागावा आणि नाविन्याची ओढ लागावी, हें नवलच नव्हे कां ? परिचयामुळं असलेले गुण दिसेनासे व्हावेत, नसलेले दोष दिसावेत आणि नाविन्यांतील काल्पनिक गुणांची मोहिनी पडावी अशीच मनाची घडण आहे कां ? नाविन्याची सतत ओढ हें प्रगतीसाठीं धडपडणाऱ्या मनाचं लक्षण होय असं कुणी म्हणेल. पण हें कितपत खरं आहे मला सांगतां येणार नाहीं. तुम्हाला तें खरं वाटत असेल तर खालील हकीकत वाचून तुम्हींच काय तें ठरवावं हें बरं !

एक तरुण संध्याकाळीं फिरायला बाहेर पडला होता. कोटाच्या कॉलरवर डाव्या बाजूला सुंदर फूल होतं, उजव्या बाजूला त्याची सुंदर पत्नी चालत होती. छातीवरील फूल हें बरोबर चालणाऱ्या सुंदर पत्नीचं प्रतीक होतं, कीं ही सुंदरी त्या फुलाचं चालतं बोलतं रूप होती असा पहाणाऱ्याला भ्रम पडावा इतका त्याच्या समवेतचा जामानिमा चित्तवेधक होता.

हें जोडपं असंच फिरत फिरत कांहींसं दूर, रस्ता सोडून एका शेताच्या बाजूला आलं होतं. त्यांनीं इकडं तिकडं पाहिलं. तोंच त्या शेताच्या बांधावर

कुंपणाच्या आंत एका झुडपावर एक फूल डोलत असलेलं दिसलं. पांढरंशुभ्र फूल होतं तें. आकारानं सुंदर आणि टपोरं ! क्षणभर कुणाचंहि मन आकर्षून घेईल असं मोहक ! आणि वाऱ्याच्या झोताबरोबर असं कांहीं डौलदार झोके घेत होतं, कीं कुणाला वाटावं आपला आस्वाद घेण्यासाठीं मानेनं खुणावून कुणाला तरी तें जवळ बोलावतच आहे.

हें दृश्य कौतुकानं पहात तें जोडपं जागच्या जागीं उभं राहिलं. कुंपणाच्या आंत तें फूल होतं. मान वेळवेळावून जणूं कुणाला तरी जवळ येण्याबद्दल खुणावत होतं. हा भाव त्या तरुणाला कळला कीं काय कोण जाणें. कारण थांबल्या जागेवरून तो हालला; नव्हे सरळ त्या बांधाकडंच गेला. त्याला तें फूल खुडून घ्यायचं आहे असं त्याच्या हालचालीवरून स्पष्टच दिसत होतं. हें सर्व ध्यानीं येतांच कांहींशा अनामिक खिन्नतेनं पहात ती तरुणी जागच्या जागींच खिळून उभी राहिली.

तो तरुण त्या फुलाजवळ जाऊन ठेपला. आडवं कुंपण होतं म्हणून बरं, नाहीं तर जवळ गेल्याबरोबर लगेच त्यानं तें फूल खुडून घेतलं असतं. " माझा आस्वाद घ्यायचा असेल त्यानं मला खुशाल खुडून न्यावं असं आव्हान केलंस, तें आव्हान मीं स्वीकारलं आहे. हें पहा; मीं तुला खुडून घेतों " असंच जणूं त्या फुलाला म्हणत जवळ जातांच कुंपणावरून आंत हात घालून तें फूल खुडून घेण्यासाठीं त्या तरुणाची धडपड चालू झाली.

पण तें फूल सहजासहजीं त्याच्या हातीं लागण्यासारखं नव्हतं. एक तर मधलं कुंपण कांटेरी होतं. त्यामुळं त्याच्याशीं अधिक लगट करण्याची सोय नव्हती. आणि दुसरं, तें फूल ज्या डहाळीवर होतं ती आटोक्याच्या बाहेर होती. वाऱ्याच्या झोताबरोबर हालतांना तिचा ओझरता स्पर्श होत होता तेवढाच. पण तेवढ्या स्पर्शानं त्याला अधिकच ईर्षा चढत होती. मधून मधून डहाळीला स्पर्श होतोय तसा तो त्या फुलालाहि होईल; आणि मग चटकन् तें फूल तोडून घेईन असा त्याचा अदमास होता.

पण अदमासाप्रमाणं अजून तरी तें फूल हातीं आलं नव्हतं. क्वचित् त्याच्या हाताला स्पर्श करी, पण खुडून घेतलं जाण्यापूर्वीच तें दूर जाई. वाऱ्यावर

नाचत होतं तें ! त्यामुळं वारा हातीं लागण्याइतकंच तें फूल हातीं येणं कठीण होतं. पण कठीण होतं म्हणूनच कीं काय, तें फूल खुडून घेण्याची त्याची ईर्षा अधिकच वाढली होती. तें फूल घेण्यासाठीं त्यानं निकराची धडपड चालविली होती. तें फूल हस्तगत करायचंच असा जणूं त्याचा निर्धार होता. कुंपणाला तो अधिकच बिलगला. त्याचे कांटे बोचत होते. पण आतां त्याचं त्याला भान नव्हतं. उलट त्या कुंपणावरून वांकून त्यानं आपला हात आंत लांबवर घातला. वाऱ्यावर नाचणारं तें फूल अजूनहि हुलकावण्या देतच होतं. त्या हुलकावण्याबरोबर त्याचा देह त्या कुंपणावरून इकडं तिकडं सरकत होता. कुंपणाचे कांटे त्याच्या देहावर ओरखडे काढीत होते. ठिकठिकाणीं अंगावरील वस्त्र फाटून लहान मोठ्या छिद्रांतून त्याची अब्रू उघडी पडत होती. पण कशा-चीच त्याला शुद्ध नव्हती. वा कशाची त्याला पर्वाहि नव्हती. कांहींहि करून तें फूल हस्तगत करायचं एवढं एकच तो जाणत होता.

आणि एकदाचं तें फूल त्यानं हस्तगत केलं, व विजयोन्मादानं आपल्या पत्नीकडं त्यानं पाहिलं. ती भांबवलेल्या नजरेनं त्याच्याकडं पहात होती; लगेच दुसरीकडं मान वळवीत होती. अंगावरच्या वस्त्राला ठिकठिकाणीं पडलेल्या छिद्रांमुळं उघडी पडलेली त्याची ओढाळवृत्ति पहावत नव्हती तिला. पण याचीहि त्याला शुद्ध नव्हती. महत्प्रयासानं मिळविलेलं तें फूल हातांत नाचवीत आनंदानं उड्या मारीत तिच्याकडं येत मोठ्या अभिमानानं तो आपल्या पत्नीला म्हणाला, " पाहिलंस हें फूल ? "

" हो पाहिलं. तगारीचं फूल आहे तें. ना भरदारपणा, ना सुवास ! सुंदर, सुवासिक गुलाबाचं फूल नको झालं तुम्हाला ! आपलं नशीब ! ' ती दुःखभरानं म्हणाली आणि त्याच्यापासून झटकन् दूर झाली.

' गुलाबाचं फूल —' असं तिनं म्हटल्याबरोबर कोटाच्या कॉलरकडं त्याची नजर गेली. तें फूल तिथं होतं कुठं ? केव्हांच तें गळून पायदळीं चेंगरून मातींत मिसळून गेलं होतं !

## २०...

# कर्तव्य-दक्षता

एखादा माणूस मोठा कर्तव्यदक्ष आहे असं दिसलं, कीं केवढं कौतुक होतं त्याचं ! थोर माणूस, आदर्श माणूस म्हणून जो तो गौरवूं लागतो त्याला. पण त्याचा हा चाललेला उदोउदो ऐकला, कीं मला मात्र गुदमरल्यासारखं होतं. लोकांचं कांहीं तरी चुकत आहे, त्यांची दिशाभूल झाली आहे, ही जाणीव कांहीं केल्या माझा पिच्छा सोडीत नाहीं. आणि मग मी अत्यंत अस्वस्थ होऊन जातों. कर्तव्यनिष्ठा हा समजला जातो तितका मोठा गुण नाहीं, हें मी विसरूं शकत नाहीं.

कर्तव्यनिष्ठ माणूस आपलं काम करतो तें कर्तव्य म्हणून, केलंच पाहिजे म्हणून, तें केल्याशिवाय सुटका नाहीं म्हणून. परिस्थितीचं दडपणच तें त्याला करायला लावतं. मग अशा अगतिकतेमुळें केलेलं काम, बजावलेलं कर्तव्य गौरवाला कसं पात्र ठरतं ? पार पाडलेल्या कर्तव्याच्या मागं बुद्धीची जाग असेल, पण अंतःकरणाची तळमळ असते असं मी मुळींच म्हणणार नाहीं. अंतःकरणाच्या तळमळीनं आपलं कार्य करतो तो नादी माणूस, छांदिष्ट माणूस, व्यसनी—हो व्यसनी माणूस ! —कर्तव्यनिष्ठ नव्हे.

विद्यार्थीदशेंत माझ्याकडून मदत मिळालेला व आज उच्च पदाला चढलेला एक गृहस्थ परवां अचानक माझ्या भेटीला आला. मी कांहीं अडचणींत आहें हें त्याला कर्णोपकर्णी कळलं होतं. 'कसं काय फिरकलांत इकडं ?' म्हणून मीं त्याला विचारलं. "आपण मोठ्या अडचणींत आहांत असं कळलं. अशा वेळीं माझ्या हातून होईल तेवढं सहाय्य करणं माझं कर्तव्य वाटलं म्हणून—"

"थांबा," मी त्याला पुरतं बोलूं देण्यापूर्वींच उसळून म्हणालों, "तुमच्या सहाय्याची मला गरज नाहीं. कर्तव्य म्हणून केलेल्या सहाय्यानं माझी अडचण दूर होणारी नाहीं. कारण तें करण्यांत तुमचं मन असणार नाहीं. उत्स्फूर्त ऊर्मीनं केलेल्या सहाय्याची गरज होती मला. जा तुम्ही." असं म्हणून दुसऱ्याच क्षणीं मीं त्याला वाटेला लावलं. केवळ कर्तव्य म्हणून कोरड्या मनानं केलेल्या सहाय्याचा स्वीकार करण्याची चूक मी कधींहि करणार नाहीं.

पण ही चूक शिवाजीमहाराजांनीं केलेली आहे; त्यांच्या परमपूज्य मातुःश्री जिजाबाई यांनीं ती चूक केलेली आहे ! म्हणून या दोघांपेक्षां मी श्रेष्ठ आहे असं मात्र मला मुळींच म्हणायचं नाहीं. एखाद्या चुकीनं थोरांना लहानपण येत नाहीं; किंवा एखाद्या यथायोग्य कृतीनं लहानांना थोरपण येत नाहीं हें का मला माहीत नाहीं ?

त्या दोन थोर पुण्यात्म्यांनीं केलेली कदाचित् ती पहिली आणि शेवटचीच चूक असेल. पण म्हणून तिचा दुष्परिणाम कांहीं चुकला नाही. एका सकाळीं उठून म्लेच्छांच्या ताब्यांतील कोंडाणा किल्ला 'आठ दिवसांच्या आंत जिंकून स्वराज्यांत सामील करीन असं वचन दिलंस तरच मी अन्नग्रहण करीन' असं जिजाऊ शिवाजीला म्हणाली. आणि मातृभक्त शिवाजीला कर्तव्यबुद्धीनं तसं वचन द्यायला भाग पाडलं, ही जिजाऊची चूक ! योगायोगानं त्याच वेळीं आपल्या मुलाच्या लग्नाची अक्षत द्यायला आलेल्या तानाजीला कोंडाण्याच्या मोहिमेवर जायची आज्ञा झाली; आणि केवळ कर्तव्य म्हणून तानाजीला ती मानावी लागली. उत्स्फूर्त इच्छा आणि भावनाविरहित कर्तव्यपालन यांतील फरक शिवाजीनं या वेळीं ध्यानांत घेतला नाहीं. ही शिवाजीची चूक ! याचा अर्थ

कोंडाणा किल्ला जिंकण्याची आंतरिक आस्था शिवाजीला नव्हती आणि तानाजीला तर नव्हतीच नव्हती हाच होतो ! सारा कर्तव्याचा कोरडा कारभार !

माझं विधान वाचून असं बिचकूं नका. या मोहिमेंत तानाजीचं मन नव्हतं याचा इतिहासांत सबळ पुरावा आहे. तानाजीनं दोराला बांधलेली घोरपड गडावर न चढतां माघारीं फिरली याचा अर्थ भोळेभाबडे लोक दैवी अपशकून समजत असतील. पण ती घोरपड म्हणजे तानाजीच्या बहिश्चर मनाची मूर्त प्रतीक होती, हें खोल विचार करणाऱ्याला सहज पटेल. कोंडाणा जिंकण्याची तशीच निकड असती, तर त्यासाठीं शिवाजीनं अंतःस्फुर्तीनंच मोहीम आंखली असती. त्यासाठीं जिजाऊच्या आज्ञेची गरज नव्हती. मग ज्या मोहिमेंत तिच्या योजकांचं आणि धुरीणांचं मन नव्हतं ती आरंभिली त्याच वेळीं तिचा दुःखी शेवटहि मुक्रर झाला यांत काय नवल !

यावरून कुणाला वाटेल, की आपल्या व्यवहारांतील हरेक कार्य अंतःस्फुर्ति शिवाय कुणीं करूं नये असं मला सुचवायचं आहे. नाहीं, तसं मुळीच नाहीं. व्यवहारांतील नित्य कार्ये आपणाला कर्तव्यबुद्धीनंच करायला हवींत; नाहीं तर व्यवहाराचा सारा गाडाच अडेल. पण आपल्या आयुष्यांतील महान् कार्यें मात्र केवळ कर्तव्यबुद्धीनं करून भागत नाहींत. त्याला सारं तनमनच वहावं लागतं, नाहीं तर मग 'गड आला पण सिंह गेला' असे कांहींसे हताश उद्गार काढण्याचेंच नशिबीं येतं !

## खरं समाधान !

खाल्लेलं अन्न पचविल्यानं देहाचं स्वास्थ्य साधतं; आपलं दुःख दुसऱ्याजवळ ओकल्यानं मनाचं समाधान होतं.

२१...

# एक कुलुप, दोन किल्ल्या !

सुखी संसाराचं गुपित मला कळलं आहे.-- हो, गुपित; सुखी संसाराचं गुपित ! तुम्हांला पण तें सांगणार आहें मी. तुमचाहि संसार सुखी व्हायला नको ? सभोंवारचे संसार दुःखी कष्टी असल्यावर आमचा संसार सुखी असून नसल्या सारखाच ! सभोंवारच्या दुःखाची कृष्ण छाया पडल्यावर आमचा संसार तरी काजळल्याशिवाय कसा राहील ? म्हणून तें गुपित तुम्हाला सांगणार आहें मी आज.

थांबा, असें अधीर होऊं नका...काय ? तुम्ही तें गुपित ऐकायला अधीर झालेले नाहीं ? मग फारच शंकेखोर बुवा तुम्ही ! इतरांच्या दुःखी संसाराच्या काळ्या छायेनं माझा संसार काळंवडलेला नसून, सुखी संसाराचं कसलंहि गुपित मला मुळांतच कळलेलं नाहीं, इतरासारखंच माझाहि संसार दुःखी आहे असं तुम्हाला म्हणायचं आहे; हवं तर म्हणा. पण माझं म्हणणं तरी पुरतं ऐकून घ्या.

आतां एवढं खरं, कीं इतरांच्या दुःखी संसारचं सावट पडल्यामुळंच केवळ माझा संसार कांहींसा रुसका दिसतो असं नव्हे, तर तो काहीं अंगभूत कारणानंहि तसा आहे, हें मी कबूल करतों. पण याचा अर्थ सुखी संसा-राचं गुपित मला कळलेलंच नाहीं असं मात्र नव्हे. तें गुपित कळूनहि माझा

संसार कधींमधीं ढगाळेला दिसतो, त्याला कारण आहे. आपलं गृहछिद्र कुणाला सांगू नये असं व्यवहारशास्त्र आहे. पण आतां तें सांगणंच भाग आहे.

एका कुलपाला पुष्कळदां दोन किल्ल्या असतात. सुखी संसाराच्या कुलपालाहि अशाच दोन किल्ल्या आहेत. धातूच्या त्या कुलपाला दोन किल्ल्या असल्या, तरी त्या दोन्ही सारख्याच असतात. अगदीं तंतोतंत एकीसारखी दुसरी. सुखी संसाराच्या किल्ल्याहि दोन आहेत. पण त्यांतील एक दुसरीसारखी असते असं मात्र नव्हे--नव्हे, भिन्नभिन्नच असतात. संसार हा स्त्री-पुरुषांच्या जोडीचा मिळून होतो. आणि सुखी संसाराच्या त्या दोन किल्ल्यांपैकीं एक स्त्रीच्या हातीं असतें आणि दुसरी पुरुषाच्या हातीं असते.

संसाराच्या भागीदारांमध्यें पुरुष हा प्रमुख असतो, संसाराचा स्वामी असतो हें खरं; पण सुखी संसाराच्या कुलपाची खरी किल्ली, महत्त्वाची किल्ली मात्र स्त्रीच्याच हातीं असते. पुरुषाच्या हातीं असणारी किल्ली केवळ दुय्यम महत्त्वाची होय. इतकंच नव्हे तर त्या किल्लीची तशी आवश्यकताहि नाहीं, असं माझं स्पष्ट मत आहे. पण स्त्रियांचं मत विचाराल तर तें माझ्या उलट आहे. त्यांना वाटतं कीं पुरुषाच्या हातीं असणारी किल्लीच अधिक महत्त्वाची आहे. पण त्यांचा हा गैरसमज आहे; निदान माझ्या पत्नीचा तर तो आहेच आहे. तिला वाटतं, कीं मींच माझ्या हातांतील किल्ली मनःपूर्वक वापरायला अंगचुकारपणा करतोय. पण खरं सांगू ? आपल्या पतीच्या हातीं जी किल्ली आहे—निदान असावी अशी बायकांची कल्पना असते— ती पुष्कळादां त्यांच्या हातीं नसतेच मुळीं. ती हातीं असणं नसणं त्यांच्या हातींच नसतं. ती हस्तगत करायला पुरुष धडपडत नसतो असं नव्हे, पण हस्तगत होणं हा प्रयत्नाचा भागच नव्हे. केवळ दैवाधीन गोष्ट असते ती !

पण नेमकी हीच गोष्ट माझ्या पत्नीच्या ध्यानीं येत नाही. आणि मला वाटतं बहुतेकांच्या पत्नींच्या बाबतींत हीच गोष्ट घडते. त्यांना वाटतं कीं आपला पतीच अरसिक आहे, त्याला आपलं कौतुकच करायला नको. सोन्यासारखी बायको मिळालीय, पण मेलं आपल्या पतीला त्याचं चीजच नाहीं. आणि अशा

विचारानं मग त्या नाराज होतात. रुसून बसतात, आणि साऱ्या संसारसुखाच्या रंगाचा बेरंग करून टाकतात.

खरं म्हणजे पुरुष अरसिक आहे. त्याला पत्नीचं कौतुक नाहीं म्हणून किल्ली हातीं असून तो ती वापरीत नाहीं असं नव्हे, तर मुळांतच ती त्याच्या हातीं नसते हें त्याचं कारण असतं—माझ्या हातीं ती नाहीं तशी.

मी असं म्हणतोंय म्हणून माझ्या पत्नीला कुणी सांगूं नका अं ! तुम्ही म्हणाल चांगलं लेखांत स्पष्ट आरोप करताय तिच्यावर आणि आम्हाला सांगूं नका म्हणताय; काय उपयोग होणार त्याचा ? पण खरं सांगूं, मी या लेखांत तिच्याविरुद्ध कांहींहि लिहिलं असलं तरी तिला तें कळायची मुळींच भीति नाहीं. संपूर्ण निरक्षर आहे ती. तेवढा भाग्यवान् आहें मी !

होय, भाग्यवान्. कसा तें तुम्हाला मी सांगणारच आहे हळूहळूं. म्हणून म्हणतों, तुम्ही तेवढं तिला कांहीं सांगूं नका म्हणजे झालं. नाहीं तर निष्कारण आम्हा दोघांमध्यें बिघाड आणून ठेवाल, आणि आमचा सुखी संसार उधळून लावाल—' सुखी संसार ! ' तुम्ही एकदम आश्चर्यानं म्हणाल, ' काय बोलतांय राव ! तुमच्या हातीं असायला हवी ती सुखी संसाराच्या कुलपाची किल्ली मुळांतच नापत्ता आहे असं तुम्हीच म्हणतां. आणि तरी तुमचा संसार सुखी अं ? '

मग सांगतोंय काय तुम्हाला ! खरंच आहे तें. अहो, संसार सुखी व्हायला पुरुषाच्या हातांतील किल्ली तशी महत्त्वाची नाहींच मुळी. ती नसली म्हणजे संसारांत थोडी कुरबूर होते; पण ही कुरबूरच संसाराची गोडी वाढण्यासाठीं तोंडीलावण्यासारखी अत्यावश्यक आहे अशी माझी समजूत आहे.

पुरुषाच्या हातांतील अशी किल्ली तरी कोणती हें अजून ध्यानीं आलं नसेल तुमच्या. सांगतो, ऐका; अहो, ती किल्ली सोन्याची असते—हो, सोन्याची ! बायकांना सोनं हवं असतंय. अंगभर अलंकार हवे असतात त्यांना; ते मिळाले कीं संसारांत सुखाचा, आनंदाचा महापूर लोटलाच अशी त्यांची समजूत असते. ही वेडेपणाचीच समजूत नाहीं का ? तुमच्यापैकीं स्त्रीवाचक असतील ते बहुधा नाहीं कबूल करणार हें. पण पुरुषवाचक माझ्याशीं सहमत होतील याची मला

खात्री आहे. समंजस स्त्रियांनाहि माझं म्हणणं पटायला अवघड जाऊं नये. कारण सोन्याच्या दागिन्यावांचून संसार सुखी होत नाहीं असं मानायचं झालं, तर जगांतील बहुतेक संसार केवळ तेवढ्याचसाठीं दुःखी कष्टी आहेत असं मानल्या सारखं होईल. आणि तें तर नक्कीच खरं नाहीं हें तुम्ही पाहतांच. म्हणून म्हणतों, कीं संसार सुखी व्हायच्या दृष्टीनं पुरुषाच्या हातांतील ही आभासात्मक किल्ली तशी महत्त्वाची नाहींच मुळीं.

संसार सुखी करण्याची खरी किल्ली—गुरु किल्ली—महान् गुपित— खरं म्हणजे स्त्रीच्याच हातांत आहे. मलाहि आजवर तें गुपित अज्ञात होतं. तरीपण अजाणते-पणींहि मी माझ्या संसारांत सुखी होतोंच. कारण माझी पत्नी आपल्या हातीं असलेल्या किल्लीचा यथायोग्य रीतीनं वापर करीत होती. तुम्ही विचाराल मग संसार सुखी करणारी ती गुरुकिल्ली—तें अचुक साधन—तें महान् गुपित असं आहे तरी कोणतं ? सांगतों. तें सांगण्यासाठींच तर बसलोंय मी.

बाकी सुखी संसाराच्या कुलपाची ती सोन्याची किल्ली पुरुषाकडून वापरली न गेल्यामुळं साऱ्याच बायका कुरबुरीवर थांबतात असं नाहीं. आणि सारेच पुरुष ती कुरबूर खेळकरपणें पचवूं शकतात असंहि नाहीं; त्यामुळं पुष्कळ संसार अकारण दुःखी कष्टी झाले आहेत, हें काहीं खोटं नाहीं. उद्यां समाजवादी समाजरचना अंमलांत आली तर मात्र यांतून सुटका दिसते खरी. समाजवादी समारचनेचं संपूर्ण चित्र मला आकलन झालेलं नसलं तरीपण मला वाटतं त्या वेळीं समाजांतील साऱ्या स्त्रियांना नेमकेच व सारखेच दागिने वापरावे लागतील. कुणाला जास्त नाहीं कीं कमी नाहीं. कायद्याच्या सक्तीनंच सारं घडून येईल. त्यामुळं पुरुषांच्या मागची ‘ मला असलाच दागिना पाहिजे, मला इतकेच दागिने पाहिजेत ’ ही बायकांची भुणभुण मात्र कायमची बंद होईल. पण—ती भुणभुण बंद होईल हें खरं; पण संसारांत आनंद नांदेल का ? मला नाहीं वाटत. संसारांत कुरबूर उरणार नाहीं, पण त्याबरोबर आनंदहि उरणार नाहीं.

एक तर सुखी संसाराच्या मिष्टान्नानं मिठी बसूं नये म्हणून आवश्यक त्या माफक कुरबुरीच्या तोंडीलावण्याला माझ्या सारख्यांना मुकावं लागेल.

दुसरं, विविध मौल्यवान् दागिन्यांचा षोक करणाऱ्या हौशी श्रीमान् स्त्रियांना आपली हौस भागविणं कायद्यानं अशक्य होईल. आणि इतर सामान्य स्त्रियांना आपण केव्हां ना केव्हां आपल्या शेजारणीपेक्षां अधिक दागिने घालून तिच्या नाकावर 'टिच्चून' मिरवूं अशा उराशीं बाळगलेल्या सुप्त सुखाशेला मुकावं लागेल. बायकांना आनंद वाटतोय तो केवळ भरपूर दागिन्यांचा नव्हे तर तो शेजारणीपेक्षां आपले दागिने अधिक आहेत याचा ! आणि उद्यांच्या समाजरचनेंत तर ' सब घोडे बारा टक्के ' या न्यायानं सारीं कुटुंबं एकाच भावानं मोजलीं जाणार आहेत ? मग उद्यांचे ते एकसुरी संसार दुःखी कष्टी झाले तर त्यांत नवल काय ?

हा उद्यांचा धोका समाजवादाची तळी उचलणाऱ्या बायकांच्या ध्यानीं आलेला अद्याप दिसत नाहीं. पण जेव्हां तो त्यांच्या ध्यानीं येईल, तेव्हां मोठी गंमतच उडणार आहे. बायकांचा दागिन्यांचा लकडा चुकविण्यासाठीं पुरुष समाजवादाचा डांगोरा पिटीत राहणार आणि बायका घरांतल्या घरांत भांडवलशाहीचा जयघोष करणार ! एकाच संसारांतील स्त्रीपुरुषांची तोंडं अशीं परस्परविरुद्ध दिशेला झाल्यावर उद्यांच्या संसाराचं तें दुतोंडी रूप किती मजेशीर दिसेल ! केवढी गंमत उडेल !

' अहो, तुमची गंमत राहूं दे बाजूला. आम्हाला गुपित ऐकायचं आहे, तुमचं गुपित ! '

असं ? ठीक आहे. सांगणारच होतों मी तें. पण तें ऐकायची तुमची तितकीशी उत्सुकता दिसली नाही. म्हणूनच जरा—पण जाऊं दे तें. तुम्ही तें ऐकायला उतावीळ आहांत ना ? मग सांगतों, ऐका.

परवां माझ्या मित्राला भेटण्यासाठीं मी सहज त्याच्या घरीं गेलों होतो. एकदोन दिवसाआड त्याला भेटल्याशिवाय मला चैनच पडत नाहीं. त्याचा सहवास कुणालाहि हवाहवासा वाटावा असा गोड आहे. पण कां कुणास ठाऊक, त्याचं आणि त्याच्या बायकोचं मात्र पटत नाहीं. सारखीं भांडणं होत असतात. तसं पाहिलं तर माझा मित्र शांत, समजूतदार तसाच सहनशील. कधीं कुणावर रागावणार नाहीं, कीं चिडणार नाहीं. कुणीं चेष्टा केली,



मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे
अनुक्रम २२३८० वि: निबंध
क्रमांक ११८४ नों दि: २३/८/८२

किंवा क्वचित् अपमान केला तरी विनोदबुद्धीनं हंसून घालविण्याइतका उमदा. बरं, त्याची बायकोहि चांगली शिकलीसवरलेली आणि वर्तनानं कुणाला शंकाहि येणार नाहीं इतकी चोख. मग पतिपत्नींचीं अशीं भांडणं कां व्हावींत ?

साताजन्माच्या पुण्याईनं असा नवरा मिळायचा नाहीं, पण मेली बायकोच नतद्रष्ट असं तिच्याबद्दलच्या कटुतेचं आणि त्याच्याबद्दलच्या कौतुकाचं शेजारणी पाजारणींचं बोलणं कधींमधीं ऐकूं यायचं. पण एक तर एका स्त्रीचं दुसऱ्या स्त्रीबद्दल कधीं चांगलं मत असायचं नाहीं या व्यावहारिक न्यायानं, व पुरुषांना स्वतःच्या बायकोपेक्षां शेजाऱ्याची बायको अधिक सुंदर दिसते, त्याप्रमाणं बायकांनाहि आपल्या नवऱ्यापेक्षां शेजारणीचा नवरा अधिक चांगला वाटावा, तशांतलाच हा प्रकार असेल या समजूतीनं त्या बोलण्याकडं मीं आजवर फारसं लक्ष दिलं नव्हतं. बरं, लक्ष दिलं असतं, तरी त्यांच्या भांडणाचं तें कारण मीं मान्य केलं नसतं; तथापि त्याचं समर्पक कारण सांगणं मलाहि शक्य नव्हतं.

त्यांच्या भांडणाच्या कारणाचं, खरं म्हणजे एक गूढच होतं. त्याबद्दल विचार करीतच मी माझ्या मित्राच्या दाराशीं येऊन ठेपलों. आणि एकदम थबकलों. कारण दार झांकलेलं होतं आणि आंत पतिपत्नींचं कडाक्यान भांडण चालू होतं.

" मारा, मारा, जीव घ्या एकदांचा ? बायकोला मारण्याखेरीज दुसरा कसला पुरुषार्थ घडायचा आहे ?... गळयांत धोंडा बांधून घेतला गऽबाई मीं !...ते वसंतराव मला लग्नासाठीं केवढी गळ घालीत होते. चार चाळींची मालकीण म्हणून त्यांच्या बरोबर मोटारींतून मिरवलें असते आज ! त्यांच्या शोफरची सर नाहीं...!"

माझ्या मित्राच्या पत्नीची वरील मुक्ताफळं सलग सांगितलीं मीं. पण तीं सलगहि नव्हतीं आणि दिलीं त्या क्रमानंहि नव्हतीं. आज जशीं आठवलीं तशीं दिलीं आहेत. मात्र तीं ऐकलीं तेव्हां माझ्या मित्राच्या लाथा, बुक्या, थपडा आणि त्याच्या बायकोचें, कैंकापणें, रडणें आणि मधूनच बोंचऱ्या वाग्बाणांचें संधान यांची एकच गल्लत झाली होती ! तें ऐकत तिथं अधिक वेळ उभं राहणं मला शक्य नव्हतं. मीं झटकन् तिथून काढता पाय घेतला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मीं तिथून काढता पाय घेतला खरा; पण तो अप्रिय प्रकार ऐकल्यामुळं जड अंतःकरणानं नव्हे, तर समाधानाच्या तृप्त अंतःकरणानं; हरवलेला अमोल ठेवा सांपडल्याच्या प्रसन्न वृत्तीनं. कारण माझ्या मित्राच्या संसारांतील दुःखद बखेड्याचं मूळ मला आतां उकललं होतं. प्रेमळ पतीचा निर्दय नरपशु कां झाला हें मला कळून चुकलं होतं. संसारसुखाचं अज्ञात गुपित— सुखी संसाराच्या कुलपाची गुरुकिल्ली त्या प्रसंगानं मला उकलली होती.

शांत, समतोल वृत्तीच्या माझ्या समंजस मित्रानं आपल्या बायकोवर रानटी हल्ला केला होता! पण ज्या परिस्थितींत तो केला होता, ती ध्यानीं घेतां तो अकारण होता किंवा अमर्याद होता असं निदान मी तरी म्हणणार नाहीं. कारण बायकोकडून ज्या प्रकारच्या श्रद्धेची, भावनेची पुरुष अपेक्षा करतो, त्याहून सर्वस्वीं विरुद्ध प्रकारची वृत्ति त्याच्या बायकोच्या बोलाचालींत प्रतीत होत होती. पत्नीच्या वृत्तीबाबत पुरुषाची भावना इतकी हळुवार असते, कीं नुकतीच खपली धरूं लागलेली जणूं नाजुक दुखरी जखमच ! जरासाहि धक्का सोसवत नाहीं तिला. प्रसंगीं जगाकडून होणाऱ्या कसल्याहि अवहेलनेला, उपेक्षेला, अपमानाला न जुमानणारं त्याचं टणक मन पत्नीच्या बाबतींत मात्र लोण्याहून मऊ होतं. जगाच्या बेफिकीरीला न जुमानणारं पुरुषी मन बेगुमान असतं, तें आपल्या पत्नीच्या हृदयांतील आपलं उच्च स्थान अढळ आहे या विश्वासानं. तिच्या हृदयांत उत्तुंग हिमालयाएवढं आपलं मोल आहे या भावनेनं, आपलं सारं विश्व आपल्या पत्नींतच सांठवलं आहे या श्रद्धेनं पुरुष जगत असतो ! जोंपर्यंत पत्नीकडून ही श्रद्धा जोपासली जाते, तोंपर्यंत पुरुष प्रतिपरमेश्वर होऊं शकतो. त्या श्रद्धेला पत्नीकडून तडा गेला, कीं त्याचाच पशु होतो. माझा मित्र असाच पशु झाला होता. ' मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥ ' असं स्वतःबद्दल साधुसंत म्हणतात. पतिपत्नीमधील संबंधांत पुरुषांबद्दल असंच म्हणता येईल.

पुरुषाला आपण पत्नीच्या कौतुकाचा, अभिमानाचा, प्रीतीचा विषय असावं असं वाटतं. तिच्या एकच सकौतुक स्निग्ध दृष्टिक्षेपासाठीं पुरुषानं आजवर काय करायचं बाकी ठेवलं आहे ? पुरुषाच्या हातून जगांत आजवर घडलेल्या



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २२३८० वि: निबंध
क्रमांक ११८४ नों दि: २३।४।८०

प्रचंड साहसांपैकीं बहुतेक केवळ याच कारणासाठीं घडलीं आहेत. नादान नेभळटांचे केवळ याच कारणासाठीं कर्तबगार नरपुंगव बनले आहेत. व्यसनी विकलांग आत्म्यांचे केवळ याच कारणासाठीं सुदृढ सन्मार्गी झाले आहेत. दुष्ट दुरात्म्यांचे केवळ याच कारणासाठीं सुष्ट पुण्यात्मे झाले आहेत. स्त्रियांना स्फूर्तिदेवता म्हणतात ते याचसाठीं. आपल्या साभिमान दृष्टिक्षेपानं स्त्रीनं पुरुषाच्या अल्प गुणाचाहि गौरव केला, स्नेहल स्तुतीनं त्यांचा अहंकार पोसला, कीं पुरुषांचा केवढा तरी कायापालट होतो. समुद्राच्या पोटांतून मोजकींच रत्नें बाहेर आलीं; पण स्त्रीच्या कौतुकानं पुरुषांत असंख्य सद्‌गुणांचा जन्म होतो.

याच्या उलट नाजुक भावफुलांनीं पुजलेल्या त्याच हृदय-देवतेनं पुरुषाचा अवमान केला, तर त्याच्या दुर्वर्तनाचा सारा गाळ बाहेर पडतो. जीवनांत आपणाला कांहीं मोल आहे, महत्त्व आहे असं वाटायचं पुरुषाचं अंतिम साधन म्हणजे स्त्री. तेंच अनुकूल नसल्याची जाणीव होतांच त्याला वज्राघाताहूनहि भयंकर धक्का बसतो. त्याचा सारा आत्मविश्वास कोसळून पडतो. जीवनांतील स्वारस्यच नाहींसं होतं. दोरी तुटलेला पतंग अंतराळांत गोते खातो, त्याप्रमाणं पुरुषाचा सारा आधार निखळून पडतो. आणि मग आपलं सर्वस्व असलेल्या श्रद्धेचा विध्वंस करणाऱ्या स्त्रीचा छळ करून पुरुष तिचा सूड तरी घेतो, किंवा उद्वेगाच्या भरांत आत्मनाश तरी करून घेतो. पत्नीनं अवमान केल्यामुळं एका तरुणानं झाडावरून उडी घेऊन कपाळमोक्ष करून घेतल्याचं वृत्त परवांच वाचलं. तें वाचून मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं. आजवर त्या तरुणाचा इतर कुणीं कधीं अवमान केला नसेल का ? छे, जगाच्या व्यवहारांत ही नित्याची बाब आहे ! त्या तरुणानेंहि असे कित्येक अवमान पचविले असतील. पण पत्नीकडून अवमान ?—नाहीं, पुरुषाला नाहीं सोसवत तो !

मग माझा मित्र तरी आपल्या पत्नीकडून नित्य होणारा अवमान कसा सहन करील ? आणि तो अवमान तरी काय साधासुधा ? पत्नीनं एकेकाळच्या आपल्या प्रियकराचं आपल्या तोंडावर कौतुक करावं ? आपली तुलना त्याच्या शोफरशीं करावी ? कोणता पुरुष सहन करील हें ? त्यापेक्षां तापलेल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
70८९९

सांडसीनं उघड्या काळजावर डाग ओढले असते तरी तें सोसले असते त्यानं !... दुर्भागी बिचारा !

खरंच, माझा मित्र दुर्भागी खरा. त्यामानानं मी केवढा भाग्यवान् ! माझी पत्नी निरक्षर आहे. पण अडाणी खास नाहीं. मी आहें त्यापेक्षां ती मला किती तरी अधिक चांगला मानते. आहे त्यापेक्षां किती तरी अधिक महत्त्व देते. नव्हे, सर्वच बाबतींत माझ्या योग्यतेहून ती मला अधिक लेखते. आणि मग तिच्या खऱ्या खोट्या अभिप्रायाला उतरण्यासाठीं मला केवढा तरी आटापिटा करावा लागतो ! दिवसेंदिवस ती मला असंच अधिकाधिक मानूं लागली, तर, एक दिवस तिच्या वेणींत खोंवण्यासाठीं आकाशींचीं फुलं तोडून आणण्याच्या मोहिमेवर मला निघावं लागेल असा संभव दिसतो !

पुरुषाचा अहंकार पोसून त्याला खूष करतांना पत्नी दुसरं तिसरं कांहीं करीत नसून स्वतःच्याच आनंदाचं, सुखाचं बी खतपाण्यानिशीं पेरीत असते. हें ज्ञान बायकांना जणूं उपजत असतं. एरवीं माझी अशिक्षित पत्नी ती पेरणी इतक्या कुशलतेनं कशी करूं शकली असती ?...मग माझ्या मित्रपत्नीचं हें उपजत ज्ञान गेलं कुठं ? शिक्षणाबरोबर माजलेल्या फाजील समानहक्कांच्या तणानं त्या उपजत आणि उपयुक्त ज्ञानाच्या पिकाला ग्रासून तर टाकलं नसेल ? छेः हा शिक्षणाचा दोष नसून अर्धवट शिक्षणाचा दोष असावा. अशा अर्धशिक्षित बायकाच आपल्या अहंमन्य हेकेखोर वागणुकीनं आपला संसार पुष्कळदां दुःखमय करून घेतात हेंच खरं. अर्धशिक्षित माणसापक्षां अशिक्षित माणूस बरं म्हणावं लागतं तें याचसाठीं. माझी पत्नी अशिक्षित असल्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान् कां समजतों तें आतां कळलं असेल तुम्हांला ? आणि सुखी संसाराचं गुपित— संसारसुखाच्या कुलपाची गुरुकिल्लीहि आतां उमजली असेल तुम्हाला ?

“ होय, ” एक सुरांत तुम्ही म्हणाल.

“ ही गुरुकिल्ली पृथ्वीच्या पोटीं सांपडणाऱ्या एखाद्या धातूची केलेली नाहीं; स्त्रीहृदयांतील पतिनिष्ठेच्या लोखंडाची ती कलेली आहे. पतिबद्दलच्या अमाप अभिमानाचा तिला मुलामा दिला आहे. तिचे कळीचे दांते त्याच्या गुणांच्या अतुट कौतुकाचे केलेले आहेत.”



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 22380 वि. निबंध
क्रमांक 11८४ नों. दि. 23/4/८2

## मनाचा पारवा : 'साद'

| | |
|---|---|
| मी मिशी उतरलो ! | ९ |
| संकटांचं मोल | १५ |
| लादलेलं थोरपण | १९ |
| निंदकाचें घर | २२ |
| अपराधाचे शासन—क्षमा | २५ |
| स्त्री-जन्मा, ही तुझी कहाणी ! | २९ |
| नागोबाला दूध | ३२ |
| कोपिष्ट माणूस | ३५ |
| आरसा | ४४ |
| सावधान ! | ४७ |
| जोंवरीं असतीं शितें | ४९ |
| आपलीं मुलं | ५३ |
| महत्त्वाकांक्षा ? छे, मनोरथ ! | ५९ |
| सांवटाखालचं झुडूप | ६६ |
| दंभ | ६९ |
| मनाचा पारवा | ७४ |
| दोन सुंदरी | ७८ |
| म्हाताऱ्याचे डोहाळे | ८२ |
| ओढाळ मन | ८९ |
| कर्तव्य-दक्षता | ९२ |
| एक कुलुप, दोन किल्ल्या ! | ९५ |

REFBK-0010895

# आगामी आकर्षणें



---

**वेताळ प्रसन्न**

दत्तू बांदेकर

---

**थोडें कडू थोडें गोड!**

चिं. वि. जोशी

---

**नेताजींच्या 'मृत्यू'ची कादंबरी?**

आचार्य अत्रे

---

**जपानी घोडा**

शिरीष पै

---

**वेडांत दौडले सात!**

रणजित देसाई

---

चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर

सादरकर्ते:

---